म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र २४१६
IRBK-0102416
IRBK-0102416
IRBK-0102416

ज्योति प्रकाशन सादर करीत आहे

ग्रंथालय ठाणे 23466

# दोन जगे

( कथा-संग्रह )

लेखक

भाई भारती

IRBK-0102416

IRBK-0102416

—:०:—

डिसेंबर १९४६ ] [ मूल्य १॥ रु.

* ह्याच लेखकाची पुस्तकें *

* क्रांती कथा-संग्रह

* अनुकार

* दोन जगें

—: आगामी :—

* बगाराम

---


निर्माते—

म. द. लोखण्डे
गो. ह. अभ्यंकर
ज्योति प्रकाशन
३८६ सदाशिव, पुणें

मुद्रक—

कनकमल मुनोत
प्रभात प्रिंटिंग वर्क्स
१४६१ रविवार, पुणें २

प्रकाशक—

गो. स. मदाने
भारत प्रकाशन
नवग्रही, धुळें


[ सर्व हक्क निर्मात्यांच्या स्वाधीन ]

## त्याचं असं झालं—

कीं पुस्तक तयार झालं आणि त्याला नांव द्यायची वेळ आली. साहजिकच नांव काय द्यावे ह्याविषयीं मनांत गोंधळ निर्माण झाला. अपत्यदर्शन नव्यानेंच होत असल्यानंतर 'नुतन पिता' गोंधळून जाणार नाहीं तरच आश्चर्य ! तसाच कांहींसा प्रकार झाला.

शेवटीं ह्या पुस्तकांतील चारीही कथांचे स्वरूप लक्षांत घेऊन ह्या संग्रहाला 'दोन जगें' हे नांव देण्याचें मी ठरविलें. त्याचे कारण ह्यांतील क्रमांक १ व ४ ह्या कथा सामाजिक, मानवेतर, स्वतः सांगितलेल्या, स्त्रीविषयक, दुःखांत, केवळ कल्पनात्मक अशा स्वरूपाच्या असून क्रमांक २ व ३ ह्यांचे स्वरूप १–४ च्यापासून अगदीं भिन्न असें आहे. त्या कथा राजकीय मानवांच्या, दुसऱ्यांकडून ऐकलेल्या, पुरुष विषयक, सुखान्त, व निव्वळ वास्तववादी अशा आहेत.

अशी ही कथांची पार्श्वभुमी लक्षांत घेतां 'दोन जगें' हे नांव देणें मला सार्थ वाटले.

ह्या कथा जरी रचना ह्या दृष्टीनें दोन परस्पर विरुद्ध अशा जगांतल्या वाटत असल्या तरी त्या खास एकाच जगासाठीं आहेत हे सांगणें नकोच.

—तेव्हां जास्ती कांहींहीं न सांगता परस्पर विरुद्ध अशा दोन जगांतील वाचकांपुढें हा प्रयत्न परिक्षणाकरतां ठेवीत आहे.

वाचक ह्याचा स्वीकार करतील अशी उमेद आहे.

'जय हिंद !

—भाई भारती

नगर ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४७५
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
दा: क्र. २४७५ नों. दि ...............
वि. क७४ । ९. क्र. ...............

# पठाणी प्रेम

"चंपी, चल ये इकडे" असें मालकिणीनें म्हणतांच मी टुणकन् उडी मारून तिच्या मांडीवर बसले.

आमच्यासमोर एक गृहस्थ बसले होते, त्यांना माझी ही सर्कस पाहून खूपच गंमत वाटली असावी, कारण मोठा आश्चर्यचकित चेहरा करून ते म्हणाले, "वा वा, मोठी हुशार दिसतेय- तुमची कुत्री" त्यांचे हे उद्‌गार ऐकून व माझा चांगुलपणा आपल्याकडे घेऊन ती आढ्यतेनें त्याला म्हणाली, "मग निवड कोणाची आहे." खरं सांगायचं म्हणजे मला ही गोष्ट कांहीं तितकीशी पटली नव्हती. पण अलिकडे ह्या गोष्टी दररोज घडत असल्यामुळें मलाही त्याचें

कांहीं वाटेनासें झालें होतें. आमच्याकडे येणारे लोक आमची स्तुति करीत नाहींत असें कधीं झालेंच नाहीं मुळीं !

मला जसं आठवतं तशी मी ह्या मालकिणीजवळ आहे. माझे आईबाप कोण ? मी कुठून आले ? कांहीं कांहीं म्हणून मला आठवत नाहीं—माहीत नाहीं. आतां एवढंच समजतं कीं ही माझी मालकीण हीच माझी आई आणि हीच माझी मालक. तिच्याविषयीं एवढा जिव्हाळा वाटायचं कारण एकच आणि तें म्हणजे माझ्यावर असलेलें तिचें प्रेम. आईबापांपासून पोरकी झालेली मी अनाथ पोर. पण त्यांच्या प्रेमाची उणीव कांहीं तिनें मला भासूं दिली नाहीं. किती प्रेम आहे तिचें माझ्यावर ! ती मला स्वतःच्या ताटांत जेवायला घेते. दररोज साबण लावून अंग धुते, तेल लावून माझे लांबसडक केस विंचरते. नेहमीं मला मांडीवर घेते. मला खेळवते, माझे पापे देखील घेते. कश्याचं म्हणून दुःख होऊं देत नाहीं मला.

चोवीस तास आम्हीं एकमेकींच्या सहवासांत असतों. त्यामुळें आनंदाप्रमाणें दुःखांतही आम्हीं एकमेकींना सहभागी होतों. मला कांहीं झालें कीं, मी तिला सांगते आणि तिला कांहीं वाईट वाटलें कीं ती मला येऊन सांगते. आमची भाषा जरी एकमेकांना उमगत नव्हती तरी दुःख सांगितल्यामुळें मनाला विरंगुळा वाटतो हें मात्र आम्हांला पुरेपूर पटलें होतें. एखादे वेळीं तिच्या डोळ्यांत अश्रू येत. अशा वेळीं मी खूपच कावरीबावरी व्हायची आणि तिचे अश्रू कूं कूं करीत

पुसायची. खरं सांगायचं म्हणजे तिला ह्यामुळें बरं वाटायचं ही जशी दुःखाची गोष्ट तशीच आनंदाची, एखादे वेळीं तिला आनंद झाला तर कित्ती कित्ती पापे घेते ती माझे. छे छे छे जीव अगदीं कावराबावरा होतो त्यामुळें.

—असं अगदीं सख्ख्या बहिणी बहिणीप्रमाणें नातं आहे आमचं.

इतका तिचा माझा जवळचा संबंध पण ती कोण आहे हें मात्र मला कळलं नव्हतं. आमच्या शेजारीपाजारीं खूप बायका होत्या. पण ती कांहीं त्यांच्यासारखी दिसत नव्हती. तिचं वागणं कांहीं निराळंच ! आम्हीं कुत्रीं जसें दिवसा झोंप काढून रात्रीं जागतों तसा कांहींसा प्रकार आहे तिचा. संध्याकाळ झाली कीं, समजावें तिचें आतां उजाडलें म्हणून. आमच्या घरांत मोठा बिलोरी आरसा आहे. संध्याकाळ झाली कीं ती मला आरशासमोर घेऊन जाते. आणि बसते नट्टापट्टा करीत. केस वळवावयाचे, फुगे काढायचे, रंग लावायचें, उघडं व्हायचं, भाराभर पातळं काढायचीं नि मग हें नेसूं कां तें नेसूं असं मनाशीं म्हणायचं आणि त्यांतलं एखादं नेसायचं. असं विचित्र वागणं आहे तिचं. तिचा हा कार्यक्रम झाला कीं, मग आम्हीं बाहेर येऊन लोडाशीं टेकून बसतों. मी स्वस्थच बसते पण ती मात्र तबकांतील विडे लावीत बसते. तिचे विडे होतात नाहीं तोंच अंधार पडतो आणि जिन्यावर कोणाची तरी पावलं दबकत दबकत पडत असलेलीं ऐकूं येतात. मी

उठते आणि कान टवकारून बघते. माझा गुरगुरण्याचा सूर निघूं लागतो तोंच मालकीण मला थोपटून शांत करते नि त्या गृहस्थाला 'या' म्हणून म्हणते.

ते गृहस्थ येतात आणि आमच्या शेजारीं लोडाला टेकून बसतात. बराच वेळ त्यांचे कार्यक्रम मुक्यानेंच होतात. शेवटीं त्यांना ग्लासांतून तांबडं पाणी देण्यांत येतं नि मग काय? त्यांचं तोंड इतकं सुटतं कीं बोलायची सोय नाहीं अगदीं ! आणि आश्चर्य असं कीं, ते तोंडांतून शब्द तर काढतातच पण धूरही खूप काढतात ! तें मात्र मला अगदीं असह्य होतं. मी तेथून निघून जाण्याचा विचार करतें पण माझा हा त्रास पाहून कीं काय मालकीणच त्यांना घेऊन आंतल्या खोलींत जाते. मला मात्र एकटीलाच त्या दालनांत पडून रहावें लागतें.

हे असले प्रसंग दररोज माझ्यासमोर घडतात पण मला मात्र त्यांत कांहीं कळत नाहीं. लोक येतात खरे पण मालकिणीशीं त्यांचें काय काम असतें देव जाणे. तसं पाहिलं तर माणूस पाहिला कीं मी त्याच्यावर तुटून पडायला पाहिजे. पण तसं होत मात्र कांहीं नाहीं. रोज नवीन नवीन माणसं येणार मग भुंकून भुंकणार तरी किती जणांवर. उलट आत्तांशीं कोणी आलं नाहीं कीं मी देखील मालकिणीप्रमाणें कावरी-बावरी होतें.

आमच्याकडे येणारे सगळेच लोक मला आवडतात असं नाहीं. उलट आपण होऊन प्रेम करावं अशीं माणसं फारच

थोडी. काय मेले एकेक असतात पण अहाहा ! धड कोणाला चालतां येत असेल तर शपथ. मेले येतात लंगडत आणि जातातही लंगडतच ! चेहरा पहाल तर नेहमीं आमच्या जातीसारखा लालघोटा मालकीण दिसली कीं निघालीच त्यांची जीभ बाहेर. मलाही पाहिलं कीं मोठे खूष होतात हे बिलंदर. कोणी मला जवळ घेऊन कुरवाळतात तर कोणी मला बिस्किटही पण देतात. कोणी कोणी माझ्याकडे पाहून म्हणतात कीं, " वा वा वा, काय मस्त कुत्री आहे पण. जरा मोठी होऊं द्या कीं, अगदीं भाव खाईल ही झिप्री." हे असं काहीं ऐकलं कीं असा राग येतो त्यांचा. म्हणे भाव खाईल. मोठेपणीं भाव खायचा कां पाव? काहीं कळत नाहीं ह्या लोकांना! आणि ह्या असल्यांच्यापुढें जायचं अगदीं जिवावर येतं माझ्या. पण काय करता मालकिणीचा हुकूम आहे ना कीं, असं कोणी आलं आणि काहीं बोलल तर निमूटपणें ऐकून घ्यायचं म्हणून.

पण ह्या गोष्टी समक्ष पाहून देखील माझी मालकीण कोण आहे ह्याचा मात्र मला उलगडा होत नव्हता.

* * *

मी जसजशी मोठी होत चालले तसतशी मला मालकिणीचीं रहस्यं उमगूं लागलीं. जसजस मला त्यांतलं कळूं लागलं तसतशी मी तिला दोष देऊं लागले. पण ते दोष देत असतांनाच एकीकडे मी देखील तसंच वागूं लागलें आहे ह्याकडे माझें नकळत दुर्लक्ष होत होतें.

: ६ :

पूर्वी मी मालकिणीबरोबर संध्याकाळच्या वेळीं खिडकींत बसायची. पण त्यावेळीं माझें लक्ष बाहेरच्या गर्दीपेक्षां तिच्या चेहऱ्याकडे असायचं. पण आतां मात्र तसं होत नव्हतं. चुकून—नव्हे जाणून बुजून माझं लक्ष गर्दीकडे जायचं. आणि व्हायचं काय कीं, माझं लक्ष नकळत एखाद्या कुत्र्याकडे जायचं नि मग भुंकायला लागायची त्याच्यावर त्यामुळें तीं कुत्रीं देखील माझ्यावर भुंकायचीं नि लांबलांब जिभा काढून व वर उड्या मारून मला खालीं बोलावण्याचा प्रयत्न करायचीं. त्यांचं हें जिव्हाळयाचं आमंत्रण ऐकलं कीं मला देखील खालीं जायचा मोह व्हायचा. पण मालकिणीच्या हातून मात्र सुटून जातां यायचं नाहीं. वाईट वाटायचं मला नि मी विचार करूं लागायची. खरंच आपण बदलत तर चाललों नाहीं ना ?

नाहीं म्हटल्यानें बदल होण्याचें थोडेंच थांबत असतें. माझ्यांतला बदल मला आतां उघड उघड दिसत होता. एखादे वेळीं मी आमच्या बिलोरी आरशासमोर उभी रहायची. त्यांत माझे ते काळेभोर केस, ते चकाकणारे पाणीदार डोळे, तें तरतरीत नाक, दिसायचं. अगदीं माझी मला दृष्ट लागण्याइतकं सुंदर दिसायचं. पण मग माझं मलाच वाटायचं, रूप नुसतं असून काय करायचं. चारचौघांत त्याचं प्रदर्शन व्हायला पाहिजे, त्याची स्तुति व्हायला पाहिजे, त्यांतच त्याचं महत्त्व. वेडी मी. पटलं तें मला नि मग मी तासन् तास खिडकींत

बसून घालवूं लागले. रस्त्यानें नाना प्रकारचीं कुत्रीं जायचीं. पण कोणाची नजर वर गेली नाहीं असं मात्र व्हायचं नाहीं. हें असं पाहिलं की, माझं अंग अभिमानानें फुगायचं. त्यांतच एखादा मस्त कुत्रा दिसायचा. आणि माझा जीव त्याकडे ओढ घेऊं लागायचा. पण त्याच्याकडे मला मात्र जातां यायचं नाहीं. अगदीं नाइलाज व्हायचा नि मी तिथेंच गजाशीं धक्काबुक्की करीत बसायची.

अलिकडे ह्या गोष्टी माझ्या हातून नेहमींच घडत असल्यामुळें मी त्या नकळत करीत आहे असं म्हणणं अगदीं चूक होईल. माझ्यांतल्या ह्या बदलामुळें एक गोष्ट मात्र मला उमगली होती नि ती म्हणजे माझ्या कोड्याबद्दलची. माझी मालकीण खिडकींत कां बसते, पुरुष माणूस दिसला कीं कां हसते, त्याच्याशीं लगट कां करते ह्या गोष्टी मला आतां अनुभवांनीं कळूं लागल्या होत्या.

—आम्हां कुत्र्याप्रमाणें माणसें देखील 'फाजील' असतात हें देखील मला कळलं !

मला जशा मालकिणीच्या ह्या कांहीं गोष्टी समजल्या होत्या तशा माझ्याही कांहीं गोष्टी तिच्या नजरेंतून सुटल्या नसाव्यात असं मला वाटतं. कारण अलिकडे माझ्यावर तिची नजर जरा विशेषींच कडक दिसत होती. कुंडींतली कळी उमलूं लागली कीं, ती कोणी तोडूं नये म्हणून तिची जशी नजर असायची तसं कांहींसं ती माझ्याकडे बघायची. पूर्वीसारखी ती

जरी मला मांडीवर घेऊन बसायची नाही तरी दूर मात्र कुठें जाऊं द्यायची नाहीं. इतकंच नव्हे तर मला आतां आपल्या सारखं करायचं असं देखील तिनं ठरवलं असावं असं मला वाटूं लागलं. कोणी आलं कीं मला मुद्दाम बोलवावयाचं, त्यांना दाखवावयाचं, कौतुक करून घ्यायचं असा तिनं हल्लीं कार्यक्रम ठेवला होता.

पण मला त्याचं देखील कांहीं वाटत नव्हतं. वाईट वाटायचं ते एका गोष्टीबद्दल नि ते म्हणजे मला कुत्र्यांपासून परावृत्त ठेवायचं ह्या तिच्या विचाराबद्दल. त्याचं असं व्हायचं कीं मी खिडकींत उभी राह्यची त्यामुळें साहजिकच खालीं कुत्रीं जमायचीं आणि हे कांहीं मालकिणीला खपायचं नाहीं. ती वसकन माझ्या अंगावर धांवून यायची आणि खसकन दारं ओढून घ्यायची.

ह्या तिच्या विचित्र वागणुकीचा मला कांहीं अर्थबोध व्हायचा नाहीं. मी नुसतं म्हणायची काय आंतल्या गांठीची माणसं असतात हीं !

पण एके दिवशीं तिच्या ह्याही वागणुकीचा मला उलगडा झाला. संध्याकाळची वेळ होती. ती आणि कोणी तरी गृहस्थ बोलत होते. मी खिडकींतून एका कुत्र्याकडे बघत होते. तो मला सारखा बोलावीत होता. मलाही जायची इच्छा होतीच. मालकिणीची नजर चुकवून मला कांहीं जातां येईना. शेवटीं मनाचा अगदीं हिय्या करून मांजरीच्या पाव-

लानें मी जिन्याकडे गेले. दोन पायऱ्या मी उतरते न उतरतें तोंच माझ्या पाठींत एक जोराचा धपाटा बसला. वळून पहाते तों धपाटा देणारी बाई खुद्द मालकिणच होती असें मला दिसलें. तिनें मला मानेला धरलें व फरफर ओढींत त्या गृहस्थाशेजारीं नेऊन बसवलें. माझ्याकडे एकवार रागारागानें पहात ती त्या गृहस्थाला म्हणाली, "पहा कशी आहे ती. इतके दिवस सांभाळली पण गेलीच शेवटीं शेण खायला. अहो अस्सल इंग्लिश कुत्री आहे ही. पण मेली अशी कुत्र्यांमागें हिंडूं लागली कीं साऱ्या रूपाची अगदीं नासाडी करून घेईल. पहा कसे केस आहेत तिचे. पण एक बाळंतपण होऊं द्या कीं, कशी अगदीं तरटासारखी दिसूं लागेल. मेलं स्वतः कांहीं कळत नाहीं नि दुसरे सांगतात तें ऐकून घ्यायचं नाहीं." ती काय म्हणाली हे मी कांहींच समजले नाहीं. पण तिच्या मोठ्या डोळ्यामुळें आणि तोंड भरभर खालीवर होण्यामुळें मी इतकं जाणूं कीं ही माझ्यावर रागावली आहे म्हणून. अर्थात् हें रागावणें मी कुत्र्यांच्या मागें जाते म्हणून आहे हें कळायला मला वेळ लागला नाहीं. मी कुत्र्यांच्या मागें जाते ह्यांत मी काय पाप करते. आणि त्याच्यांत मालकिणीनें वाईट वाटून घेण्याइतकं काय आहे हें कांहीं मला समजत नव्हतें. उलट ह्या पायीं मात्र मला चांगला आणि कधींही न खाल्लेला धपाटा खावा लागला होता. वाईट वाटत होतें मला त्या गोष्टीचें. जिनें आतापर्यंत कधींही रागानें देखील पाहिलें नव्हतें

तिनें ह्या वयांत क्षुल्लक कारणावरून, एका परक्यासमोर मला मारावें ह्याचेंच मला वाईट वाटत होतें. मी तेथें बसून रडूं लागले. पूर्वी मी अशी रडले असते तर किती वाईट वाटलें असतें माझ्या मालकिणीला ! पण आज ? तिला माझ्याविषयीं कसलीच सहानुभूति वाटत नव्हती. मी वर पाहिलें तेव्हां ती त्या गृहस्थाबरोबर प्रेमाचे चाळे करीत होती. तिनें एक फूल घेतलें व त्याला तें नजर केल. मला वाटलें आता तो तें फूल हुंगील व आपल्या कोटांत खोवून ठेवील पण त्यानें तसें केलें नाहीं. त्यानें तें फूल चुरगाळून, पाकळ्या पाकळ्या करून फेकून दिलें. त्या त्याच्या वागण्याचा अर्थ मात्र मला बरोबर समजला. त्यांना क्षणाचा आनंद पाहिजे कायमचा नको. त्यांना फुलांचा वास पाहिजे, कायमचीं फुलं नकोत. आणि तीं फुलं? त्यांना देखील ह्यांतच जीवनाचं सार्थक झाल्यासारखं वाटतं. त्याग तून दुसऱ्याकरतां अत्तर निर्माण करण्यापेक्षां क्षणाचा उच्छृखलपणा त्यांना जास्त प्रिय वाटतो. हे त्यांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान मला थोडेंच पटणार होतें.

मला माझ्या मालकिणीचा त्या दिवसांपासून तिटकारा येऊं लागला. ती माझ्यावर इतकं प्रेम कां करते, मला इतका ळळा कां लावते हें मला कळूं लागलें. वास्तविक रक्षण करणारी म्हणून प्रसिद्ध असलेल्या माझ्या जातीला तें काम सोडून केवळ हौस म्हणून आपल्याजवळ ठेवलें ह्यांतच मी समजलें होतें कीं ती मला काय किंमत देत आहे ती.

खरोखर राग यायचा मला. आणि वाटायचं काय दुष्ट बायका असतात ह्या. स्वत:चं जीवन तर ह्या बरबाद करतातच पण माझ्यासारख्या निष्पापांना लहानपणापासून संभाळून त्यांच्यावर प्रेम करून, लहानाचं मोठं करून शेवटीं केवळ आपली हौस म्हणून आमचं जीवन त्यांच्यासारखं घाण करतात. काय त्यांत त्यांना गंमत वाटत असेल देव जाणे !

काहीं तरी कारणं काढून हल्लीं मी तिच्यापासून जितकं दूर राहतां येईल तितकं दूर राहण्याचा प्रयत्न करीत होते. नव्हता लागत मला तिचा लळा, नव्हतं लागत मला तिचं प्रेम. त्यामुळें जिन्याखालच्या माझ्या खोलींतच मी पडून राह्यची. दररोज कोणीतरी नवीन लोक जायचे पण मी नाहीं गले कीं त्यांच्याबरोबर. इतकंच काय त्यांच्यावर भुंकलेही नाहीं तर नुसतें ढुंकून देखील पाहिलें नाहीं. कधीं कधीं मात्र मालकिणच मला बरोबर घेऊन जायची. मग मात्र माझा नाइलाज व्हायचा. पण काय करतां खाल्ल्या अन्नाला न जागायला मी माजर थोडीच होते ! मालकानें कितीही वाईट वागवलें तरी शेवटीं शेपटी हालवीतच आम्हीं जायचे.

असेंच कित्येक दिवस गेले. मालकिणीचे मात्र माझ्याकडे लक्ष जात नसे नि त्यामुळें मी मात्र मनांतल्या मनांत झुरत राह्यची. कोण्या कुत्र्यांवर प्रेम करायचा देखील गुन्हा होता तिच्या दृष्टीनें.

: १२ :

त्या दिवशींची गोष्ट. मी जिन्याखालीं स्वस्थ बसले होते. रात्रीं आठ नऊचा सुमार होता. कोणाची तरी धाडधाड पावलं वाजलीं पण नेहमींप्रमाणें मी कांहीं लक्ष दिलं नाहीं. तोंच त्या मागून लहान लहान पावलांचाही चटचट असा आवाज मला ऐकायला आला. त्यामुळें कुतूहल निर्माण होऊन मी मान वळवून पाहिलें तों एक मस्त झिप्रा कुत्रा माझ्या दृष्टीस पडला. नकळत मी त्याच्यावर भुंकले. तोंच त्यांची नजर माझ्यावर गेली आणि आश्चर्य असं कीं, त्यांना पाहिल्यावर मी भुंकण्याचेंच विसरून गेले. क्षणभर आमची एकमेकांवरची नजर ढळलीच नाहीं. त्यांचा मालक काणी तरी पठाण दिसत होता. तो वर गेला हें पाहून स्वारीनें वर न जातां तडक माझ्याकडे धांव घेतली. ते माझ्याजवळ आले आणि सरळ त्यांनीं माझ्या तोंडाला तोंड लावलं. वास्तविक मला न आवडणारी अशी गोष्ट घडली होती पण त्यांच्या गोड स्पर्शामुळें मला ज्या गुदगुल्या झाल्या त्यामुळें त्याचं कांहींच वाटलं नाहीं. बराच वेळ कोणी कोणाशीं बोललं नाहीं. शेवटीं आम्हीं दोघेंही उभे राहून कंटाळल्यामुळें खालीं बसलों. तोंच त्यांची नजर माझ्या गळ्यांतील सांखळीकडे गेली, आणि त्यांनीं मला विचारलें, “ अरेच्या अजून गळ्यांत सांखळी ? ” मी कांहींच बोललें नाहीं. मला रडूं येऊं लागलं. मी रडत आहे असं पाहून ते म्हणाले, “ माफ करा हें मला माहीत नव्हतं तुमची मालकीण इतकी दुष्ट असेल म्हणून ! ”

त्यांचे हे जिव्हाळ्याचे शब्द ऐकल्यावर मलाही त्यांच्याशीं बोलावेंसें वाटूं लागलें, मी म्हणाले, " खरंच किती कुचंबणा होती आहे माझी इथं—पण नको बाई पहिल्याच भेटींत अशी रडकथा ऐकवायला, " असें म्हणून मी गप्प बसले. ते कांहीं बोलणार तोंच वरून आमची मोलकरीण माझ्यासाठीं थोडेसें दूध व पाव घेऊन आली. तिनें ते माझ्यासमोर ठेवलें व ती निघून गेली. मग मी त्यांच्यापुढें ती कपबशी ठेवली. तेव्हां ते म्हणाले, " वा वा, तुम्हीही घ्याना " त्यांची ही प्रेमळ भाषा ऐकून माझाही संकोच नाहींसा झाला व आम्ही दोघेही तें दूध पिवूं लागलों. त्यानंतर किती वेळ आम्हीं गप्पा मारल्या. रात्र पडली. रस्त्यावरची गर्दी कमी झाली, गुरखे काठी आपटीत हिंडूं लागले तरी कांहीं वेळेचं भान राहिलं नाहीं आम्हांला. मध्यरात्र झाल्यावर त्यांचे मालक वरून खालीं आले. मग मात्र त्यांना नाइलाजानें उठावें लागलें. ते गेले. जातांना त्यांनीं हळूंच गोड नजरेनें माझ्याकडे पाहिलें. मला वाटलं खरंच त्यांनीं आपलं हृदय जिंकलं म्हणून. किती. गोड होते नाहीं ते. त्यांचे ते डोळे, तें लांब सडक केंस, ते तरतरीत नाक अगदीं थेट माझ्यासारखं, खरंच प्रेमांत पडल्यानंतर किती तरी गोष्टींची साम्यता आपोआप दिसायला लागते नाहीं. ते आतां गेले. पण ते माझ्यापासून कधीं हलूंच नयेत असं मला वाटायला लागलं होतं. पण—पण प्रेमी जनांत इतरांचे अडथळे येत नाहींत असं कधीं झालं आहे कां? मला

त्यांच्या सहवासानं एक प्रकारची गोड गुंगी आली होती, त्यामुळें कशाचं कांहीं फारसं वाटत नव्हतं मला. पण त्यांतूनही मी एकदम उठले. केवढी चूक केली होती मी माझ्या धांदरटपणांत. ते कोण ? कुठें राहतात ? ते परत भेटतील कां ? कश्याची म्हणून मी चौकशी केली नव्हती. इथं काय दररोज नाना प्रकारचे लोक येतात. पण मला थोडंच त्याच्यावर प्रेम करायचं आहे.माझं प्रेम—खरच माझं त्याच्यावर प्रेम बसलं होतं. पण आता येतील कां ते हून मला भेटायला. आणि मग मला मात्र रडूं आवरेना. सारी रात्र मी तशीच तळमळत काढली.

ओढ असली कीं साऱ्या गोष्टी मनासारख्या होतात. दुसऱ्या दिवशीं मी व माझी मालकीण खिडकींत बसून रस्त्यावरची गंमत पहात होतों. मालकीण कुठें पहात होती कोणास ठाऊक पण माझें मात्र सगळें लक्ष त्यांच्या वाटेकडेच लागलें होतें. रात्र झाली. दिवे लागले. तरी पण ते आले नाहींत. त्यांनीं मला फसवूं नये म्हणून मी मनांतल्या मनांत देवाची प्रार्थना करूं लागले. तोंच त्यांचें भुंकणें मला ऐकूं आलें. मी धांवत जिन्याकडे गेले. खरंच आले होते ते. ते जसजसे वर चढूं लागले तसतसे माझ्या अंगावर रोमांच उठूं लागले. ते वर आले नि त्यांनीं मला आलिंगन दिलें व चुंबन घेतलें. माझी मालकीण हे सगळे प्रकार पहात होती. तिच्या डोळ्यांदेखत मी एका कुत्र्याचें चुंबन घेत आहे हें पाहून ती खूप रागावली. तिनें तबला ठोकायचा हातोडा घेतला

व ती माझ्या अंगावर धांवली. ती जवळ येऊन माझ्यावर हातोडा उगारणार तोंच तिचा हात वरच्यावर त्यांच्या मालकांकडून–पठाणाकडून पकडला गेला. त्यामुळें मला एक-प्रकारें जीवदानच मिळाल्यासारखें झालें. पळून जाण्यासारखी ही संधि असल्यामुळें मी तावडतोब तेथून कूच केलें. तें पाहून मात्र तिचा राग अनावर झाला व ती धांवून येऊं लागली. तोंच तिच्या पठाणानें परत तिला अडविलें व तक्याला नेऊन बसवलें. काय झालें म्हणून मी परत जिन्याच्या दोन चार पायऱ्या चढून कठड्याच्या फटींतून पाहूं लागले त्या-वेळीं पठाण तिला म्हणत होता, " दोनों अब्बी लयला मजनून हो गये हैं ! उनको रोकनेमें अब्बी क्या फायदा ! जो कुछ करनेका था वो उन्होंने कलही कर डाला है। " त्यांचे ते शब्द ऐकून ती फारच थिजली आणि कपाळावर हात आप-टून स्वस्थ बसली. तें दृश्य पाहून मला तर हंसूच आवरेना. एकवार पठाणाचें आभार मानून मी तेथून धूम ठोकली.

आम्हीं जिना उतरून रस्त्यावर आलों. मी इकडे तिकडे पाहिलें. मला जरा भीतीच वाटली. आतांपर्यंत खूप वेळां मी मालकिणीबरोबर बाहेर गेलें होते. पण आतां ह्यांच्याबरो-बर असं पळून जायचं मला कससंच वाटूं लागलं. मी खालीं मान घालून त्यांच्याबरोबर चालूं लागले. कुठें जायचं हें ठरलं नव्हतं तरी पण आमचे पाय आपोआपच गांवाबाहेर जात होते. गांवाबाहेर एक नदी होती तिथें खूप

लोक फिरायला यायचे. तेथें वाळूंत बसून गप्पा मारायला फारच मजा यायची. आम्हींही त्या वाळूंत एक मोकळं ठिकाण पाहून बसलों. खूप वेळ कोणी कोणाशीं बोललं नाहीं. इतर जाणारे येणारे आमचा तो सुंदर जोडा पाहून हंसायचे, आमचं कौतुक करायचे. त्यामुळें एक प्रकारचा अभिमान वाटला मला. असंच आमच्याविषयीं कोणी तरी म्हणत असतांना ते मला म्हणाले, " खरंच कां आपण सुंदर दिसतो एवढें ? "

" तर मग उगीच कां स्तुति करतात लोक आपली."

" छे. मला वाटतं माझ्यापेक्षां तूंच सुदंर आहेस."

" वा वा. तुम्हींच अहां सुंदर माझ्यापेक्षां."

" बरं जाऊं द्या ते—विचारीन विचारीन म्हणत होतो. पण विसरायचा मी."

" काय ते ? "

" तुझं नांव काय ? "

" माझं नांव ?—माझं नांव चंपी– आणि तुमचं "

" माझं नांव रुस्तुम."

" रुस्तुम–दुसऱ्या जातीचं नांव."

" नांव असेना कां दुसऱ्या जातीचं. आपली जात तर एक आहे ना मग काय ? "

" हो ना. म्हणून तर ओढ लागली आपल्याला एक-मेकांची."

" आणि म्हणून एकमेकांचं प्रेम बसलं आहे."

" खरंच एक विचारूं कां ? "

" हो हो."

" तुमचं माझ्यावर खरं प्रेम आहे ना ? "

" म्हणजे हें काय विचारणं तें—अग उगीच कां धड-पडत येतों मी तुझ्याकडे."

" तसं नाहीं. पण—"

" तसं नाहीं तर मग कसं."

" तुमचं माझ्यावर प्रेम आहे—"

" बोल बोल."

" खरं प्रेम असायला कांहीं तरी त्याग करायला हवा नाहीं एकमेकांसाठीं—आपण लग्न करूं यांत कां ? "

" लग्न अन् ते कां ? अग वेडे आपल्यांत लग्नाची पद्धत तरी आहे कां ? "

" तसं नाहीं मी म्हणत पण खरं सांगू आपण लग्न केल्यानें काय होणार आहे तें. माझी मालकीण आहे ना तिच्या जाचांतून मी सुटणार आहे एकदाची. किती छळ करते आहे ती माझा. हौस म्हणून तिनें मला ठेवून घेतलं तें कायम मी तसंच तिची चैन म्हणून रहावं असें तिला वाटतें. मला पोरं होऊं नयेत, इतकंच काय मी कुत्र्यांच्या

मागें लागूं नये असा तिचा कटाक्ष आहे. पण तुम्हींच सांगा माझ्या जवानिला हीं बंधनं पेलण्यालारखीं आहेत कां? मला पोरं हवींशीं वाटतात ह्यांत माझा कां कांहीं दोष आहे. पण तें तिला पटत नाहीं. म्हणून म्हणते एकदां आपण लग्न केलं कीं मी कायमची सुटेन तिच्या त्रासांतून."

"मी तुला सोडवतो तिच्या जाचांतून. त्यांत काय आहे एवढं अवघड. पण स्वैर वागणारे आपण आपल्याला कशाला हवींत हीं बंधनं."

"तीं बंधनं हवींत म्हणूनच मला लग्न करावेंसें वाटतें. लग्नाशिवाय प्रेमाची पूर्तता होत नसते असं माझं प्रामाणिक मत आहे. जगांत सुखाला सगळेच लालचावलेले असतात पण दुःखाचं मात्र भागीदार कोणाला व्हावंसं वाटत नाहीं. तसं वाटायला जर पाहिजे असेल तर त्याला कुटुंब पद्धतीचाच जिव्हाळा निर्माण व्हायला पाहिजे. तसा जिव्हाळा निर्माण झाला आणि तो दुःखाचा भागीदार होऊं लागला कीं त्याला आपोआप पटेल कीं लग्न हें बंधन नाहीं म्हणून. आणि खरंच लग्न हें तरी बंधन कां वाटावं आपल्याला? ज्या जातीनं दुसऱ्यांची गुलामगिरी पत्करली त्यानें बायका-मुलांना बंधन म्हणण्यांत काय हंशील आहे. सबलांची हांजी हांजी करायची आणि दुर्बलांची अवहेलना करायची ह्यांत कसला आला आहे मोठेपणा. पण इमानदार म्हणून समजल्या गेलेल्या

आपल्या जातीला तो एक डाग आहे हे मात्र खरं. हेंच पहा ना. आपल्यांत लग्न हें बंधन वाटत असल्यामुळें तुम्हीं आमच्याकडे फक्त सुख देणारी वस्तु म्हणून पाहता. आम्हीं जवानींत असतो त्यावेळीं तुम्हीं आमच्याकडे येतां. शरीरसुख उपभोगतां. आणि 'कुचकामी' म्हणून आम्हांला टाकून निघून जातां पण पुढें दुःखाचे डोंगर कसे उभे असतात हें कधीं तुम्हीं पाहतां का ? अहो कोणी कुत्रं देखील विचारीत नाहीं आम्हांला ! दिवस दिवस जड पोट घेऊन हिंडायचं, उन्हातान्हांत भटकून अन्न मिळवायचं. नाहीं मिळालं तर तसंच पडून रहायचं. नंतर कुठें तरी पोरांना जन्म द्यायचा, हाल सहन करून त्यांना लहानाचं मोठं करायचं आणि—आणि जगाच्या उपयोगाकरतां देऊन टाकायचं, कारण बापाच्या अंगीं असलेली माया त्याच्या हाडामासांत खिळलेली असते. तेही केलेले उपकार विसरून जातात. तशा दुःखांत चिपाड झालेल्या आम्हीं भटक भटक भटकतों. हौस म्हणून कोणी आम्हांला ठेवीत नाहीं. रक्षण म्हणून आम्हांला कोणी बोलवीत नाहीं. अशा हीनदीन अवस्थेंत सगळयांचें हाड हाड म्हणवून घेऊन दिवस कंठायचे. सांगा सांगा हे हाल आम्ही कां म्हणून पत्करायचे ? पुढं दुःख दिसत असून आम्हीं सुखाच्या भावनेनें तुमच्या आधीन व्हायचं दोघांनीं सुख उपभोगायचं. आणि शेवटीं मात्र आम्हांला दुःखांत टाकून निघून जायचं. ह्यांत तुम्हांला कांहींच कां वाटत नाहीं. आणि

ह्याचसाठीं मला लग्न करून आपल्या जातीला पटवून द्यायचं आहे कीं, एकानं सुख व दुसऱ्यानं दुःख अशी वाटणी न करतां संसार करून सुख दुःखं दोघांनीही सारखी वाटून घेतल्यामुळें जीवनांत खरी रम्यता येते म्हणून."

"लग्न करायचं एवढंच ना? मग त्यांत काय एवढं अवघड. करूं कीं लग्न. तेवढ्यानें जर माझं तुझ्यावरचं प्रेम सिद्ध होणार असेल तर करतों लग्न."

"ह्याही गोड भाषेची मला फार भीति वाटते. तुम्हीं लोक गोड गोड बोलतां. करायचं तें करून घेतां आणि मग जी दडी मारून बसतां तें कांहीं परत वर येत नाहीं. तुम्हांला लग्नं हवींत पण संसार मात्र नको असतो. असंच ना? तुमचे मालक ते पठाण पहा दूर देशावरून इथें येतात. धंदे करतात. चैन करावीशी वाटली कीं, कुठेंही पैशाचं नि प्रेमाचं आमिष दाखवून दोन घटकेची मजा करतात. तशीं कुत्रीं मला नको आहेत. त्यांना मुलं नकोत सांभाळायला. फक्त फुलांचा वास पाहिजेल. तशा प्रेमालाच मी पठाणी प्रेम म्हणते. असं प्रेम मला नको. तुम्ही त्या पठाणाच्या संगतींत आहांत त्यामुळें जरा भीति वाटते. ज्यांनीं तुमचं नांव बदललं त्यांनीं तुमचं हृदयही बदललं असेल असं वाटतं. माफ करा हें स्पष्ट बोलते ह्याबद्दल पण सुरवातीलाच आपल्या कल्पना सांगितल्या म्हणजे पुढें जड जात नाहीं कोणाला."

मी थांबले. नंतर ते मला म्हणाले, "सगळेच गुलाम कांहीं मालकासारखं वागत नसतात. माझं नाव बदललं त्याचं कारण ती त्याच्या हातांतली गोष्ट आहे म्हणून–म्हणून हृदय थोडेंच त्याला बदलतां येणार आहे. इतकं कशाला तूं तुझ्या मालकिणीकडे आहेस ह्यावरून तूंही तिच्यासारखीच आहेस असं कोण म्हणेल."

त्यांच्या ह्या बोलण्यावर आम्हीं दोघेही खूप हसलो. ते थोडे पण मार्मिक बोलणारे आहेत. मी मात्र खूप बोलले. पण ते त्यांना पटल्यामुळें मला त्याची तितकीशी जाणीव झाली नाहीं. इतक्या वेळपर्यंत सर्वत्र शांतता झाली होती. नदीकांठचा गार वारा अंगाला झोंबत होता. पायाखालची वाळू जास्त जास्त कुशींत शिरल्यामुळें ऊब देत होती. मी इकडे तिकडे पाहिलें अंधारांत कोणी दिसत नव्हतं. असं पाहून मी हलकेंच त्यांना बिलगले, किती उन्मादकारी स्पर्श वाटत होता त्यांचा. त्यांनीं माझं चुंबन घेतलें तेव्हां तोंडा-पासून तोंड दूर नेऊंच नये असें मला वाटत होतें. पण ते कसले चावट त्यांनीं हलकेंच तोंड काढून माझ्या स्तनाला स्पर्श केला. त्याबरोबर मी उन्मादानें बेहोष होऊन त्यांना जास्त जोरानें आलिंगन दिलें. आणि त्यानंतर थोड्याच वेळांत आम्ही प्रेमाच्या पूर्णतेंत पूर्णपणें अडकलों गेलों.

दुसरें दिवशीं ते मला जागा पहावयास जातों म्हणून सांगून गेले. आणि मी तडक मालकिणीच्या घरीं आले. माझ्या

खोलीजवळ रात्रीचें दूध ठेवलें होतें. तें मी घटघटा पिवून टाकलें. रात्रभर पोटांत कांहीं नसल्यामुळें मला कसेसेंच होत होतें पण त्यां दुधामुळें मात्र माझ्या अंगांत बरीचशी हुशारी आली. थोडा वेळ थांबून मी वर जाण्याचा विचार करूं लागले. पण प्रत्यक्ष जेव्हां मी जिना चढत होतें तेव्हां माझी छाती भीतीनें धडधडत होती. मालकीण आतां काय बोलेल आणि काय नाहीं हें सांगणें मोठें कठीण होतें. त्या विलक्षण अवस्थेंत मी वर गेले. समोरच माझी मालकीण बसली होती. मला बघतांच ती ताडकन् उठली आणि रागारागानें अंगावर धांवून आली. आहे हा काय प्रकार आहे हें मी ओळखलें होतें. मी मुकाट्यानें ओशाळल्यासारखा चेहरा करून कोपऱ्यांत जाऊन बसले. मालकीण माझ्याजवळ आली नि म्हणाली, "कां ? झालीनं सारीं सोंगं करून. आतां मरा तिकडे. होऊं द्या भाराभर पोरं. मेलीला सांगितलं पण ऐकलं कांहीं नाहीं. केलं नसतं तसं कांहीं तर का जीव गेला असता. हौसेनें पाळली तर गेली मेली आपल्या वळणावर. जा. जा. आतां पड उकिरड्यावर." मी कोपऱ्यांत अंग चोरून, डोळे किलकिले करून, भ्यालेल्या दृष्टीनें तिच्याकडे बघत होते. तिचे रागानें लाल झालेले डोळे मला पहावेतना म्हणून मी हलकेंच माझी नजर खालीं केली तोंच पाठींत एक जबरदस्त फटका बसला. मी कळवळलें अगदीं. त्यानें माझा स्वाभिमान जागा झाला. नि मी कधींही न

केलेला प्रकार केला म्हणजे मी तिच्या अंगावर गुरगुरूं लागले. तोंच परत एक फटका माझ्या पाठींत बसला. मग मात्र तेथें एक क्षणभरही उभी न राहतां मी घर सोडलें आणि बाहेर रस्त्यावर आले.

पूर्वी मी अशी कधीं बाहेर आले असते तर मला फार भीति वाटली असती पण आज मला त्यांचा पाठिंबा असल्यामुळें त्या बाहेर येण्यांतही मला एक प्रकारचा स्वाभिमान वाटत होता.

पण—पण कुठें शोधायचें त्यांना हा प्रश्न तत्काळ माझ्यासमोर उभा राहिला आणि त्यामुळें मी लगेच निराश झाले. त्यांचा पत्ता त्याना विचारला नाहीं. ही होऊं नये अशी चूक झाली होती तरी पण आतां स्वस्थ बसून थोडेंच भागणार होतें. कसेंही करून त्यांना शोधून आणणें मला भागच होतें. त्यांना शोधण्यासाठीं मी गांवात भटकूं लागले. नाहीं नाहीं त्या ठिकाणीं त्यांचा शोध केला पण ते कांहीं मला भेटले नाहींत. रात्र झाली तेव्हां कदाचित् ते आपल्याकडे येतील म्हणून मी घाईघाईनें घरीं आले. सबंध रात्र वाट पहात घालवली पण ते कांहीं आले नाहींत. खरंच ते इतरांप्रमाणें तर माझ्याशीं वागले नसतील ना अशा मला शंका येऊं लागल्या. पण त्यांचा तो भाबडा चेहरा आणि त्या शपथा आठवून मला त्या कल्पना वेडगळपणाच्या वाटूं लागल्या.

दुसरा दिवस तसाच गेला, तिसरा गेला आणि आठवडा-ही पण तसाच गेला. पण ते कांहीं मला भेटले नाहींत. संसारांचीं केलेलीं स्वप्नें आणि त्यांच्यापासून अपेक्षिलेल्या गोड कल्पना ह्या तशाच तर विरघळून जाणार नाहींत ना ह्याची मला भीति वाटत होती. सुधारणावादी स्त्रीला अपेक्षाभंग ही आत्महत्या वाटत असते. आतां मला ह्या जगांत तोंड दाखवावयाला जागा उरणार अशीच जणुं मी कल्पना करून घेतली होती. त्या निराशेंत असतांनाच मी त्यांच्या शोधार्थ भटकत होतें. तोंच एका गल्लींत ते मला दिसले. दिसले खरे पण त्यांना पहाताच मला भोंवळ आली. ते एका कुत्रीबरोबर हिंडत होते.

त्या दिवशीं ते दृश्य पाहून मला फार वाईट वाटलें. आणि उगीच आपण त्यांच्या मोहपाशात पडून स्वतः दुःखांत लोटून घेतलं असं वाटूं लागलं. नाहीं तरी आतां कोण विचारणार होतं मला. पूर्वीं मी त्यांच्यासमोर जे एका कुत्रीचं भेसूर चित्र उभं केलं होतं तेंच आज माझ्या वाट्याला येणार कीं काय म्हणून माझं अंग भीतीनं थरथर कापूं लागलं. वाटत होतं राहिले असते मालकिणीच्या म्हणण्याप्रमाणं तर काय बिघडलं असतं. तारुण्याचं प्रदर्शन झालं असतं तर झालं असतं. त्यांत काय, पण सगळं आयुष्य तर सुखानं कंठलं असतं. पण आतां ते विचार तरी करून मी काय करणार होते ? नशिबाला दोष देऊन स्वस्थ बसण्यापलीकडे दुसरा कांहींच इलाज नव्हता.

पण अपरूपाची गोष्ट अशी कीं त्याच दिवशीं ते माझ्या-कडे आले. त्यांना पाहिल्यावर चेहऱ्यावर जरी मी लटका राग दाखवला होता तरी पण आंतून खूप आनंदी झाले होते. त्यांचा मालक वर गेला आहे असें पाहून मी खूप त्यांची हजेरी घेतली. तेव्हां ते म्हणाले, " अग तुझ्यासाठीं जागा पहात होतों मी." हे त्यांचे ढोंगी उद्गार ऐकून मात्र माझ्या अंगाचा अगदीं तिळपापड झाला आणि मी त्यांना खचखट-पणें म्हटलं, " जागा पाह्यला कुत्री काय करायची हो बरोबर घेऊन. मी पाहिलं सारं. आत्तां येणारच नव्हते मी तुमच्या-बरोबर पण निश्चय केलेल्या ध्येयवादी स्त्रीला असं मागें हटून चालत नाहीं म्हणून, आणि माझ्या कल्पना मला अस्तित्वांत आणायच्या आहेत म्हणून मी आज तुमच्याबरोबर येणार आहे. तुम्हीं नाहीं म्हटलं तरी तसेंच मागें लागणार आहे. छू: म्हटल्यावर भुंकायचं आणि हाड म्हटल्यावर मागें यायचं अशी संवयच लागली आहे मला."

हें ऐकल्यावर मात्र त्यांचा चेहरा पडला आणि ते त्यावर कांहीं तरी म्हणणार तोंच त्यांचा मालक खालीं आला. त्या-मुळें त्यांचें बोलणें तसेंच अर्धवट राहिलें नि ते मला म्हणाले, " बरं आतां चल. त्या कुत्रीबरोबर मी कां हिंडत होतों हें सांगेन मग केव्हां तरी " असें म्हणून ते त्या पठाणाच्या मागें मला घेऊन जाऊं लागले.

मी, ते व तो पठाण असें आम्हीं तिघेजण त्या रस्त्यानें चाललों होतों. तो पठाण त्यांना उद्देशून म्हणाला, " ऐ बे,

थे क्या लाया है तुमने, अबे, आज तेरे लिये नई नई दुल्हन पैदा की है, छोड दो इसे. " त्यांचें बोलणें आम्हांला कांहींच कळलें नाहीं. मी मात्र वेड्यासारखा चेहरा करून त्यांच्यामागून जात होते.

एक दोन गल्ली बोळी ओलांडून आम्हीं एका घरापाशीं थांबलों. घर दुकानासारखें बसकें होतें. आंत दोन खाटा होत्या. कोपऱ्यांत एक भली मोठी तिजोरी होती. खुंटीवर कांहीं कपडे टांगलेले दिसत होते. एका कोपऱ्यांत दोन चार भांडीं व सांखळी पडलेली होती. ह्या निर्जीव वस्तूंना साजेशेच असे दोन सजीव पठाण आडवे तिडवे त्या खाटेवर शांतपणें पडले होते. त्या दोघांच्यामध्यें एक टक्कल पडलेला पठाण एका हातानें गुडगुडी ओढीत व दुसऱ्या हातानें कांहीं तरी थोपटीत होता. मला लांबून कांहीं दिसलें नाहीं पण मी जशी आंत शिरूं लागले तशी त्याच्या काखेखालीं ती वस्तू चुळबूळ करूं लागली. तोंच मी ओळखलें कीं ती कुत्री असावी म्हणून. आमची चाहूल लागतांच तिनें भुंकण्यास सुरवात केली. माझ्या घरांत मी पाय ठेवीत असतांना पहिल्या प्रथमच हें गुरगुरणें मला अपशकुनी वाटलें. तरी पण हिय्या करून मी आंत शिरलेंच. आमचे हे जबरदस्तीनें घरांत शिरणें तिला खपलें नसावें कारण ती जास्तच गुरगुरूं लागली. तिची गडबड जेव्हां जास्त वाटली तेव्हां ह्या पठाणानें तिला बगलेंतच जोरानें आवळून धरून शांत केलें व तो त्याच्याकडे

पहून म्हणाला, " रुस्तुम, चल आ इधर, देख तेरी नई औरत." रुस्तुम हे नांव ऐकतांच ते त्याच्या अंगावर उडी मारून बसले व त्या कुत्रीला चाटूं लागले. त्यांचा तो लघळपणा मला बिलकूल पहावेना. मी लगेच पुढच्या पायानें तोंड झांकून घेतलें.

थोड्या वेळानें माझ्या कानाला जरा गरम वारा लागला म्हणून मी वर पाहिलें. तो ते मला उठवीत होते. मी घाईघाईनें उठून उभी राहिले आणि जसं कांहीं कहींच झालं नाहीं असा चेहरा करून त्यांना म्हणाले, " चलायचं ना आपल्या नवीन घरीं."

माझी उतावीळता ध्यानांत घेऊन देखील ते तितक्याच शांतपणें म्हणाले, " मग हें कोणाचें घर आहे."

" छे. उगीच थट्टा हें काय आपलें घर आहे होय–आपलं काय ठरलं होतं दोघांचं मिळून नवीन घर घ्यायचं म्हणून ना ? "

" पण ह्याला काय झालं."

" कांहीं नाहीं–पण ही इथं कोण नवीन–"

" ही माझी दुसरी बायको."

" दुसरी ? काय बोलतां हे तुम्ही. आपलं काय ठरलं होतं. आपण दोघांनींच संसार करायचा म्हणून ना."

" बरं मग ? "

" पण तुम्हीं तर–"

" अग दोन बायका—नाहीं आणखीन चार बायका केल्या म्हणून तुझ्यावरचं माझं प्रेम थोडंच कमी होणार आहे—उद्यां तूं बाळंतीण झाली म्हणजे तुला अन्न देईल—पोरांचा सांभाळ करील—आणि—"

" हो तें सगळं खरं—पण मध्यंतरीं तुम्हीं हिच्या नादानें माझ्याशीं तुटक वागलांत तसें वागूं लागला तर ? "

' म्हणजे ? तुझं म्हणणं काय चोवीस तास मी तुझ्याच-जवळ रहावं म्हणून ? वा वा वा. काय गोड कल्पना आहे तुझी संसाराची ! अग, तुझें दुःख तुझ्या म्हणण्याप्रमाणें मी वाटून घेतलें म्हणजे झालें ना ? मग माझं सुख मी कसंहीं भरून काढील. नाहीं तरी आज मला जें सुख हवं आहे तें तूं थोडंच देणार आहेस ? "

" काय, काय बोलतां तुम्हीं. इतक्या उलट्या काळजाचे तुम्ही असाल असं नव्हतं मला वाटलं. तुम्ही मला संसाराची वचनं दिलींत, ती कां अशा रीतीनें फेडण्यासाठीं ? आज मी तुमच्या दृष्टीनें निरुपयोगी झाले आहे. उद्यां ही पण माझ्यासारखीच निरुपयोगी होईल. मग तुम्हीं तिला सोडून तिसरीकडे जाल. चवथीकडे जाल. हेंच मला होऊं द्यायचं नव्हतं. मला आपला दोघांचा संसार आदर्श करून दाखवा-यचा होता. जगाला अनुभवांनीं पटवून द्यायचं होतं कीं, जनावर म्हणून समजल्या गेलेल्यांना देखील संसार करतां

येतो म्हणून—पण—पण माझ्या साऱ्या कल्पनांचा साऱ्या अशा आकांक्षांचा असं वागण्यानं तुम्हीं चोळामोळा करून टाकलांत. असं वागायला तुम्हांला लाज नाहीं हो वाटत. एकदां नरकांत पडलेली अबला ही सुधरावयाची लोकांना मुळीं इच्छाच होत नाहीं. नव्हे ती स्वतःच्या महत्वाकांक्षेवर त्या नरकांतून वर येऊं लागली तरी त्यांना तें खपत नाहीं, हेंच खरं."

" खरं काय नि खोटं काय—अग मी तुला थोडंच हांकलून देत आहे. चांगलं रहा म्हणतोंय पण तुलाच कुठं रहावतंय. जगांत काय दोन दोन बायकांचे संसार नसतात काय ?"

एक एक शब्द ते अगदीं शांतपणें बोलत होते. पण मला मात्र ते शब्द एखाद्या बाणासारखे जिव्हारीं लागत होते. मी रागानें अगदीं लाल झाले. पुढें काय होणार होतें ह्याची मला कल्पना आली होती. त्यामुळें तो राग जास्तच अनिवार होत होता. शेवटीं मला अगदीं रहावेना. मी खाडकन् त्यांच्या श्रीमुखांत पांचनखी पंजा मारला. त्यांनाही तें सहन होणं शक्य नव्हतें. गुरगुरून ते माझ्यावर धावून आले. माझ्या अंगात कांहींच त्राण उरला नसल्यामुळें मला प्रतिकार करतां आला नाहीं. त्यामुळें रक्तबंबाळ होईपर्यंत मला मार खावा लागला.

शेवटीं कशीबशी त्या पठाणांना माझी दया आली आणि त्यांनीं माझी सुटका केली व बाहेर घालवून दिलें. रक्तबंबाळ झालेली मी क्षणभरही उभी राहूं शकलें नाहीं. मी तिरीमिरी

घेऊन धाडकन् जमिनीवर पडले. पुढें काय झालें तें मात्र मला कांहींच कळलं नाहीं.

*　　　*　　　*

ह्या माझ्या दुर्दैवी कहाणीला आज चार वर्षें तरी झालीं असतील. सृष्टिनियमांप्रमाणें मला पुढें मुलं झालीं. तीं मोठीं झालीं आणि मला सोडून गेलीं. आणि आज मात्र मी—

माझ्या सुखाला, माझ्या कल्पनेला, माझ्या मानलेल्या नवऱ्याला, माझ्या मुलांना, माझ्या मालकिणीला, माझ्या गांवाला, माझ्या सौंदर्याला, माझ्या त्या काळ्याभोर केसांना, त्या चकाकणाऱ्या डोळ्यांना, सगळ्यांना गमावून बसलें आहे

आज मी म्हातारी दिसत आहे. त्यामुळें निसर्गनिर्मित अशा कांहीं गोष्टींचं मला कांहींच वाईट वाटत नाहीं. वाईट वाटतंय तें एकाच गोष्टीचं आणि तें म्हणजे आदर्श म्हणून ठेवलेल्या लग्नाच्या आणि संसाराच्या खलास झालेल्या कल्पनेचं, त्याहिपेक्षां वाईट वाटत आहे तें आमच्या समाजाचं, त्याच्या त्या स्वच्छंदी वृत्तीचं, रूढीला चिकटून राहणाऱ्या त्याच्या त्या मनाचं, उपभोग घेऊन दुसऱ्याच्या सुखाकडे दुर्लक्ष करणाऱ्या त्याच्या त्या बुद्धीचं म्हणजे त्याच्या त्या पठाणी प्रेम करणाऱ्या वृत्तीचं !

———

२

# दडपलेल्या ठिणग्या

खण् खण्

ट्रॅम सुरू झाली.

गिरगांवांतून चाललेल्या ट्रॅमच्या दुसऱ्या मजल्यावर एक खादीधारी रस्त्यावरच्या गर्दीची गंमत पहाण्यांत गुंग झाला होता.

मुंबईचा रस्ता, त्यांतून गिरगांवसारखी वस्ती मग गर्दीला काय तोटा. नाना तऱ्हेचे लोक, नाना तऱ्हेच्या स्त्रिया, नाना तऱ्हेचीं दुकानं, त्यांतून नाना तऱ्हेचा माल आणि नाना तऱ्हेची गडबड.

पण ही गडबडीची गंमत ट्रॅममधूनच बरी वाटते. जवळ जाऊन थोडंसं नीट न्याहाळून पाहिलंत तर वाटेल कीं—

ते पहा ते दुकानदार, पहा कशी बडबड चालली आहे त्यांची. हातांत माल घेऊन पहा कशी भरमसाट स्तुति करीत आहेत. गिऱ्हाईकाला आपण आपला माल कसा पाजूं आणि त्याच्या खिशाला ज स्तींत जास्त कशी चाट लावूं ह्याकडेच त्यांची दृष्टि.

आणि तें गिऱ्हाईक पहा, त्याची बुद्धी सारं व्यवहार-चातुर्य खर्च करून दुकानदाराला कसं लुबाडूं ह्याकडेच लागलेली.

ती वर्तमानपत्रं विकणारी मुलं पहा. भडक बातम्याच कसे ते ओरडत आहेत.

ते फूटपाथवरचे दुकानदार पहा. गिऱ्हाईकाचं खरं मर्म जाणून 'कोईबी चीज दो पैसा' म्हणूनच त्यांची हांकाटी चालूं आहे.

आणि हे असं सारं पाहिलं कीं वाटतं—लोक एकमेकांना लुबाडताहेत, नव्हे ओरबडताहेत. हा कोणी 'आपला' आहे ही भावनाच मुळीं त्यांच्यांत नष्ट झालेली आहे. सगळेजण आपल्या भातावरच तूप ओढून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

खादीधारी गंभीर झाला. तो स्वतःशींच म्हणूं लागला. छेः जगांत आस्था उरलेली नाहीं! प्रेम उरलं नाहीं! माणुसकी उरलेली नाहीं!

जीवनांत आटोकाट प्रयत्न करून लढणाऱ्यांचं तरी जीवन काय आहे. सकाळीं कामं करायचीं, रात्रीं झोपायचं जास्तींत जास्त लोकांना लुबाडतां येईल असं धोरण ठेवायचं त्यांत आनंद मानायचा, आणि तेंच सुख समजून जीवनाकडे बघायचं.

जीवन धकाधकीचं झालं आहे, खरं आहे तें. ह्यात सारखं लढावं लागतं, तेंही खरं आहे. जखमा सहन करून इच्छा नसली तरी सारखं लढावं लागतं, हो तेंही खरं आहे. पण—पण ही लढाई दोन वीरांची वीरश्रीची लढाई आहे कां ?

—छेः दोन नायका क्षुल्लक कारणावरून एकमेकींच्या झिंज्या ओढतात ना तशीच ही ह्यांची लढाई भासते.

खादीधारी विचार करूं लागला. खरंच वरून आनंदी दिसणारे हे लोक आंतून तरी आनंदी आहेत कां ?

छेः उलट जवळ गेलांत तर तुम्हांला ते जास्त दुःखी आहेत असे दिसेल. ते दुःखी कां आहेत हें त्यांना माहीत आहे. त्यांना कोण लुबाडीत आहे, हें ते जाणून आहेत. त्यांच्यावर कोण अन्याय करीत आहे, हें त्यांना पक्कं ठाऊक आहे.

पण—पण मग हे प्रतिकारक्षम कां होत नाहींत.

होतीलही. पण केव्हां—

* * *

गिरगांवांतल्या पोर्तुगीज चर्चच्या उजव्या हाताला वळलं कीं, " सातारकर टाइपरायटिंग रूम " ह्या नांवाचा बोर्ड असलेलं एक छोटंसं दुकान लागतं. दुकान कसलं जिन्या-खालीं खोलीसारखा आलेला कोपरा आहे तो. पण त्यांतही दोन भागीदार होते. दुकानाच्या पुढच्या भागांत महादू भाजीच्या टोपल्या घेऊन बसायचा व मागच्या बाजूस सातार-कर एका खोक्यावर जुनं मशीन ठेवून काम करायचा.

—थोडं पाणी असलं तरी मासा जिवंत राहू शकतो. तसं आहे मुंबईकरांचं. थोडीशी जागा मिळाली तरी ते मोठ्या खुर्पीत आपला धंदा करतात. सातारकराचेंही तसेंच होतें.

रात्रींची ९ ची वेळ झाली. आजूबाजूचे दुकानदार आप-ल्या फळ्या ओढून घेऊं लागले तशी महादूनेंही आपल्या टोकऱ्या, वर टांगलेले भोपळे, तराजू आणि वजन हा सारा माल एका कोपऱ्यांत नीट रचून ठेवला व कुलूप मागण्याकरतां नेहमींच्या पद्धतीप्रमाणें तो सातारकराकडे वळला, पण त्याला स्वस्थ बसलेला बघतांच महादूला आश्चर्य वाटलें व तो त्याला म्हणाला, "काय राव, आज काय इथंच राहणार होय. चला आतां बस्स झालं, कोण येणार आहे आतां 'कडकट' करायला."

त्रस्त झालेल्या सातारकरानें महादूला कांहींच उत्तर दिलें नाहीं. शेवटीं सातारकर कांहींच बोलत नाहीं असें पाहून महादू कुलूपाची एक किल्ली घेऊन निघून गेला.

स्वतःचीं दुःखं महादूला सांगून सातारकरला काय फायदा होणार होता. उलट दुःखाची जाणीव मात्र झाली असती. आज ३१ तारीख, सबंध दिवसांत एक पैचंही काम झालं नाहीं. घरात तर कवडीही शिल्लक नाहीं, आई दारांत वाट पहात बसली असेल, तिला हें तोंड कसं दाखवायचं, तिच्या पदरांत आज काय टाकायचं. अशीं हीं एकापेक्षां एक भयंकर दुःखं होतीं त्याचीं. तीं दुःखं त्याचीं होतीं, तीं त्यालाच भोगायचीं होतीं. महादूला सांगून त्याला त्यात काय फायदा होणार होता?

विचार करून रडकुंडीस आलेल्या सातारकरनें दत्ताच्या फोटोकडे पाहिलें. हात जोडून तो म्हणाला, "देवा मला संभाळ रे तूं–माझी अब्रू तुझ्या हातांत आहे, नाहीं,–नाहीं कां दया येत तुला माझी?

× × ×

खण् खण्

पोर्तुगीज चर्चकडून दादरकडे जाणारी ट्रॅम थांबली आणि तींतून एक खादीधारी उतरला. फूटपाथवर आल्याबरोबर त्याची नजर 'सातारकर्स टाइप रायटींग रूम' ह्या बोर्डाकडे गेली. व कांहीं तरी आठवण झाल्यासारखें त्याला वाटून त्यानें पिशवींतले कागद काढले व तो दुकानांत शिरला.

दत्ताची प्रार्थना करणाऱ्या सातारकरनें जेव्हां वर पाहिलें तेव्हां त्याच्यासमोर एक खादीधारी उभा असलेला त्याला

दिसला. त्यानें ओलावलेले डोळे पुसले. चेहरा आनंदी केला. दत्ताकडे एकवार भाविक नजरेनें पाहिलें व त्या खादीधारी गृहस्थास तो म्हणाला, " कांहीं टाइप करायचं आहे कां ? "

" हो एक दोन कागद टाईप करायचे आहेत."

" द्या मजकूर."

" दोन कार्बन हं."

" ठीक आहे " असें म्हणून त्यानें खादीधाऱ्याजवळून दोन कागद घेतले, दोन नवीन कागद मशीनला गुंडाळले व तो टाईप करूं लागला.

खादीधारी त्याला मध्येंच म्हणाला, " पण हे पहा हं चार्ज जरा कमी लावा. पैसे थोडेसेंच आहेत माझ्याजवळ."

भुकेल्या माणसारखा त्या कागदावर तुटून पडलेला सातारकर जरा साशंक नजरेनें त्याच्याकडे पाहूं लागला. त्याची ती नजर खादीधाऱ्याच्या नजरेंतून कांहीं सुटली नाहीं. तो सातारकरला म्हणाला, " अहो आम्हीं हे असे कॉंग्रेसचे भिकारी सेवक ! काय असणार आमच्याजवळ. तशांत आम्हीं पडलों खेडेगांवचे. रानच्या फुलाला वास नाहीं तसं रानच्या देशभक्ताजवळ पैशाचा वास नाहीं. एकूण काय दोघांनाही मुंबईच्या श्रीमंत जगांत किंमत नाहीं." थोडेसें हंसून व गंभीर होऊन तो म्हणाला, " त्या फुलाचं महत्त्व पटवायलाच मी इथं आलों आहे. उद्यां इथल्या कॉंग्रेस कमिटीची बैठक आहे. तींत आमच्या साताऱ्च्या नाना पाटलांच्या कार्याला कांहीं

आर्थिक पाठिंबा मिळावा व त्यांच्या कार्यांचा सगळीकडे प्रसार व्हावा असा एक ठराव येणार आहे. तुम्हीं टाईप करीत आहांत तोच तो ठराव. मजकूर चांगला दिसावा म्हणून टाईप करून घेतोय एवढेंच. तेव्हां म्हटलं–"

सातारकर त्यांचें बोलणें ऐकत होता तरी त्याची बोटं मशीनवर विजेच्या चपळाईनें फिरत होतीं. पण मध्येंच तो थबकला. त्यानें टाईप केलेलीं नांवं मनाशीं वाचलीं व तो नकळत बोलूं लागला. "खरंच धन्य आहेत नाहीं हीं माणसें. केवढं त्याचं कार्य, केवढे त्यांचे जनतेवर उपकार. अंगाच्या कातड्यानें त्यांचीं जुतं शिवावीत असे उपकार आहेत त्यांचे. कोणत्याही धर्माचे असा, कोणत्याही पक्षाचे असा, त्यांच्या-बद्दल आदर वाटलाच पाहिजे आपल्याला. सातारा, खरंच धन्य केलं त्यांनीं माझ्या साताऱ्याला."

आपण एकटेंच आपल्याशीं कांहीं तरी बोलत आहोंत असें लक्षांत येतांच तो परत भरभर टाईप करू लागला.

खादीधाऱ्यानें त्याचें बोलणें ऐकलें होतें. तो विशेष कांहीं तरी बोलत आहे. साताऱ्याविषयीं विशेष जिव्हाळ्यानें बोलत आहे हें त्याच्या लक्षांत आल्याशिवाय राहिलें नव्हतें. पण सातारकरच्या अर्धवट बोलण्यानें तो अधिकच बुचकळ्यांत पडला होता व त्याची उत्सुकता वाढली होती. शेवटीं त्यानें सातारकरला " तुम्हीं सातारकडचे कां ? " म्हणून विचारलेंच

त्याच्या ह्या प्रश्नाचा रोख विशेष दिसतोय असें पाहून

सातारकर थांबला व त्याच्याकडे वळून म्हणाला, "हो मी साताराचा आहे. सदाशिव पेठेंत जोश्यांचा वाडा आहे ना तेथें रहात होतों मी. पण माझें मूळ गांव मात्र × × × हें आहे. माझे आईबाप तिथेंच होते पण मीच तेवढा न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिकण्याकरतां सातारला रहात होतों. मॅट्रिकमध्यें असतांनाच मी टाइप रायटींग शिकलों. आणि तेथून–"

येवढें तो बोलला खरा पण पुढें मात्र त्याला बोलवेना. तो परत मशीनकडे वळला व टाईप करूं लागला. त्याची ही विचित्र वागणूक खादीवाल्याच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नाहीं. त्याची उत्सुकता जरी जास्त वाढली होती तरी सातारकरचा दुःखी चेहरा पाहून काहीं त्याला पुढें विचारण्याचा धीर होत नव्हता. तो कसला तरी विचार करीत चूप बसला.

थोडयाच वेळांत काम संपलें. तें त्यानें तपासून घेतलें. काम व्यवस्थित झाल्याचें समाधान दाखवून त्यानें एक रुपया काढला व सातारकरच्या हातावर ठेवला.

रुपया बघताच सातारकरनें तोंड फिरविलें आणि तो रुपया हेतुपुरःस्सर नाकारीत असल्याचा आविर्भाव केला. त्याची ही विचित्र वागणूक पाहून खादीधारी मोठया बुचकळ्यांत पडला. त्यानें बळेंच त्याचा हात धरून त्यांस रुपया देऊं केला तरीही तो रुपया घेत नाहीं असें पाहून तो म्हणाला, "अहो, मघां मी मला भिकारी म्हणून म्हटलं म्हणून रुपया नाकारतां कीं काय ? छे छे. तसं नका करूं. अहो तुमच्यासारख्यांना 'चाट

लावण्यांत काय अर्थ आहे. बघूं आम्हीं आमचें. तुम्हीं गरीब दिसतां आणि गरीबांना मदत करणें हें तर मुळीं आमचें कर्तव्य आहे."

तरीही सातारकरनें रुपया घेतला नाहीं. खादीधारी साशंक आहे असें पाहून त्याला फार वेळ बुचकळ्यांत न ठेवतां तो म्हणाला, " मुद्दामच मी तो घेत नाहीं. नव्हे मला तो घ्यावा असं देखील वाटतं नाहीं. उलट मी तो घेतला तर मी माणूस नाहीं असंच मला वाटेल. तेव्हां कृपा करा आणि मला गळ घालूं नका."

खादीधारी त्याच्या ह्या अर्धवट खुलाशानें अधिकच गोंधळला. त्याला त्याचें कारण जाणून घ्यायची जास्तच इच्छा झाली. पण तसें कांहीं त्याला विचारतां येईना. ह्याच्या बोलण्याच्या मागें कांहीं तरी गूढ आहे असें त्याला वाटलें. म्हणून तो त्याला कसें विचारून त्याची हकिगत काढून घ्यावी ह्या विचारांत गढून गेला. पण त्याला कांहीं फारसा विचार करावा लागला नाहीं. कारण सातारकरालाच कांहीं तरी वाटलें व तो म्हणाला, " तुम्हांला थोडा वेळ आहे कां ? मला वाटतं तुम्हीं जरा साशंक दिसतां तेव्हां मी तुमची शंका निरसन करूं इच्छितों."

खादीधाऱ्यानें अर्थातच आपल्याला खूप वेळ असल्याचें सांगितलें. तेव्हां सातारकरनेंही कांहीं आढेवेढे न घेतां सांगण्यास सुरवात केली. तो म्हणाला, " मी काम करून देखील

पैसे घेत नाहीं ह्या माझ्या वागणुकीबद्दल तुम्हांला खूपच विचित्र वाटलें असेल नाहीं. सबंध दिवसांत गिऱ्हाईक नसल्यामुळें तुम्ही दुकानांत शिरतांच केवढें समाधान वाटलें मला. वाटलें देव पावला ! पण आतां हें काम केल्यानंतर मात्र मला ह्या कामाचा मोबदला घ्यावासा वाटत नाहीं. कां म्हणाल तर तसंच एक जबरदस्त कारण आहे त्याच्यामागें.

"उद्यां ह्या श्रीमंत मुंबईकरांकडून तुम्हीं पैसे गोळा करणार. चुकून कोणी माझ्याकडे येईल देखील. पण खरं सांगू मनाची इच्छा असून देखील मला एक पैसा—हो एक पैसा देखील मदत करता येणार नाहीं. म्हणूनच आज धनाची नाहीं तर मनाची आणि माझ्या लायकीप्रमाणें तनाची मदत करायची संधि मला मिळाली आहे ती मला सोडावीशी वाटत नाहीं. मला जो तुम्हीं रुपया देणार आहांत तो उद्यां त्या कार्यांत घाला. त्यांत आनंद वाटेल मला. कामाचा मोबदला एक रुपया न घेणें आणि तो फंडास देणें ह्याची जगाच्या दृष्टीनें कदाचित् कांहीं किंमत नसेल पण माझ्या मनाला मात्र त्यानें उपकाराची फेड केल्याचं समाधान लाभणार आहे. समुद्राला एका थेंबाचं महत्त्व नसलं तरी सहारा वाळवंटांत मात्र तो मोलाचं लेणं होऊन बसतो.

"माझ्या घरीं धनधान्याच्या राशी आहेत आणि केवळ नांवाकरितां म्हणून मी ही मदत करीत आहे असं नाहीं तर

पोटाला चिमटा घेऊन, खऱ्या तळमळीनं, प्रामाणिक त्यागानं ही मदत करीत आहे.

" आज माझ्या घरीं बेकारी कशी थयथय नाचणार आहे ह्याची कल्पना नाहीं तुम्हांला. ३१ तारीख आजची. घरांत कवडी देखील शिल्लक उरलेली नाहीं. आज सबंध दिवसांत गिऱ्हाईक नाहीं. सांगा, दारांत मोठ्या आशेनें वाट पहात असलेल्या माझ्या आईला कसं तोंड दाखवणार मी.

---गरिबी आणि डोंगर दुरूनच साजरे. जवळ जाऊन पहाल ते त्यांची भयाणता भेडसावल्याशिवाय राहणार नाहीं.

आजच सकाळीं एक भाकरीचं पीठ उसनं आणलं. ती भाकरी पाण्याबरोबर गिळली. सकाळची वेळ निभावली म्हणून आनंदांत होतों पण आतां-आतां सारी रात्र उपाशी पोटीं काढावी लागणार. भूक लागली कीं पाणी पिणार-भूक शमते पाण्यानें ! आई, बिचारी आई, नशिबाला हात देऊन ढस-ढसा रडणार, झोपेचं सोंग घेतलेला मी तें ऐकणार. असह्य झालं म्हणजे कानांत बोटं घालणार आणि कठोर हृदय करून झोपेचं सोंग घेऊन निपचीत पडणार. उद्यां उजाडेल. परत कामाला लागणार-

" पण मी हे सारं सहज कां करणार आहे, आहे माहीत ? पुढें आशा आहे म्हणून. पुढें किरण दिसतोय म्हणून अंधारांत पाऊल टाकीत आहे. म्हणून येणाऱ्या काळरात्रीचं भय तितकं घाटेनासं झालं आहे. रुपया मिळून देखील स्वीकारावासं वाटत

नाहीं.' ह्याचा अर्थच इतका कीं, त्या रुपयापेक्षां, जो रुपया त्या कार्याला खर्च होणार आहे त्या कार्यानें माझ्यावर केलेला उपकार मला जास्त मोलाचा वाटत आहे.

"हें टाईप करायचं काम म्हणजे सातारचं काम. माझ्या ग्रामराज्याचं काम. मग ज्या ग्रामराज्यानें माझ्यावर अनंत उपकार केले त्याला वेळप्रसंगीं मी मदत न करतां कृतघ्नता दर्शवूं होय. माझ्यासारख्या हजारों गरीबांना तारलं, माझ्या आईसारख्या दीन स्त्रियांना ज्यांनीं वाचवलं, त्या देशभक्तांच्या कामाचं का मी मोल घेऊं ? माझी कल्पना खुळी म्हणा पण मला मात्र ह्याही परिस्थितींत उपकाराची अंशतः फेड केल्याचं समाधान लाभत आहे. आज घरीं गेल्यावर ही हकीगत मी आईला सांगितली तर तिला देखील आनंद होईल. उपकाराची फेड केल्याच्या समाधानाचा जो दिवस गरिबांच्या आयुष्यांत येतो तो त्यांच्या दुःखांतही सुख निर्माण करतो." सातारकर थांबला. त्याच्या डोळ्यांतून अश्रु ठिपकत होते. ते पाहून खादीधारीही कावराबावरा झाला. विषय बदलून त्याचं दुःख हलकं करावं असें त्याला वाटलें. म्हणून तो म्हणाला, " नाना पाटीलांनीं कां उपकार केले आहेत तुमच्यावर ? कोणते ते उपकार ? "

त्याचा प्रश्न ऐकून सातारकरनें वर पाहिलें. अनामिकेनें अश्रु पुसले व तो सांगूं लागला. " तुमची उत्सुकता व माझ्याविषयींचा जिव्हाळा लक्षांत घेऊन मला देखील सांगावेंसें वाटतें पण त्याला थोडासा इतिहास आहे तोही सांगायला हवा."

असें म्हणून थोडा वेळ थांबून तो सांगूं लागला, " आम्हीं साताऱ्यापासून दहा मैलांवर असलेल्या खेडेगांवांत रहात होतों. तें गाव लहान आहे. गावगुंडीशिवाय विशेष प्रसिद्ध असं तेथें कांहीं नाहीं. त्या एकाच दुर्गुणामुळें गाव नालायक होत चालला आहे. त्या गांवगुंडीनं चांगल्या चांगल्यांचीं घर-दारं लयास गेलीं. अजूनं तर कित्येकांना पारखं केल. गांव-गुंडी सांथीच्या रोगासारखी शिरली आणि तिनें अनेकांना घेरलं. आमचं घरही तिनेंच पछाडलं.

" त्यापूर्वीं आम्हीं बऱ्यापैकीं शेतकरी वर्गांत मोडत होतों. वडिलार्जित चार पांच एकर जमीन होती. दोन विहीरीवर दोन मळे पाण्यानें भिजत होते. गोठ्यांत गाईगुरांची दाटी व्हायची घरांत नोकर चाकरांची धांवपळ व्हायची. घरात धान्य यायचं त्याची रास लागायची. मोजायला लागलं तर आकाशांतल्या चांदण्या कमी पडायच्या पण काय सांगूं. आकाशांतल्या चांदण्यांना जशी दृष्ट लागून एक दिवस अमा-वास्या येते तसं आमचं कोठार एक दिवस धुतल्या खडका-सारखं स्वच्छ झालं. ह्याला कारण गावगुंडी, त्यांत गुरफटलेले माझे बाबा.

"एक काळ असा होता कीं, बाबांच्या कामाचा उरक हत्तीसारखा असायचा. पण जरा बऱ्यापैकीं काळ येतांच फुल-पांखरासारखं त्यांचं कामाकडे लक्ष लागूं लागलं. गांवांतल्या गांवगुंडांत ते सामील झाले. चावडींत बसल्या बसल्या उगीच

गप्पा उठवायच्या, येणारा जाणारांची निंदा करायची. चिख-लांत दगड टाकायचा, दुसऱ्याच्या अंगावर घाण उडवायची स्वतःवर उडाली तरी उरमातानं हंसायचं. अशी त्यांची कृति बनली.

"पुढं त्यांच्या कंपूला दारूचं व्यसन जडलं. बाटली आली पण एकटी आली नाहीं. पाय नसलेली बाटली बाईच्या आधाराशिवाय थोडीच येणार ! म्हणून बाईही पण आली. त्या दोघांचा धिंगाणा रातोरात चालायचा. दररोज एकेका घराची सतरंजी नाचणारणीच्या तूफान नाचानं विरूं लागली. आणि दारूनं मोकळी झालेली बाटली प्रत्येक घरातनं पैसा भरून बाहेर पडूं लागली.

त्यामुळें व्हायचं तेंच झालं. वाऱ्यानं घराचं छप्पर उडावं आणि क्षणार्धांत घर निराधार व्हावं तसं आमचं झालं. त्याच-वेळीं मी मॅट्रिक झालों आणि शेतीसाठीं घरीं आलों. झाला प्रकार मला कळला. अनपेक्षित प्रकारामुळें माझें तर धाबेंच दणाणलें. पण माझ्या आईनें मला धीर दिला. बिचारी आई ! किती हाल सहन केलें तिनें. घराबाहेर जावें तों तोंड दाख-वायची छाती होऊं नय. घरांत बसावें तों बाबांच्या हातचा मार खाणं सहन होऊं नये. अशा विचित्र स्थितींत तिला मेल्याहून मेल्यासारखं व्हायचं. पण इतकं असून देखील ती सारं सहन करायची. माझ्यासाठीं सहन करायची. मला तिनें धीर दिला खरा पण खरं म्हणजे मी घरीं आल्यावर तिलाच

जास्त धीर वाटूं लागला होता. नुसत्या शिडांत जोर नसतो. नुसत्या नावेंत जोस नसतो. पण ते दोन्ही जेव्हां एकत्र येतात तेव्हां त्या दोघांनाही जोराची गति मिळते तसंच आमचं झालं.

“ त्यांतच बाबांनीं आम्हाला घराबाहेर हाकललं. पोरकें आम्हीं तें घर सोडलं. सातान्यास आमच्या नात्यांतील मंडळी होती पण त्यांच्याकडे जाणें जिवावर आलें म्हणून ही गरि-बांची दुनिया मुंबई गांठली.”

“ आज पांच वर्षें झालीं. बाबांचं पत्र नाहीं. गांवचं कधीं मधीं कोणीं भेटलं तर सांगतात कीं, बाबांची दारू सुटली नाहीं म्हणून. आई हें ऐकून धाय मोकलून रडते. देवाची प्रार्थना करते. पण तिचा देव कांहीं तिच्यासाठीं धांवून यायचा नाहीं. आणि बाबांची दारूपासून सुटका करावयाचा नाहीं. आम्हीं बाबाची दारू सुटण्याची आशा पार सोडली होती. पण—पण दयाळू देव एके दिवशीं जागा झाला.

“ १९४२ साल उजाडलं. नाना पाटलांचा उदय झाला. आणि आशेचा अंकूर फुटला. वर्तमानपत्रांत साताराकडच्या बातम्या येऊं लागल्या. त्या वाचून आम्हांला आनंद होऊं लागला. मी त्या बातम्या आईला सांगायचा. कधीं सांगा-यचा—आई, नाना पाटलानें जुगार बंद केला. आई, नाना पाटलानें कोर्टें बंद केलीं. आई, नाना पाटलानें गरिबांना धान्य

दिलं. आई, नाना पाटलानें सातारा स्वतंत्र केला. आई, नाना पाटलानें दारू बंद केली—

नाना पाटलानें दारू बंद केली हें ऐकतांच तिच्या डोळ्यात आनंदाचे अश्रु उभे रहात. तो वेड्यासारखं परत परत मला विचारी—" खरंच खरंच कारे नाना पाटलानें दारू बंद केली? खरंच मग ह्यांची देखील दारू सुटली असेल नाहीं. त्यामुळें आतां ते आपल्याला भेटतील. आपण पूर्वीसारखे परत आनंदानें राहूं." असं कांहीं तरी ती सारखं विचारायची. मी तिला समाधानपूर्वक उत्तरं द्यायचा. त्यामुळें किती आनंद वाटायचा तिला. त्या आनंदाच्या भरातच ती नाना पाटलांना आशिर्वाद द्यायची. चारचौघात त्यांच्या नांवाचं भजन करायची, त्यांचं गुणगान गायची.

" खरं सांगू, मझ्या आईसारख्या लाखो लोकांचे कळकळीचे आशिर्वाद मिळतात म्हणून तर जगांत नाना पाटील पुढें येतात. असं मला वाटूं लागलं आहे.

" आज दोन चार दिवस झाले. गांवचं पत्र आलं आहे. त्यांत बाबांनीं दारू सोडल्याचं लिहिलं आहे. गांवांत आतां दारूचा थेंबही उरला नाहीं असंही लिहिलं आहे. व्यसन एकदम सुटल्यामुळं बाबांनीं अंथरूण धरलं आहे व ते आमची सारखी आठवण काढून रडत आहेत, असंही त्यांत लिहिलं आहे.

" मी मघां जो तुम्हांला आशेचा किरण म्हणालों तो हाच. दोन चार दिवसांत जाण्याइतके पैसे जमले कीं आम्हीं आता गांवीं जाणार आहोंत. मग तुम्हींच सांगा, आईचं सौभाग्य परत मिळवून देणाऱ्या उपकाराची फेड, आलेल्या संधीमुळें मी कां करूं नये ? उपकाराच्या फेडीपेक्षां देखील हा रुपया मी तुम्हांला कोणत्या तोंडानें मागूं असें मला वाटत आहे.

" रुपया न घेतल्यामुळें आमचे हाल होणार आहेत. पण उद्यां मिळणाऱ्या आनंदाच्या नुसत्या कल्पनेमुळेंच आजच्या उपाशी रहाण्याचं आम्हांला कांहींहि वाटणार नाहीं. "

" अलिकडे मला असं वाटूं लागलं आहे कीं, नाना पाटलांनीं माझ्यावर केलेल्या उपकाराची फेड जर मला करावयाची असेल तर देशासाठीं मला प्राणच द्यावयास हवेत. " असें म्हणून सातारकर थांबला. आझाद मैदानावर व्याख्यान देणाऱ्या वक्त्यासारखा त्याच्या अंगांत जोर चढला होता. खादीधारी मात्र विलक्षण चक्रांत पडल्यासारखा झाला. तो सातारकरकडे नुसता पहातच राहिला.

थोडा वेळ कोणी कोणाशींच बोललं नाहीं. ती शांतता सातारकरला जाणवली, तेव्हां तो खादीधाऱ्यास म्हणाला, "क्षमा करा महाराज, मी ही माझी रडकथा ऐकवून उगीच तुमचा वेळ घेतला. उशीर झाला असेल आपल्याला."

" उशीर ! छे. उशीर कसला. खरं सांगूं आज मी तुमच्यापासून एक महान् धडा शिकलों आहे. कीं जो धडा हजारों

वक्त्यांचीं व्याख्यानं ऐकून देखील मिळाला नसता." असें म्हणून खादीधारी उठला त्यानें " जय हिंद " म्हणून प्रणाम केला व जातां जातां हलकेंच सातारकरच्या नकळत दोन रुप-यांची नोट मशीनवर ठेवून निघून गेला.

*　　　*　　　*

खण् खण्

ट्रॅम सुरू झाली.

गिरगांवांतून जाणाऱ्या दुसऱ्या मजल्यावर एक खादीधारी रस्त्यावरच्या गर्दीकडे पाहून कसला तरी विचार करीत होता.

येतेवेळीं त्यानें जो देखावा, जी गंमत पाहिली होती तीच गंमत आतां पण दिसत होती. पण मघांसारखी निराशा मात्र त्या गर्दीकडे पाहून त्याला वाटत नव्हती. मघां त्यानें ट्रॅमच्या दुसऱ्या मजल्यावरून जगाचें धांवतें निरीक्षण केलें होतें. त्या-मुळें त्याला वाटत होतें कीं, लोकांत प्रेम नाहीं! आस्था नाहीं! माणुसकी नाहीं! इतकच नव्हे तर आपण कोणाला लुबाडीत आहोंत व आपणाला कोणी लुबाडीत आहे हें देखील त्यांना कळत नाहीं.

पण आंतां तो त्यांतील एका घटकांजवळ जाऊन महान् धडा शिकून आला होता त्यामुळें त्याला आतां निराशा वाटत नव्हती. जे लोक आपल्याला दुर्बल वाटले त्यांच्यातही तेज आहे. जे स्वतःच्या सुखाकडे बघत आहेत त्यांच्यांतही इतरां-विषयीं कळकळ आहे. असा अनुभव त्याला आला होता.

मग्गां त्याला असा प्रश्न पडला होता कीं, हे लोक आपल्या-वर अन्याय करीत आहेत हें कळून देखील त्या विरुद्ध ते प्रति-कार कां करूं शकत नाहींत ? ह्याचेंही उत्तर त्याला मिळालें होतें. त्याला वाटत होतें खरंच हे लोक प्रतिकार करतील, तशी त्यांना इच्छा आहे. तसें त्यांच्यांत तेज आहे, पण—

पण परिस्थितीच्या राखेखालीं दबलेल्या ठिणग्या आहेत. ह्या त्या स्वयंस्फूर्तीनें चेतणार नाहींत, तर—तर त्यासाठीं क्रांतीचा वारा सुटायला हवा. आणि त्या ठिणगीला फुंकर घालणारा यायला हवा. म्हणजे त्या ठिणग्या पेटतील. एरव्ही नाहीं.

—तोंपर्यंत ट्रॅमच्या दुसऱ्या मजल्यावर बसून पहाणाऱ्यांना असेंच वाटेल कीं, ह्या लोकांत एकमेकांविषयीं आस्था नाहीं ! प्रेम नाहीं !! माणुसकी नाहीं !!!

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्र. क्र. २४९८ नों. दि ............
वि. ............ क्र. ................

# ३

## तीन पिढ्या

हिंदुस्थान मेलेला आहे. असं हिटलर म्हणाला होता. हिटलरच कां? आज समळ जगच तसं म्हणत आहे. आणि त्यांनीं तरी तसं कां म्हणूं नये. अवघ्या सात कोटी इंग्रजांविरुद्ध चाळीस कोटी जनतेला आपल्या स्वातंत्र्यासाठीं झगडाव लागत आहे. ही एकच गोष्ट त्याचं विधान सिद्ध करूं शकते.

पण खरंच हिंदुस्थान मेलेला आहे कां?

नाहीं! नाहीं!! नाहीं!!! हिंदुस्थान मेलेला नाहीं. साम्राज्यशाहीच्या विषारी सर्पानें त्याला जखडून टाकलं आहे. पिळून टाकलं आहे म्हणून तो निस्तेज दिसत आहे एवढेंच.

तो मेलेला नाहीं. कारण त्याचे हातपाय विळखा घातलेल्या सांपापासून मुक्त होण्यासाठीं अजूनहीं धडपडत आहेत. विषारी फुत्कार तोंडावर पडल्यामुळें काळवंडलेल्या त्या मुखास मुखांतून अजूनही 'चलेजाव'च्या वल्गना निघत आहेत.

म्हणून तो मेलेला नाहीं. उलट त्याच्या जीर्ण शरिरांतून नैतिक पाठिंब्याचं बळ वाढत असल्यामुळें तो लवकरच स्वतंत्र होईल अशी आशा वाढत चालली आहे.

पण आज तो निस्तेज आहे. आज तो पूर्णपणें सापाच्या विळख्यांत सांपडलेला आहे. त्यांतून सुटण्याचा तो प्रयत्न करीत आहे. पण-पण पूर्णपणें त्याची केव्हां बरें सुटका होईल !

जेव्हां त्याच्या शरीरांतील प्रत्येक बिंदून् बिंदू स्वस्फूर्तीनें संघटित होऊन तेजानें खवळून उठेल तेव्हां. जेव्हां स्व-सुखाच्या मर्यादित कल्पना सोडून दुसऱ्याच्या आणि भावि पिढीच्या सुखासाठीं तो त्याग करील तेव्हा---

ज्यावेळीं इंग्रजानीं आपला देश पादाक्रांत केला, तेव्हां जनतेंत वरील गुणांची उणीव फार भासत होती. कोणाचा पायपोस कोणांत उरला नव्हता. जो तो आपल्या सुखाकडे बघत होता. अशा वेळीं ही योग्य संधि आहे असें पाहून विश्वामित्र आळीच्या रूपानें जसा बोरांत शिरला, तसा इंग्रज व्यापाराच्या निमित्तानें देशांत घुसला. केव्हाही भिरकावून देतां आलें असतें इतकें सौम्य स्वरूप होतें त्याचें. पण आमच्या

संकुचित वृत्तीमुळें व कुठें काय चाललं आहे हें जाणून घ्यायची इच्छा नसल्यामुळें त्या आळीचा भला मोठा साप होऊन शेवटीं आमच्या नाशास कारणीभूत झाला.

मानानें मोगलांकडून मान मिळविणाऱ्या महादजीसारख्या मराठ्यांच्या माना मुरगळल्या गेल्या. मनांत मिरविणारे मुसलमान मारले गेले. शीखांची शेखेखोर वृत्ति शेकली गेली. ब्राह्मणांचं ब्राह्मणत्व बाटलं गेलं. राजाच्या राजविलासाला रंकाची रया आली. अशा प्रकारें सर्वजण स्वतःच्या सुखाला पारखे झाले. साम्राज्य तृष्णा आणि भांडवलशाही ह्या दोन पाळीच्या जात्यांत हिंदुस्थान सर्रहा भरडला गेला. त्याच्या सुखाचं, आशेचं, शूरपणाचं, साऱ्याचं पीठ झालं. तें पीठ देखील गुलामगिरीच्या चाळणींतून चाळलं जाऊन भुसकट तेवढं राहूं दिलं आणि त्या चाळणींतून न चाळलं गेलेलं खरं सत्त्व कुठल्या कुठें भिरकावलं गेलं.

इतकंच कशाला पुण्यापासून वीस मैलांवर असलेल्या खेडेगांवांतील हा प्रासाद पहा. केवढा भव्य आहे तो ! त्याच्या भव्यतेकडे पाहूनच आपली मान आदरानें खालीं लवतें. ह्या वाड्यांत चला. येथील प्रत्येक वस्तून् वस्तू आपल्याला गतवैभवाचा इतिहास सांगेल. हा चौक पहा. अन्यायाविरुद्ध उठलेल्या नंग्या तरवारींचा इथें ढीग पडायचा. त्या तलवारींच्या धारेवर प्रकाश पडायचा आणि त्यामुळें त्याच्या परावर्तित किरणांनीं चौकाचा कोपरान् कोपरा कसा लखलखा-

टायचा ह्या रम्य हकिकती हा चौक आपल्याला सांगेल. हें देऊळ पहा. शपथ म्हणून रक्ताचा थेंब टाकायचा तर देवाला अभिषेक व्हायचा. असा अद्भूत इतिहास येथील प्रत्येक वस्तू आपल्याला पटवील. हें स्वयंपाक घर पहा. येथें बंधुभावानें राहणाऱ्या सगळ्या मानकऱ्यांच्या हजारों पंक्ती कशा उठायच्या, ह्या गोड आठवणी आपल्याला ऐकायला मिळतील. ही मागची पागा पहा. लाखों मैलांवर आपल्या बाधवांवर कुठें कुणाचा अन्याय झाला तर येथले घोडें कसें तूफान सुटायचे, हा स्फूर्तिदायक इतिहास आपल्याला कळेल. हा वरचा दिवाणखाना पहा. येथें राहणाऱ्या पटवर्धन सरदारांची भव्यपणाची सांवलीच आपल्यावर पडली आहे, असें हा दिवाणखाना आपल्याला अभिमानानें सांगेल.

पण इंग्रज आल्यापासून इथें काय राहिलं आहे. येथले चौक पडले. देवळाचा पवित्रपणा नष्ट झाला, दिवाणखान्याची भव्यता जमिन दोस्त झाली. हीं दृश्य वैभवं जशीं नष्ट झालीं तशींच अद्भूत वाटणारी जनतेच्या अंतःकरणांतील फूर्तीही रसातळाला गेली. अन्यायाविरुद्ध उठणारांची चीड नाहींशी झाली. बंधुभावानें वागायला शिकवणारी मनांतील तळमळ लोपून गेली. साहेबाच्या नवलाईनें शरीरं जीवंत राहून मनं मात्र पार मेलीं गेलीं. हजार गेले आणि हजारांचे पोशिंदे सरदार पटवर्धन हेही पण रसातळाला गेले. त्यांचा बंधुभाव, त्यांचें तेज, त्यांची भव्यता, गंभीरता, त्यांचें वैभव सारें सारें कांहीं नष्ट

झालें. इतर सरदारांप्रमाणें पटवर्धनही इंग्रजांच्या अंकित झालें. तें इतकें कीं, बेदरकारपणें निराधीत कुत्र्याला भाकरीचा तुकडा टाकावा, त्या कुत्र्यानें आनंदानें तो चाखावा, तो तुकडाही कधीं मिळाला तर मिळाला नाहीं मिळाला तरीं देणारावर न गुरगुरतां, उलट तो सांगेल त्या बांधवांवर भुंकण्यास कमीं न करता त्याच्या पायाची चाकरी इमानें इतबारें करण्यांत तो निलाजरेपणा न मानतां त्यांतच दंग व्हावें अशी एक नव्हे एकापेक्षां एक अशा सात पिढ्या त्या नालायकींत रुळल्या गेल्या. इंग्रजांस तेंच हवें होतें. हा मवाळपणा त्यांच्या पथ्या-वरच होता.

अन्याय करणाऱ्या माणसाला प्रतिपक्षाचा मवाळपणा पाहून तो प्रतिकार क्षम होऊच शकणार नाहीं असें नेहमीं वाटत असतें. पण जसें असतें तसें मात्र नसतें. वरून शांत दिस-णाऱ्या भूमिच्या पोटीं रसरसलेला अग्नि नाहीं असें कोण बरें नाकबूल करील ?

अति अन्यायाच्या पोटीच क्रांतीचा जन्म होतो. पटवर्ध-नांच्या घराण्यात सात मवाळ पिढ्या नंतर अन्यायामुळें चवता-ळून उठणारी अशी आठवी पिढी निर्माण झाली. कंसानें देव-कीची सात मुलं मारली पण आठवें मूल मात्र त्याच्याच मृत्युस कारण झालें. तशी ही आठवी पिढी होती. हिच पिढी आतां आपण पटवर्धनांची पहिली पिढी समजूं.

ही पिढी म्हणजे सदाशिवरावांची.

सरदार घराण्यांत, ऐतखाऊ श्रीमंतींत, आणि फुकटच्या मानांत लहानपणापासून मिरवणारे सदाशिवराव जेव्हां पंचवीस वर्षांचे झालें तेव्हां त्यांच्यावर संसाराची जबाबदारी पडली. जबाबदारी म्हणजे काय ? आहे हा ऐदीपणा चालू ठेवायचा. इतरांचं न ऐकतां हातांत असलेल्या सत्तेचा दुरुपयोग करून आढयतेनं वागायचं. जिल्ह्यांत कुठें कलेक्टरचं व्याख्यान असलं तर हजर रहायचं आणि गव्हर्नरनें कधीं काळीं जेवायला बोलावलं तर कपाटांत ठेवलेला काळा डगला घालून लगबगीनं जायचं ही एवढीच जबाबदारी. ती पाडली म्हणजे मग ठरला फर्स्टक्लास सरदार. असा सारा ठरीव कार्यक्रम सदाशिवराव जेव्हां संसारांत पडले तेव्हां त्यांच्यापुढें ठेवण्यांत आला.

पण सदाशिवरावांची पटवर्धन घराण्यांतली मुळांतली चमक वीजेसारखी बुजबुजाट करून जमलेल्या ह्या काळ्या ढगांना फाडून चमकन चमकून गेली. त्यांना हें कळलें होतें कीं, ही श्रीमंती नाहीं ही लाचारी करण्याकरतां दिलेली बिदागी आहे म्हणून. ही श्रीमंती नाहीं, तर नुसता फुगलेला फुगा आहे. त्यांना त्यांच्या वाड्यांतील प्रत्येक वस्तून वस्तू गत कालांतील वैभव, शूरपणा, समता आणि स्वातंत्र्य ह्यांचा धडा देत होती त्या वस्तू सांगत होत्या, सदाशिव, " तू कोण होतास आणि कोण झालास ? साती पिढयांना आम्हीं सांगून पाहिलं पण तें ऐकलं मात्र कोणी नाहीं. आतां मोडकळीस आलेले आम्हीं

वृद्धाच्या अनुभवानें तुला सांगत आहोंत कीं अजूनही तूं जागा हो. अजून तुला तुझें गतवैभव मिळवितां येईल.

घरांत बसल्या बसल्या त्यांना अशाप्रकारें चेतना मिळत होती. राखेखालीं दबलेली ठिणगी वर आली म्हणजे तिचा निखारा व्हायला वेळ लागत नाहीं. सदाशिवरावांचें तसेंच झालें. ते बाहेर पडत, त्यावेळीं त्यांना देशाची खरी खरी परिस्थिति लक्षांत येई. भुकेमुळें आजूबाजूच्या खेड्यांतून किंकाळ्या उठत, त्याविरुद्ध इंग्रजांस कोणी प्रतिकार केला तर त्यांची शिरं आकाशांत उडत, ह्या सगळ्या गोष्टी त्यांना दिसत त्यामुळें आपोआपच त्यांचें मन खवळून उठे.

आपण इतकें लाचार बनायला कारण आपली मागची पिढी आहे हें त्यांनीं जाणलं होतें. त्यामुळें त्यांच्या पिढीला ते दोष द्यायला तयार नव्हते. कृश झालेली नदी कधीं धरण फोडूं शकत नाहीं. धरण फोडायचं असेल तर ती नदी पुष्ट केली पाहिजे असें त्याना वाटत होतें. आपल्या मागच्या पिढीनीं जर हें धरण बांधलें असतें तर इतकें कष्ट आपल्याला पडलें नसतें हें त्यांना कळलं होतं. नि म्हणूनच त्यांनीं आतां ठरवलं होतं कीं, आपण आपली पिढी पुष्ट करून भावी पिढीसाठीं एक पाऊल पुढें टाकायचं म्हणून.

विचार परिपूर्ण झाल्यानंतर कार्याला चालना मिळतेंच. सदाशिवरावांना अर्थातच त्यांचे विचार त्यांना स्वस्थ बसूं देत ना. त्यांनीं परिस्थितीचा अभ्यास करून खरेंखुरें कार्य कर-

ण्यास सुरवात केली. व्याख्यान देणं आणि तुरुंगांत जाणं हा त्यावेळीं देशभक्तीचा विशेष होता. पण त्यांनीं त्या मार्गाचा अवलंब न करतां, स्वतः त्यागमूर्ति बनून खेडेगांवांतील दैन्य तेथील संघटनेचा अभाव ह्या गोष्टी दूर करण्याचें ठरविलें. त्या-करितां त्यांनीं स्वतःच्या खर्चानें शाळा काढल्या, दवाखाने उघडले. वाचनालयं स्थापन केली. ज्या ज्या मार्गांनीं म्हणून त्यांना लोकांतील गरिबी घालवतां येईल, त्यांना देशभक्तीच्या त्यागी विचारांनीं पुष्ट करतां येईल. त्या त्या मार्गाचा अवलंब करण्यास सुरवात केली.

विश्वामित्राप्रमाणें प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्या एका सर-दाराच्या ह्या लीला इंग्रजांच्या नजरेंतून सुटणें शक्य नव्हतें. साहेबानें सदाशिवरावांच्या पुढें पदव्या आणि पैसा ह्यांचें मोहक नृत्य, त्यांना भुलवण्यासाठीं करून पाहिलें. पण त्याचा कांहींच उपयोग होऊं शकला नाहीं. उलट साहेब आपल्याला प्रति-कार करीत आहे हें समजल्यामुळें आधींच चिडलेलें सदाशिव-रावांचें मन दुप्पट उत्साहानें त्याच्या कार्यांत भाग घेऊं लागलें.

सदाशिवराव जसजसे खेडेगांवांतील सुधारणेंत भाग घेऊं लागले तसतशा त्यांना अडचणी भेडसावूं लागल्या. कधीं कधीं ते निराश होत. आणि मनाशींच विचार करीत. छेः हे देशकार्य हें एकट्या दुकट्याचं काम नव्हे. हजारोंनीं त्यांत भाग घ्याय-ला पाहिजे. एकानें एक खेडें सुधारून काय होणार आहे.

हिंदुस्थान हा ७ लाख खेड्यांचा देश आहे. त्या सात लाख ठिकाणीं एकाच वेळीं सात लाख माणसं तयार व्हायला पाहिजेत. मगच देश सुधारेल एरव्ही सुधारण्याची शक्यता फारच कमी.

ज्यावेळीं त्यांच्या डोक्यांत हे विचार घोळत होते त्याच-वेळीं हिंदुस्थानांतील तरुण वर्गांतही हीच विचारसरणी चेतत होती. त्याची प्रतिक्रिया म्हणूनच कीं काय महात्मा गांधींचा मिठाचा सत्याग्रह सुरूं झाला. सत्य आणि अहिंसेनें अन्यायाला प्रतिकार करण्यासाठीं हजारों वीर तयार झाले. स्वतःच्या घरादारांवर, सुखावर धगधगीत निखारा ठेवून दुसऱ्याचं दुःख तेंच स्वतःचं दुःख ह्याची जाणीव करून घेऊन ते अनेक ठिकाणीं चळवळी करूं लागले. अन्यायानें दबलेले राष्ट्र चिडून उठलें म्हणजे काय करूं शकतें ह्याची प्रचीति इंग्रजांना आली. त्यांनीं नाना प्रकारांनीं ती क्रांति दाबून टाकण्याची खटपट केली. कुठें धरपकड कर, तर कुठें लाठीहल्ला कर, कुठें दंड बसव, तर कुठें गोळीबार कर, असा क्रूर प्रकार त्यांनीं ह्या अहिंसक सैनिकांवर सुरूं केला.

हे सर्व प्रकार सदाशिवरावांच्या डोळ्यांदेखत घडत होते. आधींच चिडलेलें त्यांचे मन ह्या प्रकारामुळें जास्तच खवळलें. शिवाय त्यांना हवी असलेली क्रांति घडत असल्यामुळें त्यांना स्वस्थ बसणेंच शक्य नव्हतें. त्यांनीं मागचा पुढचा कसलाही

विचार न करतां आहे ही संधि योग्य समजून मिठाच्या सत्याग्रहांत भाग घेतला.

व्हायचें तेंच झालें. सरकारनें त्यांची सरदारकी काढली व त्यांना पांच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. अपेक्षेप्रमाणें ह्या गोष्टी घडत गेल्यामुळें त्यांना त्याचें कांहींच वाईट वाटलें नाहीं. पण संकटं कधीं एकटीं येत नसतात. त्यांना कल्पना नव्हती अशा विचित्र गोष्टी त्यांच्या मागें त्यांच्या घरीं घडल्या. एका सरदारानें जनतेच्या क्रांतींत भाग घेणें ही सरकारच्या दृष्टीनें लहान सहान गोष्ट नव्हती. त्यानें सदाशिवरावांना शिक्षा ठोठावली होती तरी त्याचा पूर्ण वचपा निघाला नाहीं असें त्यांना वाटत होतें. सदाशिवरावांच्या मागें सरकारनें त्याच्या घरांत थैमान घातलें. त्यांचा वाडा लिलावांत काढला. शेतवाडी लिलावांत काढली आणि त्यांच्या पत्नी व धाकटा मुलगा अमर ह्यांना घराबाहेर काढले. तेव्हां कुठं सरकारला बरं वाटलं.

सदाशिवरावांच्या मानी पत्नीनें आपल्या पुत्रासह तो वाडा सोडला व ती पुण्यास तिच्या बहिणीकडे येऊन राहिली. पण थोड्याच दिवसांत त्या माऊलीनें अंथरुण धरलें व त्यांतच ती मरण पावली. बिचारा अमर मात्र पोरका पोर झाला.

सदाशिवरावाना ह्या गोष्टी जेव्हां तुरुंगांत कळल्या त्यावेळीं तर त्यांनीं हायच खाल्ली. आपण आतां जगूं नये असेंच त्यांना वाटत होतें. पण दुःखाचा पहिला भर ओसरतांच

काळानें त्यांना ह्या अविचारापासून परावृत्त केलें आणि त्यांना आठवण करून दिली कीं, सदाशिवराव तुम्हांला तुमचे कार्य चालवायचे आहे. तुमची भावि पिढी तुम्हांला तयार करावयाची आहे. तुमचा अमर तुमची त्यासाठीं वाट पहात आहे. जगासाठीं नाहीं तरी निदान तुमच्या अमरसाठीं तरी तुम्हांला आतां जगलं पाहिजे.

मग मात्र त्यांनीं ठरवलं कीं, कांहीं कां होईना पण अमरसाठीं जगायचंच म्हणून.

पांच वर्षे चुटकीसरशीं संपलीं. आणि सदाशिवराव तुरुंगाबाहेर पडले. ते आतां बाहेर आले ते निराश न होतां. नवीन गोष्टी, नवीन विचार शिकून बाहेर आले.

ते तुरुंगाबाहेर पडले ते प्रथम अमरला भेटण्याकरितां मावशीकडे गेले. तेथें त्यांना त्यांचा अमर भेटला. खूप मोठा झाला होता तो. त्याला पाहताच त्यांनीं त्याला कडकडून मिठी मारली. किती गोड दृश्य होतें तें. शिवाजी आणि शहाजीच्या भेटीचा अपूर्व आनंदच जणुं काळ परत बघत होता.

मावशीच्या आग्रहावरून थोडे दिवस ते तिथें राहिले. पण तिथें फार काळ राहणें त्यांना प्रशस्त वाटत नव्हतें. त्यांना त्यांचें कार्य परत चालूं ठेवावयाचें होतें. त्यांत सुधारणा करायच्या होत्या. नवीन कांहीं योजना आखावयाच्या होत्या. नि शिवाय अमरला शिकवण द्यायची होती. म्हणून ते अम-

रच्या मावशीला दुसरीकडे जायची परवानगी मागत होते. पण मावशीला मात्र ह्या गोष्टी पसंत पडत नव्हता.त्या नेहमीं हा विषय टाळायला पहायच्या. पण एके दिवशीं मात्र सदाशिवरावांनीं त्यांना पूर्णपणें गाठलें व ते म्हणाले, "मावशी,झाले. आतां खूप दिवस झाले, आतां आम्हांला गेले पाहिजे. आहे ते कार्य अर्धे टाकून कसें चालेल" त्यावर मावशी म्हणाल्या, "हे पहा, तुम्हाला जावयाचे तर तुम्ही खुशाल जा, पण अमरला मात्र मी माझ्यापासून सोडणार नाहीं." मावशीच्या ह्या बोलण्याचे सदाशिवरावांना खूपच आश्चर्य वाटलें व ते म्हणाले, "अमरला कां बरे नेऊं नको ? त्याच्यासाठीं तर मी ही सारी धडपड करीत आहे." मावशी म्हणाल्या, "म्हणजे ? नको ग बाई त्याला न्यायला–त्याला तुम्ही नीट वळण देणार नाहीं, तुमच्यासारखीच तुम्ही त्याच्या आयुष्याची नासाडी करून टाकाल. अजून तुमची देशभक्तीची हौस कांहीं फिटलेली दिसत नाहीं."

"मावशी परतंत्र देशांतल्या व्यक्तीला देशभक्ति ही हौस नसते तें त्याचें कर्तव्य असतें." सदाशिवराव म्हणाले.

"कसलं कर्तव्य आलं आहे बोडख्याचं. घरादाराचं वाटोळं करायचं, बायका-मुलांना मारायचं, स्वतःच्या सुखाचं आयुष्य सोडून दुःखांत होरपळत पडायचं. कशासाठीं हे सारं करायचं तर लोकांच्या सुखासाठींच नां ? पण तुम्हीं ज्यांच्यासाठीं मरतां आहांत त्याना तरी तुमची कुठें पर्वा आहे. पहा पहा

हे लोक. एवढा मोठा सत्याग्रह झाला. पण पहा कसे आपले व्यवहार सुरळीत चालवले आहेत त्यांनीं. नाहीं तर तुम्हीं. अहो जीवाला जीव देणारासाठींच आपला जीव द्यावा नाहीं तर ह्या कृतघ्नांच्यासाठीं मरून काय फायदा होणार ? ” मावशींची तोफ धडपडत होती. तिला मध्येंच अडवीत सदाशिवराव म्हणाले, “ मावशी, चुकता आहांत तुम्हीं. माझ्याप्रमाणें लाखों लोकांनीं ह्या लढ्यांत कमी अधिक प्रमाणांत भाग घेतला पण लढा यशस्वी होऊं शकला नाहीं, ह्याचा दोष त्यांच्याकडे नाहीं. त्यांना मिळालेली शिकवण, त्यांना दिलेला त्यागाचा धडा अपुरा पडला म्हणून तो दोष आमल्यासारख्या नेत्यांच्याकडे जाईल. मावशी, त्यांतून संसार कुणाला सुटला आहे कां? मग तुम्हींच सांगा अर्धवट होरपळून निघालेले हे सामान्य लोक परत संसाराच्या मोहमायेंत गुरफटले गेले तर तो दोष सर्वस्वीं त्यांचाच आहे असं म्हणतां येईल कां ? पुढें मागें असा लढा झाला तर जनतेचा त्याग अपुरा पडूं नये म्हणून आम्हांला आतां घरादाराबाहेर पडलं पाहिजे. पराजित सैनिकांच्या अंगीं परत उचल खाण्यासाठीं जो प्रामाणिकपणा जें धैर्य लागत असतें ते त्यांच्या अंगीं परत आणण्यासाठीं नको कां आम्हांला त्यांना धडे द्यायला ? ही वेळ योग्य आहे. ह्या संधीचा जर आम्हीं फायदा घेतला नाहीं तर भावी पिढी आम्हांला दोष दिल्याशिवाय राहणार नाही.”

“ पण तुम्हीं मला सांगा कीं, त्यांत आपल्यावांचूनच काय अडलं आहे ? ”

" मावशी, देशकार्य हें एकट्या दुकट्याचं काम नाहीं. सर्वांनीं त्याला हातभार लावायला पाहिजे. प्रत्येकजण जर माघार घेऊं लागला तर देश स्वतंत्र कधींच होणार नाहीं. तुम्हांला माहीत आहे, एकदां एका राजानें सर्वांना दूध आणा-वयास सांगितलें होतें. पण प्रत्येकानें पाणीच आणलें. ज्याला त्याला वाटत होतें, आपल्या पाण्यानें काय होणार आहे. तशीच ही गोष्ट आहे. ह्यांत प्रत्येकानें आलें पाहिजे आणि प्रामाणिकपणा दाखवला पाहिजे."

" 'बरं, पण मग अमरला कशाला न्यायला पाहिजे ? " मावशीनें प्रश्न केला.

" मावशी मी हें जें कार्य करीत आहे तें दोन दृष्टीनें. एक सध्यांची पिढी प्रतिकारक्षम व्हावी म्हणून आणि भावी पिढीसाठीं मी प्रगति करून ठेवावी म्हणून. मी माझ्या त्यागानें, अनु-भवानें अमरसाठीं एक इतिहास निर्माण करून ठेवला आहे. ह्याचा उपयोग जर त्यानें घेतला नाहीं तर मी केलेल्या कार्या-चा कांहींच उपयोग झाला नाहीं असें होईल. हें पहा, माझ्या ऐपतीप्रमाणें मी आज एक पाय उचलून पुढें टाकला आहे. हा पाय जर मी परत मागें घेईन तर अमरला मी केली तेवढीच प्रगति परत करावी लागेल. तसं होऊं नये म्हणून मला अम-रला न्यायचं आहे. मावशी, माझ्या हातून अमरची खाण्या-पिण्याची आबाळ होईल पण आईची म्हणजे जिजाबाईची

शिवाजीला दिली तशी शिकवण देणारी उणीव मात्र भासणार नाहीं. मावशी, अमरचा काळ फार उज्ज्वल आहे, धडाडीचा आहे, त्यागाचा आहे. त्या काळांत माझा अमर जर पांगळा राहिला तर मला मेल्याहून मेल्यासारखें नाहीं कां वाटणार ? ”

अशा प्रकारें त्याच्यांत वादविवाद झाला. मावशीनें पूर्ण-पणें माघार घेतली. त्यांनीं अमरला सदाशिवरावांच्या स्वाधीन केलें.

सदाशिवरावांनीं अमरसह पुण्यासच बिऱ्हाड ठोकलें. स्वतः-चं पोट भरण्यासाठीं एका शाळेंत नोकरी धरली. उरलेल्या वेळेंत साक्षरता प्रसाराचें, खादी केंद्राचें ते काम बघत. वेळ फुकट म्हणून कधी ते दवडीत नसत. देशकार्याच्या नाना विभागांत ते झटून काम करीत, पण त्यांचें सारें लक्ष अम-रच्या शिक्षणाकडेच असायचं.

—जनतेवर नाना प्रकारें उपकार करणारें झाड जसें आपली फळं पुष्ट व्हावींत म्हणून झटतें तसें ते झटत होते.

अमर वयांत आल्यावर त्यांनीं तो नको नको म्हणत असतांना एका सुशिक्षित सुंदर मुलीशीं त्याचे लग्न करून दिलें. आणि त्याला पटवलें होतें कीं, संसार करून देशकार्य करणं आणि देशकार्य करीत असतांना देखील संसार न विसरणं ह्यांतच खरं कौशल्य आहे म्हणून. अशा ह्या कांहीं खाजगी गोष्टी-प्रमाणेंच त्यांनीं त्याच्या राजकीय दृष्टिकोणालाही निराळें वळण लावलें होतें.

ते ज्या वेळीं राजकारणांत पडले होते त्या वेळीं काळ असा होता कीं, टिळकांच्यामुळें समाजांत इंग्रजांच्या विरुद्ध असंतोष निर्माण झाला होता. हा असंतोष मात्र वैयक्तिक रीत्या बाहेर पडत होता. भगतसिंग, चाफेकर, राजगुरू हे त्या वैयक्तिक असंतोषांचे प्रदर्शक होत. पण हा असला असतोष दाबून टाकण्यास साहेबाला थोडाच वेळ लागणार ? त्यांनीं त्या चळवळी निमिषार्धांत दाबून टाकल्या. अशा गोष्टी अमरला सांगून त्यांनीं त्याच्या अनुभवावरून त्याला पटवलें कीं, वैयक्तिक त्यागाचा व्हावा तितका उपयोग होत नाहीं म्हणून. स्वातंत्र्य संपादनाचें कार्य जर चिरकाल चालूं ठेवायचें असेल तर त्याला संघटनेची जरूरी आहे. संघटनेच्या भरभक्कम पायावरच उभारलेली क्रांति कधींहि अयशस्वी होत नाहीं. लाखो ओढयांनीं एक नदी होते आणि हजारो नद्यांनीं एक समुद्र होतो कोणीही काय समुद्रालाच भिणार एकट्या ओढयानें कितीही उत्पात केला तर त्याचा थोडाच उपयोग होणार आहे. अशा ह्या सान्या गोष्टी सदाशिवरावांनीं अमरला सांगून त्याला देशांत निरनिराळ्या ठिकाणीं विभागलेली असंतोषाची शक्ति एकत्र जमवावयाची कल्पना दिली होती.

अमरलाही त्या गोष्टी पटल्या होत्या त्यानेंहीं त्याप्रमाणें कार्यास सुरवात केली. भावी काळांत एकदां प्रचंड लढा होईल आणि त्या लढ्यासाठीं आपण जर हीं सुसंघटित शक्ति उपयोगांत आणली तर त्याचे परिणामही चांगले होतील हें

त्याला स्पष्ट दिसत होतें. त्या दृष्टीनें त्यानें कामास सुरवात केली. ठिकठिकाणीं हिंडून फिरून त्यानें स्वयंसेवक संघ स्थापन केले. त्यांच्यापुढें निरानिराळे कार्यक्रम ठेवले. आणि त्यांना संघटित सैनिक वृत्तीचें महत्त्व पटवून भावी लढ्यासाठीं तयार केलें.

पण हें काम पुरें होण्याच्या आंतच १९४२ चा प्रचंड लढा राष्ट्रांत घडला. आणि अमरची संघटना अर्धवटच राहिली गेली.

सदाशिवरावांना असा लढा कधींतरी होणार ह्याची खात्री होती. ते लढा बघत होते. ह्या लढ्यांत त्यांना निरानिराळ्या गोष्टी दृष्टोत्पत्तीस येत होत्या. ' करेंगे या मरेंगे ' हा मंत्र ओठावर नाचत असलेले लोक हिरीरीनें भाग घेत असलेले दिसत होते.

एकट्या एकट्यानें लपत छपत जाऊन सरकारी कचेरी जाळण्यापेक्षां सामुदायिक रीत्या हातांत मशाली घेऊन गर्जत गर्जत सरकारी कचेऱ्या जाळण्याचें धैर्य लोकात आलेलें ते पहात होते, वीस वर्षांपूर्वी जें अशक्य वाटत होतें तें शक्य कोटींत उतरत होतें. त्यामुळें त्यांना एक प्रकारचं समाधान लाभत होतं, एक गोष्ट मात्र त्यांना त्या समाधानांत दुःख देत होती आणि ती म्हणजे लोकांत दिसून येणाऱ्या सुसंघटनेच्या अभावाची.

पूर्वीपेक्षां लोक जास्त हिरीरीनें भाग घेत होते, त्यांच्यात असंतोष जास्त पसरला होता सामुदायिक चळवळीचें महत्त्व त्याना पटलें होतें. ह्या गोष्टी जरी खऱ्या होत्या तरी त्यांच्या कार्यक्रमांतून दिसणारा विस्कळीतपणा, अपुरें मार्गदर्शन ह्यामुळें त्यांचा कार्यक्रम हुल्लडबाजीचा एक प्रकार वाटत होता. अर्थात ह्या सर्व गोष्टी अगदीं नव्यानेंच घडत असल्यामुळें त्यांत चुका त्या राहाणारच होत्या. त्या चुका काळ दुरुस्त करणार होता त्यामुळें सदाशिवरावांना तितकेसें भय वाटत नव्हतें. त्यामुळेंच त्यांनीं अमरला आहे त्या सैनिकांनिशीं लढयांत भाग घ्यावयास लावलें. अमरनें अर्थातच आपल्या वडिलाची आज्ञा शिरसावंद्य मानली आणि लढयात उडी घेतली.

वीसपंचवीस वर्षांचा एक तरुण मुलगा आपल्या प्रिय पत्नीला आणि नुकत्याच जन्माला आलेल्या बालकाला सोडून हातावर शिर घेऊन लढण्याकरितां बाहेर पडला.

इंग्रजांची खोलवर गेलेली पाळंमुळं उखडून टाकण्याकरतां अमरला आपल्या सैनिकांसह भूमिगत व्हांवं लागलं. त्यांत अपार दुःखं सहन करावीं लागलीं. अनेक अडचणींना तोंड द्यावं लागलं. पण अमर वडिलांचा आशिर्वाद घेऊन निघालेला अमर, संघटित सैनिकांचा नेता अमर त्याला बिलकूल डगमगला नाहीं.

हातून होतील तितकीं कामें करण्यांस त्यानें सुरवात केली. त्यांत त्याला यशही मिळूं लागलें पण तें यश चिरकाल टिकणारें नाहीं, असेंच जणूं त्याला वाटत होतें. तरी पण तो काम करीत होता. रेल्वेरुळ उखडणें, तारा तोडणें, खेडेगाव स्वतंत्र करणें, हें त्याचें काम होतें. तो त्यांत तत्परतेनें भाग घेत होता. अशाच एका धाडसाच्या प्रसंगीं त्याला न कळत शत्रूचा त्याच्यावर हल्ला झाला. आणि त्यांत अमर कामास आला. अमर गेला. आणि त्याचें कार्य पुढें थंडावलें.

त्यानें स्वतःला धन्य करून घेतलें. प्राणाच्या पंचारतीनें हिंद देवीला ओवाळलें. रक्ताच्या थेंबानें तिला अभिषेक घातला अमर मरून अमर झाला. दबून गेलेलं मराठ्यांच्या मानकऱ्यांचं, एका सरदार घरण्याचं एक रत्न जनतेच्या पायांवर पडून धन्य झालं.

विस्तवाशी खेळल्यानंतर कधींही चटका बसायचाच, ह्याचा सदाशिवरावांना अनुभव होता. त्यामुळें अमरच्या मृत्युनें ते थोडे देखील डगमगले नाहींत. उलट अमरला सरदार घराण्यांतील वीराचं मरण आलं म्हणून त्यांना धन्यता वाटली.

संघटनेच्या आणि अपुऱ्या मार्गदर्शनाच्या अभावीं ४२ चा लढा यशस्वी होऊं शकला नाहीं. त्यानंतर चार वर्षें लोटलीं. आणि सगळीकडचे व्यवहार सुरळीत चालूं झाले.

सरदार पटवर्धनांच्या त्या घराण्यांत आतां तीनच व्यक्ति होत्या. एक म्हणजे म्हातारे सदाशिवराव, दुसरी त्यांची सून, तिसरी अमरचा छोटा बालक अरुण.

अमरच्या मृत्युनें पटवर्धन कुटुंबावर फार मोठें संकट कोसळलें होतें. सदाशिवराव म्हातारे झाले होते त्यांच्या हातून फार थोडीं कामें होत. त्यांची सून एक पोर असल्यानें तिच्या हातून कामें करून घेणें त्यांना प्रशस्त वाटत नव्हतें. त्यामुळें सदाशिवरावच स्वतः होतील तितके कष्ट करीत आणि तिघांचें पोट भरीत. राजदरबारीं सरदार म्हणून फिरणारे सरदार पटवर्धन स्वतःच्या सुखाचा त्याग करून जनतेचे खरेखुरे सरदार झाले होते. पण जनता मात्र त्यांच्याकडे द्यावें तसें लक्ष देत नव्हती.

सदाशिवराव दिवसभर कामें करून रात्रीं घरीं येत. त्यावेळीं छोटया अरुणला घेऊन ते बसत. तो गोष्टी सांगा असें आजोबांना म्हणे. आजोबांनाही तेंच हवें होतें. ते त्याला निरनिराळ्या गोष्टी सांगत.

एके दिवशीं शिवाजीची गोष्ट सांगत असतांना त्यांची सून तें ऐकत होती. तिला काय वाटलें कोणास ठाऊक पण कधीं न बोलणारी ती सदाशिवरावाना दाराआड उभं राहून म्हणाली "मामंजी, नका शिकवू कांहीं असं भलतं सलतं अरुणला. ह्या देशभक्तिच्या वेडानं तुम्हीं तुमचा नाश करून घेतलात, त्यांना प्राणाला मुकावं लागलं, आणि आपल्याला ही दशा प्राप्त झाली. कशासाठीं हें सारं करायचं? लोकांसाठींच ना?

पण लोकांना कुठें आहे आपल्या त्यागाची पर्वा, पहा जिकडे तिकडे सगळे व्यवहार कसे सुरळीत चालूं झाले आहेत ते. जणूं काहीं लढा झालाच नाहीं, असं सगळीकडे दिसत आहे. मग सांगा आपणच असा चट्टा का लावून घ्यायचा ? ”

सून बाईचे हे उद्गार ऐकून सदाशिवराव गंभीर झाले व तिला म्हणाले, “ बाळ चुकतेस तूं. प्रत्येक माणूस हा आपला इतिहास तयार करून ठेवीत असतो. आपलेंच पहा ना. माझ्या वडिलांच्यावेळीं असा काळ होता कीं, देशासाठीं आपल्याला त्याग करावयाचा आहे. ही भावनाच मुळीं त्यावेळीं कोणात नव्हती. माझा काळ आला त्यावेळीं मला माझ्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध उठावंस वाटलं, माझ्या अमरचा काळ असा आला कीं, त्याच्यांत प्राणार्पण करण्याचं देखील धैर्य प्राप्त झालं. उद्यां माझ्या अरुणचा काळ असा येईल कीं, अन्याय करणारी शक्ति त्याच्या शक्तीकडे पाहूनच शरण येईल ! असा आम्हीं आमच्या घराण्यांत इतिहास निर्माण केला आहे. प्रत्येकानें प्रत्येकाच्या अनुभवाचा फायदा घेऊन त्याचें मार्गदर्शन करून पुढें पाऊल टाकलें आहे. तें काय त्यागाशिवाय. आमच्यापैकीं कोणीहि कार्य अर्धवट सोडलें असतें तरी, आज दिसत असलेली प्रगति खचित दिसली नसती. बाळ, तूं म्हणतेस मग आपणच कां चट्टा लावून घ्यायचा. बाळ, आपण केला असाच त्याग इतरही घराण्यांतून झालेला आहे, म्हणूनच ही थोडीफार प्रगति झाली आहे.

आपल्यासारखीं त्यागी घराणीं थोडीशींच आहेत. अजून त्यांची संख्या वाढायची आहे. तोंपर्यंत आपल्याला ही अशींच प्रगति दिसायची. आज तूं मला प्रश्न केला आहे तोंच प्रश्न अमरच्या वेळीं त्याच्या मातृशीनें केला होता. त्यावेळीं मी त्यांना समाधानपूर्वक उत्तर दिलें होतें. आज मी तुला तेंच सांगत आहे.

२० सालीं ज्यांनीं त्याग केला, त्यापेक्षां ४२ सालीं त्याग करणारांची संख्या जास्त होतीना? ही कशी वाढली? लोकाचे व्यवहार सुरळीत चालले आहेत, म्हणून होय? छे: आपल्यासारख्या अनंत लोकांनीं त्याग करून प्रगति करून, इतिहास निर्माण करून भावि पिढीसाठीं प्रगतीचें एक पाऊल पुढें टाकलें म्हणून, होय ना? मग तूंच सांग कीं, आम्हीं हातीं घेतलेल्या कार्यांत आम्हांला थोडेंतरी यश आलें कां नाहीं?

अग, अक्रोडाचं झाड आजोबानें लावलं कीं, त्याचीं फळं नातवाला चाखायला मिळतात. आमच्या आजोबांनीं तें झाड लावण्याचें कष्ट घेतले नाहींत. त्यांचीं फळं आम्हाला चाखायला मिळालींच. मग ती चूक आम्हीं समजून उमजून देखील करायला पाहिजे कां?

मी अक्रोडाचं झाड लावलं, अमरनें स्वतःच्या प्राणाचं खत त्यांत घातलं आतां त्याची फळं अरुणला चाखायला मिळणार आहेत. अरुण ती फळं चाखूं लागला कीं, त्याचा

आनंद मला आणि अमरला स्वर्गांत देखील अभिमानाचा वाटेल. अशीं तीं लवलेलीं फळं अरुणला चाखायला मिळा-वींत आणि पचवायला ताकद यावी. म्हणून मी त्याची आतां पासून तयारी करीत आहे." असं म्हणून ते थांबले. सूनबाई तर चूपच झाली होती. ती गप्प उभी आहे असें पाहून सदाशि-वराव मोठ्यानें हसले व अरुणकडे बघून म्हणाले, "हं काय अरुण मग व्हायचं ना देशसैनिक ?"

बाळ अरुण उत्तरादाखल हसला. त्याचें ते गोड हसणें पाहून त्यांना वाटलें कीं, हिंदुस्थानच्या अंधाऱ्या क्षितिजावर हा स्वातंत्र्य अरुण तर हसत नाहीं ना ?

## ४

# एक बातमी

सह्याद्रीची दरीखोरी म्हणजे अद्भुतता आणि रम्यता ह्यांचं माहेरघरच आहे. ह्यांतील प्रत्येक वस्तून् वस्तू देवांनीं सारी कल्पकता खर्च करून नाविन्यपूर्ण अशी तयार केलेली आहे. एकीच साम्य दुसरींत नाहीं तर दुसरीचंही तिसरींत नाहीं. त्यांतील कांहीं गोष्टी मानवाला ज्ञात आहेत पण अजूनही कित्ती तरी गोष्टी अशा आहेत कीं त्याची मानवाला नुसती ओझरती कल्पना देखील नाहीं. कित्येक असे पक्षी आहेत कीं, ज्यांचे मंजूळ स्वर त्यानीं ऐकलें नाहींत. कित्येक अशी फुलपाखरं आहेत कीं, ज्यांची चव त्यांनीं चाखली नाहीं. कित्येक अशा वनस्पती आहेत कीं, ज्यांचा सुगंध त्यांना लाभला नाहीं.

कित्येक अशी रम्य ठिकाणं आहेत कीं, जीं अजूनही त्यांनीं पाहिलीं नाहींत. मग अद्भूत अशा त्या सृष्टींत त्या फळा-फुलांच्या पशुपक्षांच्या नित्य चालणाऱ्या रम्य व्यवहारांची, त्यांच्या लीलांची, त्यांच्या शृंगाराची, त्यांच्या सुखदुःखाची कोणाला काय कल्पना असणार? त्या दरीखोरींत रोज हजारों फुलं उमलतात आणि रोज हजारों फुलं मरतातही पण. पण जगाला ना त्याची दाद ना फिर्याद.

त्या त्यांच्या इवल्याश्या जीवांत, क्षणाच्या आयुष्यांत जो लढा निर्माण झालेला असतो त्या लढ्याला तोंड देण्यासाठीं त्यांना त्याग करावा लागतो. यश मिळवून भावि पिढीसाठीं इतिहास निर्मावा लागतो. जीवनाचें आपलें म्हणून कांहीं तरी विशिष्ट तत्त्व तयार करावें लागतें. ह्या सगळ्या गोष्टी मानवाला थोड्याच समजणार आहेत. नव्हे मानव त्याकडे ढुंकूनही पहात नाहीं. ते जसे जगांतून नाहींसे होतात तसेंच त्यांचें तत्त्व, इतिहास, त्याग सर्व गोष्टी नाहींशा होतात. जोंपर्यंत जगाला ते अज्ञात आहेत तोपर्यंत हें असेंच चालायचें त्याला कांहीं इलाज नाहीं.

ह्या अशा अज्ञात व्यक्तीचीच ही एक करुण कहाणी आहे.

सह्याद्रीच्या अकाळ विकाळ पसरलेल्या रांगेतच पांचवड नांवाचें एक अतिशय रम्य ठिकाण आहे. नाशिक जिल्ह्यांतील एका तालुक्याच्या गांवांपासून हें ठिकाण चार एक मैलां-

वर आहे. समाधिस्थ शंकराप्रमाणें भव्य व पवित्र दिसणारा काळाभोर कडा. शंकराच्या जटेंत विराजमान झालेल्या गंगे-प्रमाणें त्या कड्यावरून खालीं ओघळत येणारे रूप्यासारखे चकाकणारे पाण्याचे ओहोळ, अशा ह्या खुद्द देवांनींच पाठिंबा दिला आहे असें वाटणाऱ्या भव्य पार्श्वभूमीच्या ठिकाणींच पांचवड आपल्या अद्‌भुततेनें रम्यता निर्माण करीत आहे.

फार फार वर्षांपूर्वीं असं सांगतात कीं, इथें फक्त एकच वड होता पण पुढें हें झाड प्रचंड वाढलें. त्याची एक एक पारंबी दोन दोन जणाच्या विळख्यांत मावणार नाहीं एवढी होऊन जमिनींत घुसली नि परत दुप्पट वर फुटून फोंफावली. त्यामुळें येथें आतां एकंदर पांच वड फुटले आहेत. अलिकडे त्यांच्याही पारंब्यांनीं मुळं धरली आहेत ! हा विस्तार एकदर सरासरी दोन फर्लांगाइतका खास पसरलेला आहे.

त्या पांचवडात आणि मागील दरडींत वारा घुसला कीं, मोहून गेलेल्या नर्तिकेसारखा बेभान होऊन तो तिथं नृत्य करीत रहातो. त्यावेळीं त्या नृत्यानं तें ठिकाण अधिकच रम-णीय होतें. दरडींत घुसलेला वारा मुरलीसारखा गोड नाद काढतो. त्या आवाजांतच वडाचीं पानें सळसळून घुंगरा-सारखा नाद मिसळवितात. त्यांच्या ठेक्यावर जेव्हां गोड नृत्य सुरू होते तेव्हां आजूबाजूची सगळी सृष्टि त्यामुळें धुंद होऊन जाते. त्यांतच कड्यावरून पडणारे पाण्याचे ओहोळ फुलाच्या वासांनीं मिश्रित असें गोड तुषार चहुंबाजूला उड-

घून तेथील प्रत्येक अणून् अणूला उन्मादकारी बनवतात. हें सारं दृश्य पाहिलं, नव्हे नुसतं कल्पिलं तरी असं वाटतं कीं, छेः हें पृथ्वीवरचें ठिकाण नसावें. आणि मग वाटायला लागतं देवांनीं कधीं काळीं पृथ्वीवर आल्यानंतर उतरण्यासाठीं तर हें ठिकाण तयार केलें नसेल ना ?

—पण मानवाच्या संकुचित दृष्टीला तो पांचवड रमणीय म्हणून आवडत नाहीं तर त्याच्या विस्ताराच्या भव्यतेनेंच ते आकर्षिले गेले आहेत. असं सांगतात कीं पूर्वी एकदा एक राजा आपल्या सैन्यासह काहीं दिवस येथें तळ देऊन राहिला होता. आणि त्यानें ह्या पांचवडाचा उपयोग एखाद्या किल्ल्या-सारखा केला होता. खरंच पांचवड हा प्रचंड किल्लाच आहे. हल्लीं देखील पांचवड ओलांडून मुख्य वडाकडे जायचं म्हणजे एकट्या दुकट्याला तर भीतीच वाटते. त्या राजानें जरी त्याचा किल्ल्यासारखा उपयोग करून घेतला असला तरी मला मात्र तो किल्ल्यासारखा न दिसतां एखाद्या राजवाड्या-सारखाच दिसत आहे. नक्षी कोरलेल्या खांबाप्रमाणें जमिनींत रुतलेल्या पारंब्या, झाडाखालची ती दाट छाया आणि त्यावर गालीच्याप्रमाणें दिसणारा चित्रविचित्र पानांचा थर. लांबून पाहिलें कीं उंचच उंच वाढलेले व सूर्याच्या उन्हानें सोनेरी शिखराप्रमाणें दिसणारे कोवळ्या पानांचे डेख, पारंब्यावरनं चढ-लेले व रेशमाच्या पडद्याप्रमाणें झिरझिरीत दिसणारे गारवेलीचे वेल. हे सगळं पाहिलं कीं, राजवाड्याचीच आठवण होते.

आपण कल्पनेनं म्हणतो कीं तो राजवाडा आहे म्हणून पण तेथें राहणाऱ्या पक्षांना विचारलें तर ते खरंच म्हणतील कीं, हा आमचा राजवाडा आहे म्हणून. राजापेक्षांही जास्त काळजी हा पांचवड त्या राजविंडाची घेतो. तो उन्हांची तिरीप कधीं त्यांच्या पिलांना पोहचूं देत नाहीं. वाऱ्याचा स्पर्श कधीं घरट्यांना होऊं देत नाहीं कीं धों धों पाऊस पडला तरी पाण्याचा थेंब कधीं कोणाच्या अंगावर ठिपकूं देत नाहीं. त्यामुळें पांचवड हा सगळ्यापेक्षां इथल्या पक्षांना फारच प्रिय झालेला आहे. नव्हे सगळेजण त्याला अगदीं देवाप्रमाणें भजतात !

रात्रीच्या आकाशांत जशी लाख लाख चांदणी चमकत असते तसं ह्या पांचवडाच्या अंधारांत लाखों पक्षांचे डोळे लुकलुकतांना दिसतात. येथें एका जातीचे कां पक्षी आहेत ? छेः नाना जाति नि नाना प्रकार. इथें इवल्याशा चिमण्याची चिवचिव चाललेली असते तसें कोकिळेचे नितांत सुंदर संगीतही घुमत असते. पारव्यांची घु घु व कावळ्यांची काव काव ह्यांनीं दिवसा गंभीर वाटणारा पाचवड रात्रीं शांत वाटूं नये म्हणून कीं काय इथें घुबडाचे घुत्कार आणि वटवाघळांची भेसूर फडफडही चाललेली असते.

ही अशी नाना तऱ्हेच्या जातीच्या पक्षांचीं घरटीं इथें ठिकठिकाणीं बांधलेली दिसतात. एका कुटुंबाच्या प्रेमळपणानें हे सारेजण रहात असल्याचा आपल्याला भास होतो.

पण प्रत्यक्ष पाहिलं तर मात्र तसं नाहीं. एखादी नदी रस्त्यानें जात असतांना जशी आपल्या कांठच्या झाडाझुडपांची काळजी घेत नाहीं तसा कांहींसा रोख आहे ह्यांचा जीवनाकडे पहाण्याचा. तसे दिसतांना सगळे प्रेमळ दिसतात एकमेकांविषयीं. पक्षांत नवरा बायकोच्या तात्पुरत्या नात्याशिवाय इतर नातीं नसतात त्यामुळें इथें फांदी फांदीवर दिसणाऱ्या प्रत्येक घरट्यांत 'राजा-राणी आणि युवराजांची जोडगोळी' ह्याशिवाय जास्त फापट पसारा कधीं दिसत नाहीं. त्यामुळें ह्यांचें जीवनविषयक तत्त्वज्ञानच मोठें विचित्र बनलें आहे. दिसायला सगळे प्रेमळ आणि भोळेसांब दिसतील. कोकिळा आपलीं अंडीं कावळ्याच्या घरट्यांत ठेवील पण कावळे कधीं बोंब मारून उठणार नाहींत. चिमण्या पारव्याशेजारीं घरटीं बांधतील पण पारवे कधीं त्रास झाल्यानें तक्रार करणार नाहींत. घुबडांच्या भेसूर ओरडण्यानें पोपटांच्या पोपटपंचींत कधीं खंड पडणार नाहीं. असें पाहिल्यानंतर कोण म्हणणार नाहीं कीं हे सर्वजण प्रेमळ नाहींत म्हणून. पण हा सगळा प्रेमळपणा दिखाऊ आहे. त्यानीं प्रत्यक्ष फायदा असा कोणाचाच केलेला नाहीं. आपण त्यांचे दैनंदिन कार्यक्रम बघूं म्हणजे आपल्याला पटेल कीं, इतरांविषयीं त्यांच्या मनांत किती ओढा आहे तो.

रोज सकाळीं पूर्वेला फुटायच्या आंत आपल्या पिलांना नीट ऊबदार घरट्यांत ठेवून धान्यासाठीं बाहेर पडायचं. सूर्य

माथ्यावर आला नि आकाश तापलं कीं परत पोराबाळांत येऊन पडायचं. उन उतरलं कीं, परत बाहेर जायचं. वाऱ्या-सारखं मोकाट भटकायचं आणि रात्र पडली कीं, घरच्या ओढीनं धावत घरट्यांत येऊन पिलांसह झोंपायचं. हा त्यांचा कार्यक्रम. मग सांगा कोठून वेळ होणार त्यांना इतरांना प्रेम द्यायला! स्वतःच्या स्वतःपुरतं पहायचं असा जणूं संकेतच आहे! ते कोणाशीं होऊन भांडणार नाहींत पण मग इतकंही खरं कीं, शेजारचा भुकेनं उपाशी मरत असेल तर चौकशी कांहीं करणार नाहींत. पक्षांतही इतरांच्याप्रमाणें जाती आहेत आणि आश्चर्य असं कीं, त्यांतही उच्चनीचता आहे. त्यांतही नियम आणि शिक्षा आहेत, त्यांतही रूढि आणि संकेत आहेत. त्या जातींत पोपट ही जात स्वच्छ बोलणारी असल्या-मुळें ब्राह्मणासारखी उच्च आहे तर कावळा ही जात हाडकं चघळीत असल्यामुळें हरिजनांसारखी कनिष्ठ आहे. ह्यात बेटी पद्धति तर होत नाहींत पण एकमेकांची 'रोटी' ही पण खात नाहींत. ह्या अशा कालांतरानें पडत आलेल्या रूढींत-ही कांहीं घाण गोष्टीही मिसळल्या गेलेल्या आहेत आणि दुर्दैव असं कीं, हा समाज अजूनही त्यांनाच चिकटून बसलेला आहे. हेंच पहाना पिलं थोडीशी मोठीं होतात, जातात निघून दूर. मग नाहीं विचारत ते आपल्या आई-बापांना, मग त्यांनीं नवीन घरटीं बांधली काय किंवा ते उपाशी मेले काय, कोणीच त्यांची काळजी घेत नाहीं. अशा-

मुळें आहे हें असें आहे, जीवन हें आपल्यासाठीं आहे, आला दिवस सुखांत घालवायचा, उद्याचं कोणी पाहिलंय अशी कांहीं तरी चमत्कारिक रूढि निर्माण झाली आहे. दुसरें असें कीं, हे असें वागणारे पक्षी नेहमींच असें वागतात असें म्हणावें तर ते चूक आहे. कारण सुखांत वा दुःखांत कोणा· कडेही ढुकून न बघणारी ही जात कोणी धर्माविरुद्ध किंवा रूढीविरुद्ध वागला कीं, मग मात्र सारे बळ एक करून त्याचें जिणें नको नकोसें करतात. तो मेला तर त्यांना कांहींही वाईट वाटत नाहीं. उलट आपण धर्म जागवला अशीच जणुं शेखी ते मिरवतात. ज्या नियमबाह्य अशा गोष्टी आहेत त्यांत बाटणें ही प्रमुख होय. कोणी पक्षी बाटला कीं तो मेला अशीच धर्मानें त्याला शिक्षा दिलेली आहे. हें पक्षासारख्या जातीला लांछनास्पद आहे त्या जातीला हा काळेपणा आहे हें सगळें खरं आहे पण हें कोणाला सांगून कां पटणारें आहे ?

पांचवडांत अशा बाटग्यांना शिक्षा देण्याची अनेक उदाहरणें मी माझ्या घरट्यात बसून पाहिली आहेत. ते निरपराधी मृत देह पाहून मी रडलेही पण आहे. पण डोळ्यांतून गळणाऱ्या त्या अश्रूंना कां ह्या क्रूर जगात किंमत आहे ? ह्या अनेक पक्षांत असे निरपराधी पक्षी मात्र आम्हां पोपटांच्याच जातींत फार सांपडतात. आम्हीं दिसायला सुंदर असतों, तसेंच आवाजानेंही गोड असतों. साहाजिकच कोणालाही आमचा मोह उत्पन्न होतो. पण त्याचा परिणाम मात्र भयंकर होतो.

जन्म जन्म तुरुंगांत कंठावा लागतो वा सुटल्यानंतर जाती-साठीं जीवदान तरी करावे लागते. आम्ही पोपट म्हणजे पक्षांतील उच्च जात, सुशिक्षित जात आणि आम्हीं असा अपराध करावा हा जणूं आमच्या समाजाला बाऊच वाटतो. सगळेजण आमच्या ह्या कृत्याबद्दल आमच्यावर तुटून पडतात. मागचा पुढचा कसलाही विचार न करतां आम्हाला ठार मारतात त्याना जणूं असेंच वाटतें कीं, हे शिक्षित लोक जर धर्मबाह्य वर्तणूक करूं लागले तर मग खालचा वर्ग तसं न वागूं लागेल तरच आश्चर्य ?

माझ्या लहानपणींच मी असा एक प्रसंग पाहिला होता. त्या वेळेपासूनच मी ह्या दुष्ट रूढीबद्दल विचार करीत आहे. वाटतं कसं समजून द्यावं ह्या सगळ्यांना कीं, हा दोषी नाहीं म्हणून. आणि मी म्हणते, काय अधिकार आहे हो त्यांचा एका बाटग्यावर आपला हक्क गाजवायचा केली कां कधीं त्याची चौकशी. विचारलें कां कधीं त्याच्या दुखण्या खुपण्याबद्दल. मग आतांच कां आली धर्माची आणि अब्रु राखण्याची हुरुहुरी. ज्या वेळीं मी विचार करते त्या त्या वेळीं मला अगदीं चीड येते. वाटतें साऱ्यांना अगदीं ओरडून सांगावें कीं, चला हटा बाजूला. काय संबंध आहे तुमचा त्याला शिक्षा द्यायचा. जो प्रेम देतो त्यालाच अधिकार येतो एखाद्याला शिक्षा करायचा. हे मेले कधीं कधीं कोणाच्या उपयोगी पडत नाहींत आणि—

माझेंच पहाना.

पांचवडाच्या एका टोंकाला आम्हां पोपटांची काहीं घरटीं आहेत. त्यांतच एका दुबाळक्यांत माझे एक जुने पुराणें आई-वडिलांनीं बांधलेलें छोटेसें घरटें आहे. मी लहान होते त्याच वेळीं एका सांथींत माझे आई वडील वारले नि त्या वेळेपासून मी पोरकी झाले. कोणी कोणी म्हणून मला कशाचीही मदत केली नाहीं. एवढी लहान मी पण मीही त्या मदतीची अपेक्षा कधीं केली नाहीं. आपलीं कामें आपण करायचीं आणि कोणाची मदत मागायची नाहीं ह्या परंपरेनें चालत आलेल्या गुणांमुळें माझ्यांत अगदीं लहानपणापासून स्वावलंबी वृत्ति भिनली आहे. मी लहान होते तरी मी उठायची, उडतां येत नव्हते तरी उडायची, धडपडायची, पारंब्यावर टकरा खायची, वेलींत गुरफटून बसायची तरी त्यांतच आनंद मानून पडतील ते कष्ट सहन करून पोटापुरतें अन्न मिळवायची. त्यांतच मी परंपरा-गत आलेलें स्वावलंबनाचें तत्त्व माझ्या जीवनांत आणीत होते. नाहीं म्हटलं तरी आज मला त्याचा फायदा होत आहे. हल्लीं मी एकटी आहे तरी चणचण म्हणून कशाची ती भासत नाहीं.

मी ज्या घरट्यांत रहात आहे ते माझ्या आईबापांनीं बांध-लेलं आहे. इतके दिवस झाले पण अजून ते टिकाव धरून आहे. खालच्या दोन चार काटक्या मोडत आहेत नि आंतली रुई जरा घाण झाली आहे पण अजून कांहीं मला ते सोडावेंसें

वाटत नाहीं. कसें वाटणार ? आईच्या पश्चात् त्यानें मला प्रेमाची ऊब दिली, ज्यानें वडिलांप्रमाणें माझें संकटांपासून रक्षण केलें तें माझं घरटं मी कसं सोडणार, जुनं झालं म्हणून प्रेम तुटणार थोडेंच.

त्या माझ्या लाडक्या घरांतच मी लहानाची मोठी झाले. आतां उडतांना कांहीं मी धडपडत नाहीं. पूर्वीसारखी हिरवे-गार पंख पसरून मी जेव्हा वाऱ्यावर झेप घेते तेव्हां खरो-खरच आकाशाला गवसणी घालण्याची उम्मीद येते मनांत आणि खरंच स्वर्ग दोन बोटं उरूं लागतो. लहानपणचें दौर्ब-ल्याचं कुंपण मोडून तारुण्याच्या मोकळ्या मैदानांत मी आतां स्वैर भटकूं लागले होते, तारुण्याचं उसळतं रक्त उलट्या वाऱ्या-ला देखील टक्कर देत होतं. मला आतां धान्य मिळवायला पूर्वीसारखेच कष्ट पडत पण काय असेल तें असो ह्या जीवनां-तही आता रम्यता निर्माण झाल्याचा भास मला होत होता. हिरव्यागार शेतावरच्या धान्याचे भरगच्च घोंस चपळाईनें तोडायचे, झाडींत घुसून धिटाईनें फळं कुरतडायचीं, नाजूक फांदीवर बसून स्वैरपणें हिंदोळायचं, गाणं गायचं, ह्यांत माझा आला दिवस मोठा गमतींत जात असे. वाटायचं सूर्याला कां कंटाळा येतो कुणास ठाऊक ? हं. त्याला कुठयत माझ्या-स रख्या गमती. सदान् कदा आपलं एकटं फिरायचं. तरीच म्हटलं इतका कां तापट झालाय तो !

पण खरं सांगूं मला देखील हल्लीं तसंच होऊं लागलं. रोज रोज भटकण्यामुळें त्यांतली गोडी नाहींशीं होऊन मला माझं जीवन एकाकी वाटूं लागलं. भटक भटक मी भटकायची आणि घरट्यांत येऊन बसायची. त्यावेळीं घरटं कसं सुनं वाटायचं. मेलं बाहेर तसं आणि घरट्यांतही तसं. असं कां होत आहे हें मात्र मला कळत नव्हतें. एकदां मात्र त्याचा उलगडा झाला. एकदां काय झालं दुपारच्या वेळीं मी घरट्यांत बसले असतांना माझी नजर सहज एका घरट्याकडे गेली. तिथें एक राघु-मैनेचं जोडपं चोंचीत चोंच घालून आनंदानं उञ्चा मोरीत असलेलं दिसलं. आणि कसंसंच झालं मला. म्हणून मी दुसरीकडे पाहिलं. तर दुसऱ्याही घरट्यांत तेंच. तीं इवलालीं गोड गोड पिलं कशी लुच्चीं नाचत होतीं. थोडसं पलीकडे पाहिलं तर एक मादी आपला पिसारा फुलवून नरापुढें नृत्य करीत असतांना दिसली. माझं अंग तर गोड गुदगुदल्यानं शहारलंच. पूर्वी रुक्ष दिसणारा पांचवड जणूं फुलून गेला आहे असंच मला वाटलं. खरं सांगूं मला तर कांहीं तरी निराळंच वाटूं लागलं. मी जसजसा विचार करूं लागले तसतसं माझें अंग शहारूं लागलें. मनांत कल्पना आली कीं, विचारांना असह्य करी आणि न कळत मला धुंद करून टाकीत.मग मी माझे पंख पसरायची नि मऊ मऊ रुईत अंग खुपसून प्रेमाच्या पूर्णतेची प्रचीति पहायची.

त्या दिवसांपासून कसें झालें कोणास ठाऊक पण मी इतर राघुंच्याकडे आकर्षिली जाऊं लागले. लाल लाल कंठ फुटलेला राघु दिसला कीं चटकन मी त्याकडे ओढ घेऊं लागायची आणि आश्चर्य असं कीं आतापर्यंत अबोल असलेले राघुही माझ्याकडे येण्याची इच्छा नाना प्रकारें दर्शवूं लागले. मला वाटतं त्यांनाही माझ्यासारखंच काहीं तरी होत असलं पाहिजे. एक राघू सकाळींच माझ्या घरट्यापाशीं यायचा. बोलायचा नाहीं कांहीं नाहीं पण मी बाहेर पडले कीं निघायचा माझ्या-बरोबर. तसाच दुसरा एकजण. पण त्याची पद्धत मेली फारच वाईट. यायचा तर माझी शेपटीच ओढायचा. नाहीं तर वरून पानेंच टाकायचा. मी एकदा दोनदां पाहिलं मला वाटलं होतं असेल चुकून पण कसलं आलं. मुद्दामच करीत होता तो. आणि दिसायला तरी काय होता अहाहा ! एक डोळा फुटका आणि दुसरा डोळा डुचका ! मोठा विलक्षण दिसायचा त्या-मुळें तो. नि त्याचे हसणें तरी किती क्रूर. मला तर भीतीच वाटायची. तो हसायला लागला कीं चोंच वर व्हायची आणि डुचक्या डोळ्यावर ताण पडून तो भयंकर क्रूर दिसायचा. म्हणून शक्य तों मी त्याला टाळायचा प्रयत्न करायची.

पुढें ह्या मेल्यांचा त्रास आणि एकाकी जीवनाची जाणीव मला स्वस्थ बसूं देईना. कोणी तरी जन्माचा जोडीदार शोध-ण्याकडे माझी प्रवृत्ति झुकूं लागली.

उसळतं तारुण्य प्रेमाची ओढ लवकर घेतल्याशिवाय रहात नाहीं. मी अशाच एका तरुण राघूकडे आकर्षिले गेले. तो माझ्याच घरस्यासमोर रहात होता. तोहि एकटाच होता. तरुण असूनही तो मोठा सज्जन दिसला मला. आपलं काम बरं कीं आपण बरें अशीच जणूं त्याची वृत्ति होती. चुकून कधीं माझ्याकडं बघायचा नाहीं. मग प्रेमचेष्टा करणं तर राहिलंच. इतर पोपटांच्या मानानें तो मला जरा जवळचाच वाटूं लागला. असं वाटायचं कीं ह्याचा सहवास झाला कीं हा मागचा त्रास तरी चुकेल. असा मी जसजसा विचार करूं लागायची तसतसा तो माझ्या मनांत भरत गेला.

त्याला नुकताच कुठें कंठ फुटला होता. निळ्या आकाशांत जसे इंद्रधनुष्य दिसते तसा त्याचा कंठ शोभून दिसत होता. मला तर त्यामुळं सारखं त्याच्याचकडे पहावंसं वाटायचं. पण तो कसला, तो तर मला दादही देईना. शेवटीं मी हूनच त्याची ओळख करून घ्यायचें ठरविलें.

पण एके दिवशीं एक गंमत झाली. आमच्या शेजारीं एक कावळ्याचें जोडपें रहात होतें. आम्ही त्यांना काका काकी म्हणत होतों. सकाळपासून ह्या काका-काकींत कांहीं तरी भांडण चाललेलें होतें. दुपारच्या वेळीं आम्हीं बसलों होतों त्याच्यामध्यें एक फांदी आली होती. त्या फांदीवर काकी रागारागानें येऊन बसल्या. झालें काकाही आलेंच त्यांच्या मागोमाग. पण त्यांना काहीं त्या फांदीच्या नाजुकतेची कल्पना

आली नाहीं त्यामुळें कावळा बसायला आणि फांदी मोडायला एकच गांठ पडली. आणि काकी व काका धाडकन् खालीं पडले. हें पाहून मला व माझ्या समोरच्या राघुला हंसतां हंसतां अगदीं पुरेवाट झाली. बराच वेळ झाला तरी हंसूं आवरेना. पुढें हांऊं काय लागलं मी त्याच्याकडे पाहिलें कीं ते हंसायचे आणि ते पाहूं लागले कीं मला हंसायला यायचं. आणि त्या हसण्याच्या भरांतच आम्ही तेथून उडालों आणि खूप दूरवर गेलों. आणि आश्चर्य असं कीं न कळत त्यांत आमची ओळख झाली. शेवटीं हंसण्यांत सबंध दिवस गेला तरी आम्हांला कळलं नाहीं. रात्र पडली तेव्हां आम्ही पांचवडांत आलों. आणि आपापल्या घरट्यांत गेलों. सुरवात तर मोठीच चांगली झाली होती.

दुसरे दिवशीं सकाळीं मी जागी झाले तों "मैऽना" ह्या एका गोड हाकेनेंच. मी उठलें. पाहतें तों समोरचा राघु मला हांक मारीत होता. खात्री पटल्यावर क्षणाचाही विलंब न लावतां मी त्याच्याबरोबर बाहेर पडले. खूप खूप हिंडले. हिरवीगार शेतें ओलांडलीं, पेरवांच्या बागा धुंडाळल्या. आकाशातल्या ढगांची नाव करून भरारी मारली. कशाचा म्हणून मला कंटाळा आला नाहीं. वाटलें कीं गोड आहे नाहीं राघुचा सहवास.

अशा प्रकारें रोज आम्हीं बाहेर पडायचे, खूप हिंडायचे, भरपूर मजा लुटायचे. पण आमचं हें प्रेम मात्र अगदीं मुकं

होतं अं. आश्चर्य वाटेल. पण राघु कांहीं तोंडून माझ्याशीं बोलत नव्हता. पण त्याचें माझ्यावर प्रेम नव्हतें असं मात्र नाहीं हं. त्याची प्रेम करण्याची वा प्रेम दाखवण्याची पद्धतच निराळी. एखादे वेळीं काय व्हायचं त्याला एखादा गोड पेरू आढळायचा. मग तो तसाच ठेवून मला शोधून आणायचा आणि खायला द्यायचा. ज्या दिवसापासून त्याची माझी ओळख झाली त्यापासून त्यानें अशी चैन कधींच केली नाहीं. काय करायचं तें दोघांनीं.

असा त्याचा माझा सहवास दृढ होत होता. पण त्याच-वेळीं माझ्यावर प्रेम करण्यामध्यें एक प्रकारचे द्वेषाचें वाता-वरण निर्माण होत होतें. तसें ते प्रत्यक्ष प्रतिकारही निर-निराळ्या स्वरूपांत दाखवीत होते. पण सर्वांपेक्षां माझी आणि राघुची मैत्री झाली ही गोष्ट जर कुणाला जास्त लागली असेल तर ती डुचक्याला. त्याला भेल्याला बिलकूल खपत नव्हतें. त्यामुळें तो जास्तच चिडायचा आणि मला शक्यतों त्रास द्यायचा. राघु काय ? बिचारा अगदींच गरीब. तोंडून कधीं त्याला बोलायचा नाहीं. पण त्याचा परिणाम असा होऊं लागला कीं मला एकटीला बाहेर पडणें व घरट्यांत रहाणें अगदींच अशक्य होऊं लागलें.

तो काय करायचा. मी बसले असले कीं वरून पानं तोडून टाकायचा. मी त्रासून उठलें कीं मागं यायचा. शेपटी

ओढायचा. असं करण्यांत त्याची कल्पना अशी होती कीं मी राघुचा सहवास सोडून त्याची सखी होईल म्हणून. पण त्याला कळत नव्हतें कीं प्रेम असं जोडतां येत नाहीं किंवा तोडतां येत नाहीं. शेवटीं तो अगदीं कंटाळला. आणि त्यानें राघुचा पिच्छा पुरवण्यास सुरवात केली. राघु गरीब होता ह्याचा जणूं त्यानें फायदाच घ्यायचें ठरविलें. एके दिवशीं मात्र त्या खुनश्याच्या अत्याचाराची अगदीं कमाल झाली.

त्या दिवशीं काय झाल सकाळपासून तो मेला आमच्या पाळतीवर होता. पण त्याला कांहीं साधत नव्हतें. दुपारीं मात्र आम्हीं बाहेर पडलों त्यावेळीं स्वारी कुठें गडप झाली कोणास ठाऊक पण संध्याकाळीं परत येत असतांना त्यानें आम्हांला गांठलें. आणि काय? हल्लाच केला त्यानें राघूवर. राघु बेसावध होता त्यामुळें पहिली नखी त्याला चांगलीच झोंबली. पण दुसरी मात्र त्यानें हुकवली आणि चिडून तो त्याच्यावर धांवून गेला. आमच्यांत नराचं रक्त गरम असतं! राघु नर होता. झालेला अपमान त्याला सहन होणेंच शक्य नव्हतें. त्यानें चांगलाच पिटला त्या राघुला. मग मात्र तो ची ची करीत निघून गेला. राघु अगदीं दमला होता त्याच्या डोक्यांतून रक्त येत होतें. म्हणून मी त्याला नको नको म्हणत असतांना देखील ओढयाच्या काठीं नेलें. तेथें त्याची जखम मी माझ्या पंखानें पुसून काढली. चोंचीतून पाणी आणून त्यावर शिंपडलें. त्याला त्यामुळें जरा तरतरी आली.

नंतर मी पाण्यातलं एक कणीस तोडून आणून त्याचा भुगा जखमेवर लावला. रक्त थांबलें. तेव्हां किती तरी हुशारी वाटली त्याला. त्यानें एकवार माझ्याकडे कृतज्ञतापूर्ण दृष्टीनें पाहिलें. त्यामुळें इतक्या जवळची मी त्याची पण किती ओशाळले. माझी मान खालीं गेली तेव्हां राघु चटकन पुढें आला आणि त्यानें माझी मान वर उचलली आणि माझ्या चोंचींत चोंच घातली. कसंसंच वाटलं मला, आणि न कळत मी माझा एक पंख तोंडापुढें धरला. वाटलें आतां नाहीं कोणी बघणार. बराच वेळ आम्ही तसें बसलों होतों. शेवटीं रात्र पडली तेव्हां आम्हीं तेथून निघालों आणि आमच्या घरट्याकडे वळलों.

पांचवडांत आम्हीं आलों आणि आमच्या घरट्यांकडे वळलों तों काय? माझे घर मुळीं नव्हतेंच तिथें. अगदीं त्याचा मागमूसही पण नव्हता. कापूस व रुई पानापानावर पसरली होती. दुबेळक्यांतले सांधे खालीं कचऱ्यांत मिसळून गेले होते. तें भयाण दृश्य पाहून तर मला रडूंच कोसळलें. मला राहून राहून मागच्या गोड गोड आठवणी आठवूं लागल्या नि आणखीन् रडूं कोसळूं लागलं. राघु माझं सांत्वन करीत होता. पण दुःखाचा सर ओसरीपर्यंत मी त्याच्याकडे पाहिलंही नाहीं. बऱ्याच वेळानें मी थांबले. तेव्हां राघु म्हणाला, " मैना भिऊं नकोस मला माहीत आहे तुला वाईट कां वाटतें तें. आज रात्रीं तुला रहायला जागा नाहीं

म्हणून तुला वाईट वाटते ना. मग भिऊं नकोस, उगी रडूं नकोस. माझं घरटं हें तूं तुझंच घरटं समज.' राघु हें बोलत होता. कधीं न बोलणारा राघु बोलत होता हें पाहून मी सारें माझें दुःख विसरलें. मला त्याचे बोलणेंच आतां ऐकावेसें वाटूं लागलें. तो म्हणत होता, "मैना, मोडकं तोडकं असलं तरी ते आपलं हक्काचं घरटं आहे. मी आतां मुद्दाम 'आपलं' म्हणत आहे. तूंच सांग आतां आपण दोघे दोन आहोंत कां? उलट मला आतां तुला चलण्याचा आग्रह करणेंच कसेंसें वाटत आहे. आतां तुझा हक्क आहे त्या घरट्यांत रहाण्याचा चल उठ, रडतेस काय खुळ्यासारखी." असें म्हणून जवळ जवळ त्यानें मला ओढूनच नेलें. आणि मीही न कळत त्याच्या-बरोबर गेलें.

घरट्यांत गेल्यावर राघुनें कापूस जरा साफ केला वरून पडलेली धूळ झटकली आणि आंत बोलावलें. तें घरटें माझ्याच सारखें प्रशस्त होतें. तेंही त्याच्या आईबापांनींच बांधलं असल्यामुळें जरा जुन झालं होतं. त्यामुळें मी माझ्याच घरट्यांत असल्याचा भास होत होता. एकाच घरट्यांत दुसऱ्या-सह रहाण्याचा आमचा हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें आमच्यांत थोडा संकोच निर्माण झाला होता. त्यामुळें थोडेसें दूर-सेंच आम्हीं होतों. राघुच्या प्रेमळ वागणुकीमुळें आतांपर्यंत जरी मी माझें दुःख विसरलें होतें तरी समोरची ती जागा पाहून मला अजूनही वाईट वाटत होतें. मी विचार करीत

होतें तोंच राघु म्हणाला, " कसला विचार करतेस अग ज्यानें हा प्रकार केला आहे त्याला आपण चांगलीच शिक्षा दिलेली आहे. बाकी तो करायला गेला एक नि झालं माल निराळंच हं त्याला वाटलं—जाऊं द्या तें. किती केलं तरी गोड पेरू प्रथम राघुलाच मिळायचे इतरांना नाहीं. पण जाऊं द्या तेंही. आतां तूं चूप रहा. डोक्यांतला विषय अजिबात काढून टाक तो. अरे हां तुला भूक लागलीय नाहीं " असें म्हणून त्यानें कोपऱ्यांत ठेवलेले दोन पेरूचे तुकडे काढले व माझ्या-पुढें कले. त्यावर मी हसून म्हटलें, ' खरंच राघु तू आज होतास म्हणून. नाहीं तर गिधाडानीं फाडावें तसें माझे हाल केले असते त्या मेल्यांनीं. खरंच तूं मला आज पंखाखालीं घेतलंस नाहीं तर—

" नाहीं तर—नाहीं तर काय कधीं आली नसतीस होय ?"

" तसं नाहीं रे."

" मग कसं बरं. जाऊं दे ते. तो पेरू तर खा."

" कां रे हा पेरू कशाला दिलास. मी मघा तुझी जखम बरी केली त्याची उपकाराची फेड म्हणून होय ? "

" छे छे. ती फेड केली आहे. आतां तुझ्यावर माझा उप-कार फेडण्याची ही संधि आणून देत आहे मी."

त्याची जीभ चांगलीच सुटली होती. हे मार्मिक उत्तर ऐकून मी तर चाटच झाले आणि चटकन् म्हणून गेले, " अरे लबाडा."

त्यानंतर ती रात्र कशा गोड धुंदीत गेली तें कळलेंही नाहीं. चोंचींतून पिलांकरतां चारा आणावा तसा वारा आमच्या करतांच जणूं रातराणीचा वास भरून आणीत होता. त्यामुळें एक प्रकारची गुंगी येई. पण क्षणात एकमेकांचा स्पर्श येऊन परत जाग येई. अशा अर्धवट गुंगींतच ती रात्र संपली. आणि दिवस उजाडला.

पूर्वेला चोंचीसारखा रंग दिसूं लागतांच आम्हीं उठलों. आणि नेहमींप्रमाणें बाहिर पडलों. पण ते मात्र नेहमींसारखें नाहीं. कुठें गावें तर कुठें शीळ घालावी. मध्येंच थांबावें. दूर-वर नजर टाकावी नि परत उडावें. अंगाला अंग लागलें कीं हंसावें नि दूर व्हावें आणि न कळत परत जवळ यावें. गरुडा-सारखी उंच भरारी घ्यावी तर वटवाघळासारखं एखाद्या फांदीला टांगून घेऊन झोंके घ्यावेत. घोंसदार ओंब्यातून घुस-मुसळून दाणे काढावेत तर त्यांच्यावरचे तुरे खेंचावेत. अशा प्रकारें सगळं जगच जणूं आपलं आहे असं समजून स्वैरपणें आम्हीं भटकलों आणि दुपार झाली त्यावेळीं पांचवडकडे वळलों. तोही आम्हांला नेहमींप्रमाणें न दिसतां कांहीं तरी निराळाच दिसला कसा सांगूं—खालच्या पारंब्या म्हणजे पोप-टांचे पाय वरची पानं म्हणजे हिरवेगार पंख आणि वरची उन्हांत चकाकणारी कोवळीं पानं म्हणजे लाल चोंची. हें सगळें पाहून असें वाटत होतें कीं सगळे पोपटच जणूं आपलें स्वागत करीत आहेत.

त्या अत्यानंदांत आम्हीं घरट्यांत आलों. दुपार होती. त्यामुळें सगळीकडे चिडचिप होतं. मधून कुठें तरी फडफड ऐकायला येत होती. आम्हीही स्वस्थ बसलों होतों. तोंच वाऱ्याची एक गरम झुळूक वेगानें पांचवडांत घुसली त्यामुळें आमच्या घरट्यांतला थोडा कापूस ढळला व खालीं पडला. त्याकडे मी पाहून राघुला म्हणाले, " खरंच गडे, आतां आपण नवीन सुंदर घरटं बांधूं या कां ? "

क्षणाचाही विलंब न लावतां त्यानें ह्या गोष्टीस मान्यता दिली.

दुसऱ्याच दिवसापासून आम्हीं कामास सुरवात केली. दिसली सुंदर काडी कीं आण उचलून. दिसला कोठें कापूस कीं चल घेऊन, अशी उचल्याची वृत्ति आम्ही धरली. आमचें काम अगदीं तडाखेबंद सुरू झालें. क्षणाचीही विश्रांति आम्हीं घेतली नाहीं. आमचे घरटें निम्में अधिक बांधलें जात असतां-नाच एके दिवशीं आमचे शेजारचा एक वृद्ध पोपट वरच्या फांदीवर येऊन खांकरून म्हणाला, " हं हं. बरीच ओढ लागली दिसतेय. पक्षी नवीन घरटीं केव्हां बांधतात हो. भावि पिढी तयार व्हायची असली म्हणजे ना ? "

असं म्हणून स्वारी स्वतःशींच हंसून भुर्रकन् उडून गेली. मला त्यांच्या बोलण्याचा कांहींच अर्थ कळला नाहीं म्हणून मी राघुला म्हटलें, " काय रे काय म्हणाले ते. "

" ओ हो जसं काहीं काहींच समजलं नाहीं नं."

" खरंच नाहीं रे."

माझा केविलवाणा चेहरा पाहून तो म्हणाला, " अग वेडे ते म्हणाले कीं पोराकरतां घरटं बांधतां वाटतं.

त्याचे हे उद्गार ऐकून मी खूपच लाजले. आणि बोलून गेले, " इश्श काहीं तरीच बाई तुमचं."

" वा वा उगीच कां कष्ट घेतले आम्हीं इतके—आणि हो आतां वेड पांघरून पेडगांवला जाण्यांत काय अर्थ आहे."

माझं हे गोड गुपीत त्यांना कसं कळलं कोण जाणे. मी तर लाजेनें अगदीं चूरच झाले.

थोडक्याच दिवसांत आमचें नवीन घरटें तयार झालें. घरटं मोठं ऐटदार आणि सुरेख झाल.पण त्यांत एक मोठी चूक राहून गेली होती ती म्हणजे पाहिजे तितकं कांहीं घरटं मोठं झाल नव्हतं. ही चूक लक्ष्यांत येतांच राघू मला म्हणाला,"वारे वा स्वार्थी ! स्वतःची आणि पोराची सोय केलेली दिसतेय. आम्हांला मात्र दिलाय ढच्चू. त्याच्या बोलण्याचें त्याच्या प्रमाणें मलाही पण हसूं आलें, पण एकंदर त्याचे उद्गार मला कसेसेंच वाटलें.

दिवसांमागून दिवस जात होते. पांचवडची गळालेली पानं परत फुटत होतीं. नव्या पारंब्या मुळं धरीत होतीं. तसाच आमच्यांतही—माझ्यांतही फरक घडत होता. अलिकडे मी गरोदर असल्यानें अंगानें जरा स्थूल दिसत होते. कांती

जरा चकाकत होती. डोळ्यांत चांदणीचं तेज उतरलं होतं. नव्या पिसांनीं जाड होऊन भावि पिढीला ऊब देण्यासाठीं पंख हुरावले होते. स्थूलतेमुळें पूर्वीप्रमाणें बाहेर भटकणं त्रासाचं होत होतं. वणवण हिंडायचं. दिसेल ते आणायचं. माझ्यासाठीं पोटाला उबारा देतील अशींच फळं आणायचीं. तीं माझ्या स्वाधीन करायचीं. उरलेलं आपण खायचं. असं वाईट वाटायचं मला. पण त्याचा आग्रह सुटेल तर खरं, त्याचें माझ्यावरील तें अप्रतिम प्रेम पाहून मी एकदां म्हणाले-ही " राघू, किती रे प्रेम करतोस तूं माझ्यावर. किती कष्ट घेतोस माझ्यासाठीं."

त्यावर तो म्हणाला, " मैना, तुझ्यापासून मला सुख मिळायला तुला दुःखी करून कसं चालेल."

मी वेडी. राघु असं कांहीं बोलला कीं डोळ्यांत आनंदाश्रू तरंगू लागायचे. मग राघु ते आपल्या लाल चोंचीनं पुसायचा आणि म्हणायचा, " वेडे, किती खुळी आहेस ग तूं."

माझा राघु—माझा राघु आतां पूर्ण माझा झाला होता ह्यापेक्षां मला जास्त काय हवें होतें.

—पण सुखाला जगाची दृष्ट लवकर लागते हेंच खरं.

एकें दिवशीं सकाळीं काय झालें कोणास ठाऊक. पण खूप जोराचा वारा सुटला. हत्तीसारखा वारा धांवत यायचा आणि पांचवडांत घुसून पारवीला टकरा द्यायचा. तेथून निघायचा तो

थेट मागच्या दरडींत जाऊन मोठ्यानें चीत्कारायचा. त्यामुळें जिकडे तिकडे हाहा:कार उडाला. पानं सळसळून हिसक्या-सरशीं गळून पडूं लागलीं. पारंब्या हेलकावूं लागल्या. इतकंच काय पश्चिमेकडून येणारा वारा पांचवडला पूर्वेला घेऊन जातोय कीं काय असं वाटूं लागलं. त्यांतच मागच्या दरडींत घोंघा-वून पडणाऱ्या ओहोळांचे तुषार दुप्पट उसळीनें वर येऊन पांचवडला भिजवूं लागले. ह्या एकंदर प्रकारामुळें तिथें राह-णाऱ्या पक्षांची फारच घबराट उडाली. साप पाहिल्यावर पिलं जशी ओरडतात तसे वृद्ध वृद्ध पक्षी देखील किलबिलाट करून पांचवडांत एकच हल्कल्लोळ उडवूं लागले. तशांत वाऱ्यानें जोर धरल्यामुळें घसघशीत फांदी देखील खालीवर हिंदळूं लागायची. त्यामुळें बिचाऱ्या पक्षांचीं घरटीं माल पानासारखीं कोलमडून पडूं लागलीं. अंडी तर पिकल्या पानासारखीं पहि-ल्याच हिसक्याला खडाखड पडून फुटली. त्यामुळें जिकडे तिकडे एकच हलकल्लोळ उडाला. एकटे एकटे जीव वाऱ्या-वर वाहूं लागले तर पोरांना दुबळक्यांत सांभाळतां सांभा-ळतां मादींची घबराट उडूं लागली.

आमचं घरटं नवीन होतं आणि भक्कम दुबळक्यांत होतं म्हणून टेक धरूं शकलं व मधून मधून त्यालाही गचका बसायचा पण त्यामुळें घरट्याला त्रास व्हायच्याऐवजीं मलाच तो सहन करावा लागायचा. सकाळपासून माझ्या प्रसव वेदना वाढल्या होत्या तशांत हा त्रास होऊं लागला. त्यामुळें त्रासाला सीमाच

उरली नाहीं. बिचारा राघु–मदत करण्यास भरभक्कम असून केविलवाणा चेहरा करून बघत बसण्यापलिकडे कांहीं करूं शकत नव्हता. त्या झंझावाताच्या सपाट्यांत मी तीन अंडीं दिलीं. आणि त्या यमयातनेंतून सुटलें. अंग सारं गळून गेलं होतं तरी धडपड करून मी वाऱ्यापासून अंड्यांना ऊब मिळावी म्हणून शक्य तो जोर करून त्यांना पंखाखालीं दाबून घेऊन बसले होते. मनांतून सारखा देवाचा धांवा मी करीत होते. योगायोग असा कीं क्षणभरांतच वारा निवळला. हत्ती-सारखा पांचवडांत शिरलेला वारा चिमणीसारखा फटीफटींतून पसार झाला.

तसें सगळीकडे गंभीर वातावरण निर्माण झालें. जो तो परत आपआपल्या जागीं परतला. कोणाचें कांहीं कोणाचें कांहीं नुकसान झालें होतें.

त्यामुळें आनंदी असें कोणीच दिसत नव्हतें.

मी गळून गेले होते. पोटांत अन्नाचा कणही उरला नव्हता. माझा सुकलेला चेहरा पाहून राघू म्हणाला, “मैने, मी मिळालं तर घेऊन येतों हं थोडंसं.”

तें ऐकून मलाही बरें वाटलें, पण त्याला बाहेर पाठविण्या-बद्दल मन जरा कच खात होतें. म्हणून मी म्हणाले, “हो जा, पण हे बघ वादळ शांत झालं तरी केव्हा काय होईल सांगतां येत नाहीं. पण लवकर ये हं. तोही तें कबूल करून गेला. पण मनाला मात्र खूप रुखरुख वाटून राहिली. वाटलं

उगीच पाठवलं त्याला. नसतं पाठवलं तर—तोंच वरून एक मोडलेली फांदी दाणकन् खालीं पडली. नशीब ती अंगावर पडली नाहीं. पण काय सांगू—त्या हिसक्यामुळें माझ्या पंखा-खालचं एक अंडं नेमकं बाजूला फेकलं गेलं. तें कुठं पडलं काय झालं हें देखील बघण्याची मला शुद्ध उरली नाहीं. वाटलं झाला हा अपशकून वाईट झाला. आपण राघुला मघा म्हणालें तेंच आपल्या वाट्याला आलं. तसंच जर—चुरचुर-णारी जीभ टोंकदार चोंचीच्या बाहेर येतांच चावली गेली.

त्या वेळेपासून मनाला सारखी रुखरुख लागून राहिली.

माझे डोळे सारखे राघुच्या वाटेकडे लागून राहिले. कुठें पानांत फडफड झाली कीं चटकन् माझें लक्ष जायचें. कुठें कांहीं सळसळलें कीं पटकन् माझी मान उंच व्हायची. पण—पण दरवेळीं निराशाच व्हायची.

रात्र पडली. अंधार झाला. सगळीकडे चिडचिप झालं. पण माझा राघु परत आला नाहीं. मी रडरड रडलें, घर-ट्यांतला कापूस ओलाचिंब झाला. पण माझा राघु मला दिसला नाहीं. ती काळरात्र तशीच गेली—

—आणि त्यानंतर कित्येक काळरात्रीं तशाच गेल्या. पण राघु आला नाहीं. वादळ थांबलें पण वादळानंतरचे दुष्परि-णाम जसे माझ्या लाडक्या जीवाला भोगावे लागले तसा तर कांहीं प्रकार—

असे विचार मनांत येत त्यावेळीं आकाशांत विजेनें जसें क्षणांना चराचरा फाडावें तसें ते विचार माझं हृदय फाडीत.

अशा भेडसावण्या विचारांनीं अनेक काळरात्री संपल्या नि परत दिशा उजळल्या. दिवसाच्या ज्योतीला रात्रीची काळोखी काजळी चढली नि ती काजळीही पडली पण माझा राघू परत आला नाहीं.

माझीं अंडीं फुटलीं धुक्यांतून जसा सूर्य वर यावा तशी तीं गोजिरीं पिलं हसत हसत त्या पांढऱ्या कवचांतून बाहेर पडलीं. नव्या जगाकडे नव्या नवलाईनें तीं बघूं लागलीं. इवलाल्या डोळ्यांनीं तीं विश्वदर्शन करूं लागलीं—तरी पण माझा राघु परतला नाहीं.

खरंच कुठें असेल माझा राघू ? कुठें असेल तो ? काय करीत असेल ? तो मला टाकून गेला. छेः तशी ओझरती कल्पना देखील येणं म्हणजे त्याच्या प्रेमाचा अपमान करण्या-सारखं आहे. मग कुठें बरं असेल तो ?

आतां माझ्यांत पूर्वीप्रमाणें ताकद आली होती. मी परत पूर्वीसारखी हिंडूंफिरूं लागले. दिवसाचा माझा कार्यक्रम मी ठरवून टाकला होता. भटक भटक भटकायचं नि राघूचा शोध करायचा आणि मिळेल तें धान्य पिलाकरतां घरीं न्यायचं.

मी धान्य घेऊन घरीं यायची त्यावेळीं तीं इवलालीं गोजिरीं पिलं माना उंच उंच करून माझ्या वाटेकडे डोळे लावून

बसायची. किती गोड दिसत. मला पाहिल्यावर तर आनंदानें तीं नाचूंच लागत. तो त्यांचा आनंद पाहिला कीं माझा आनंद गगनांत मावेनासा व्हायचा. पण क्षणांत विचार यायचा खरंच आज राघु असता तर त्याला किती आनंद झाला असता नाहीं. नि त्या विचारासरशींच मी परत गंभीर व्हायची.

मला जसं हिंडतां फिरतां येऊं लागलं तसा मी राघुचा शोध करीत होते. पण राघु कांहीं मला कोठें दिसला नाहीं. म्हणून मी आमच्या सर्व जातबांधवांना त्याला शोधून आणण्याची विनंति केली. माझी ती केविलवाणी भाषा आणि मुद्रा पाहून त्यांनींही त काम मनावर घेण्याचें ठरविलें. त्यामुळें निराशेच्या भयाण दरडींत आशेचा ओलावा दिसूं लागला.

एके दिवशीं अशींच मी चिंताक्रांत बसले असतांना पूर्वी रघुनें ज्याला मारलें होतें तो डुचक्या पोपट माझ्याकडे आला. त्याला पहातांच मला तर भीतीच वाटली. ह्याला टाळावें असेंच वाटूं लागलें तरी पण त्याला राघुबद्दल कांहीं सांगायचं आहे असें त्याच्या पुटपुटण्यावरून कळल्यामुळें मी कांहींही न बोलतां गप्प राहिले. तेव्हां तो म्हणाला, "मैना, सांपडला बघ तुझा राघु. चल येतेस माझ्याबरोबर. हवा असल्यास दाखवतों मी."

तें ऐकल्यावर क्षणाचाही विलंब न लावतां आणि कसलाही विचार न करतां मी त्याच्याबरोबर बाहेर पडले. जितक्या

जोरांत उडतां येत होते तितक्या जोरांत मी उडाले. रान सोडून आम्हीं गांववस्तींत शिरलों. गांवाच्या तोंडाशींच एक बसका बंगला होता. डुचक्यानें मला थोडा वेळ तेथें रोखून धरलें व हलके हलके बंगल्याच्या मागच्या बाजूस नेलें. तेथें एक भला प्रशस्त व्हरंडा होता व त्या व्हरंड्यांतच राघुला एका पितळी पिंजऱ्यांत कोंडून ठेवलें होतें. प्रथम मी पाहिलें तर माझा विश्वासच बसेना कीं हाच आपला राघु आहे म्हणून. किती रोड आणि पिंगट झाला होता. त्याचा पिंजरा किती सुंदर होता. त्यांत गोड फळंही खूपशी होतीं तो तें खाऊं लागला तर कोणी हाकणार नव्हतं असं असून देखील ती फळं चाखीत नसावस दिसलं. नसेल मिळत माझ्या राघुला खाण्याचं सुख. कस मिळणार सुख ? ना उडायला जागा. ना माझ्यासारखीची सोबत. त्याची ती केविलवाणी स्थिति पाहून मला तर रडें आवरेचना. मी भुर्रकन उडून त्याच्या पिंजऱ्या-जवळ गेले. मला जवळ आल्याचें पहातांच तो जास्तच कावराबावरा झाला व त्यानें आपलें तोंड पंखांत खुपसलें नि तो रडूं लागला. मी पिंजऱ्याभोंवतीं खूप फडफड केली पण मला आंत जतां येईना. माझी ती निष्फळ धडपड पाहून राघू एका कडेला आला व त्यानें प्रेमानें माझ्या चोंचीवरुन आपली जीभ फिरवली व पंख बाहेर काढून मला आलिंगन द्यायचा प्रयत्न केला. बराच वेळ आम्ही चोंचींत चोंच घालून बसलों होतों. किती दिवसांनीं तो आनंद आम्हांला मिळत होता. वाटत होतें होऊच नये दूर.

थोड्या वेळानें राघु दूर झाला व मला म्हणाला, " मैना, आपली बाळं कशी आहेत ? तूं कशीं आहेस ? "

त्याचे ते खेदोद्गार ऐकून माझ्या पोटांत तर कळवळूंच लागलें.

पण त्याला आनंद व्हावा म्हणून मी माझें दुःख दाबून धरलें व त्याला तो गेल्यापासूनची सर्व हकिकत सांगितली व म्हणाले, " राघु आपली पिल अगदीं तुझ्यासारखींच आहेत त्यांना पाहिलं कीं मला अगदीं तुझीच आठवण होते आणि मग कससंच होत. बरं जाऊं दे. तुझं कसं आहे ? "

" मैना—मी माझं काय सांगूं." असं म्हणून तो रडूं लागला. आपण उगीच विचारलें असें मला झालें. तरी पण त्यानें त्या रडव्या बोलांतच सगळी हकिकत सांगितली. ती हकिकत ऐकून मी त्याला म्हणाले, " पण राघु तुला कां बरं धरलं त्यांनीं ? "

" हौस म्हणून."

" हौस. ही कसली हौस. दुसऱ्याला दुःख देऊन हे कसली रे हौस करतात मेले. मूर्ख तर नाहींत हीं माणसं." तो विषय तेथेंच थांबून मी त्याला म्हणाले, खरंच राघु मला नाहीं कां तुला येथून सोडवतां येणार ? "

माझी ही कल्पना त्यालाही पडंत पडली असावी. कारण तो चटकन् म्हणाला, " खरंच तेवढें एक आहे जमण्यासारखं

पण इथं तर हे कुलूप आहे. तेव्हां आतां कांहीं शक्य नाहीं. हो. उद्यां सकाळीं ये. तेव्हां काय होतं आहे माहीत. आमचा गडी येतो पिंजरा धुवायला त्यावेळीं तो काढतो कुलूप त्या-वेळीं हे दार असें वर चोंचीनं उचलल तर मला येतां येईल बाहेर. बरं झालं तूं आलीस. मी ह्याचीच वाट पहात होतों पण मला कोणीच भेटलें नाहीं. तो डुचक्या भेटला होता पण म्हटलं तो थोडंच ऐकणार आपलं–" इतक्यांत कोणाची तरी चाहूल ऐकूं आल्यामुळें राघुनें मला तावडतोब जाण्यास सांगितलें. मीही भुर्रकन उडाले व जातां जातां उद्यां येण्याचें त्याला आश्वासन दिलें. मी वर उडाले. पाहतें तों मागें कोणाची तरी फडफड ऐकूं आली म्हणून मी मागें वळून पाहिलें तों डुचका मागें येत असल्याचें मला दिसलें. म्हणून मी थोडी थांबले. तो जवळ येतांच मी त्याला विचारलें, " अरे, तूं इथंच होतास कां ? "

ह्यावर तो आढ्यतेनें म्हणाला, " हो तर ऐकत होतों दोन प्रेमी माणसांचीं भाषणं."

त्याचा खरा अर्थ लक्षांत न घेतां मी म्हणाले, " खरंच तूंच हा आनंद मला मिळवून दिलास किती धन्यवाद देवूं मी तुला."

"धन्यवाद !" डोळा जरा मोठा करून तो म्हणाला, "मला धन्यवाद काय करायचे आहेत. मला तूं—"

" मी ? पण मी कशी आतां तुला मिळणार ? "

" कशी—अजून तूं पूर्वीच्या गुमींत दिसतेस ? वेडे आतां मी तुला धरलं तर राघू थोडाच येणार आहे तुला आतां सोडवायला."

त्याची ती कपटी भाषा सरळ, साधी, सोपी समजून मी तितक्याच मवाळपणानें त्याला म्हणाले, " मी उद्यां सोडवून आणणार आहे त्याला."

माझें हें बोलणें ऐकून व आपली लाल चोंच उघडून व एक डोळा मोठा करून त्यानं विकट हास्य केलें व तो म्हणाला, " वेड तूं काय बोलतेस हे तुला तरी कळतं कां ? अग मी माझा मागचा अपमान विसरून तुला तुझा राघू दाखवला तो काय तुला आनंद मिळावा आणि त्याला सोडवून आणतां यावें म्हणून होय. वेडे कुठल्या धुंदींत आहेस तूं. तुझा राघू आतां तुला मिळणार आहे होय ? आणि समजा तुला तो मिळाला तर मी थोडाच त्याला तुला पचूं देईल ? दुसऱ्याला दुःख देत असतांना आपण स्वतःच्या सुखावर धगधगीत निखारा ठेवीत असतो ह्याची कल्पना तरी होती कां तुला ? "

" मी उद्यां सोडवून आणलं त्याला तर काय करणार आहेस तूं. मारणार आहेच थोडाच."

"मारणार ?" मीच कशाला मारायला हवं सारी पांचवडची जातच तुटून पडेल तुमच्यावर.

"कां?"

"कां? तो आतां पक्षी नाहीं एक बाटगा झाला आहे तो. माणसाचा स्पर्श झाला आहे त्याला."

इतकें बोलून भकास हास्य करून तो निघून गेला. मी पांचवडांत आल. पिलं माझी वाट पहात होते. त्यांना मी पंखाखालीं घेतलं तेव्हां तर मला एकदम रडेंच कोसळलें. तें बाटग्याचं भयाण दृश्य माझ्यासमोर उभं राहिलं त्यामुळें एकदां वाटलें आणूंच नये सोडून. उगीच मेले छळतील हे. नंतर वाटलं आणावं सोडून कोणी कांहीं म्हणूं लागले तर द्यावं त्यांना पटवून कीं राघू दोषी नाहीं म्हणून. नि समजा नाहींच पटलं त्यांना तर द्यावा पांचवड सोडून आणि जावें दुसरीकडे. हा विचार मात्र मनाला पटला आणि मीही त्याचप्रमाणें वागायचें निश्चित केलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच पाखरांची किलबिल व्हायच्या आंतच मी उठले नि राघुकडे गेले. राघु तेथेंच होता पण तो अजून झोपेंतच होता. त्याला उठवू नये असं वाटलें म्हणून मी तेथेंच आडोशाला बसून राहिले. थोडयाच वेळांत त्याचा नोकर आला व त्यानें खसकन पिंजरा ओढला त्यामुळें राघुची झोंप मोडली असा राग आला मला त्या माणसाचा वाटलं जावं आणि चांगला चावा घ्यावा त्याच्या हाताचा.

नोकर पिंजरा घेऊन गेला आणि थोडयाच वेळांत तो परतला त्यानें पिंजरा अडकवून टाकला व कुलूप खालीं ठेवून

फळं आणण्यासाठीं आंत गेला. ही संधि साधून मी राघू-जवळ गेले. मला पहाताच त्याला खूप आनंद झाला व तो आनंदानें आंतल्या आंतच उड्या मारूं लागला तेव्हां मी म्हणाले, “ राघू आतां आटप झटपट बघ मी दार उघडते.” असं म्हणून मी वर जाऊन दाराची कडी चोंचींत पक्की धरली व दार ओढूं लागले पण कांहीं केल्या ते वर होईना. शेवटीं राघूनें खालून चोंच खुपसून वर दार ढकललें तेव्हां कुठें ते वर उचललें गेलें. राघूला बाहेर येतां येईल इतकें दार उचललें गेल्याबरोबर राघु बाहेर आला. तो संपूर्ण बाहेर आला असं पाहून मी दार सोडलें व त्याच्यासह तेथून पला-यन केलें. तोंच आंतून त्याचा गडी फळं घेऊन आला. आम्हांला उडत चाललेलें पाहून तो मोठ्यानें म्हणाला, “ मालिक मालिक राघु भाग गया ! ”

तेथून सुटल्यानंतर कुठें जावें हा राघुपुढें जरी प्रश्न नसला तरी माझ्यापुढें मात्र तो खासच उभा होता. कालच्या डुच-क्याच्या संभाषणावरून राघूला तिकडे घेऊन जाणें एक प्रका-रचें धाडस होतें. त्याला बिचाऱ्याला कल्पनाही नव्हती कीं, आपल्या विरुद्ध कोणी उठणार आहेत म्हणून. त्याला एकवार सांगावें असें वाटलें, पण मग वाटूं लागलें नको बाई उगीच त्याला वाईट वाटायचें. मी ह्या विचारामुळें उडतां उडता मागें रेंगाळूं लागलें म्हणून राघु मला म्हणाला, “ मैना जरा भराभर चल. मला आपलीं पिल्लं केव्हां पाहीन असं झालंय ”

हें ऐकल्यावर मात्र माझे सर्व विचार नाहींसे झाले व वाटलं काय होईल तें होईल राघूला न्यावेंच पांचवडांत.

असं म्हणायला आणि पांचवडांत शिरायला एकच गांठ पडली. आम्हीं पांचवडांत शिरलों त्या वेळीं पांचवड कांहीं तरी विलक्षण शांततेनें भरल्यासारखा वाटला. कुठें फडफड नाहीं, घडघड नाहीं. सगळे पक्षी निघून तर गेले नाहींत असा भास झाला, तरी पण कुठेंही फारसें लक्ष न देतां आम्हीं घरट्याकडे वळलों. घरटें जवळ राहिलें होतें तोंच आम्हीं चारपांच जणाकडून अडवलों गेलों आणि आम्हांला सांगण्यांत आलं कीं, तावडतोब आम्हांला सभेकडे गेलं पाहिजे म्हणून.

राघूनें कसलाही विचार न करतां त्यांच्याबरोबर जाण्याची तयारी दाखवली पण माझी मात्र छाती भितीनें अगदीं धाड धाड उडत होती. राघु पुढं गेला तशी मीही पण त्याच्यामागें गेलें. थोडेसें चालून जाताच आम्हांला भला मोठा एक पक्षांचा मेळावा दिसला. पांचवडांतला तो भाग अगदीं प्रशस्त होता. दोनशें तीनशें पक्षी बसतील एवढाली एक एक फांदी होती. आम्हीं तेथें गेलों त्यावेळीं जिकडे तिकडे पक्षीच पक्षी बसलेले दिसले. सर्व जातींचे सर्व रंगांचे पक्षी तेथें होते. पण सगळ्यांची नजर मात्र एक दिसत होती. जो तो आमच्याकडे आम्हीं गुन्हेगार म्हणून पहात होता. मला काय तें उमगलें होतें, पण राघुला कांहींच कल्पना नसल्यानें त्या विचित्र मेळाव्यानें तो जास्तच कावराबावरा झालेला दिसत होता.

एका मधल्या फांदीवर सगळे पोपट बसले होते. त्यांच्या मध्यभागीं डुचका पायानें आपली मान मोठ्या ऐटीनें खाजवीत बसला होता. त्याच्यापुढें आम्हांला नेण्यांत आले. असा राग आला मला त्याचा कीं, त्यामुळें आतांपर्यंत वाटत असलेली सगळी भीति नाहींशी झाली आणि ह्या खुनशाच्या अजोड कारस्थानाला टक्कर द्यायची हिंमत माझ्या अंगांत आली. आम्हांला आणल्यानंतर बराच वेळ शांततेंत गेला. तेव्हां एकजण ठरवून ठेवल्याप्रमाणें म्हणाला, " मैना, तूंच राघूला सोडवून आणलस होय ना ?

मीही चिडले होतेच. कशाचीही पर्वा न करतां मी म्हणाले, " हो हो मी सोडवून आणलं. "

" तूं सोडवून आणलंस तो आतां पक्षी नाहीं. एक बाटगा आहे हें तुला माहीत होतं. बाटग्याला काय शिक्षा मिळते हेंही तुला माहीत होतं, मग हें धाडस तूं कां केलेंस?" डुचका आढ्यतेनें म्हणाला.

" कशासाठीं ? " मी रागानें म्हणाले, " सांगितलनं कीं, माझ्यासाठीं म्हणून. तो बाटगा असला तरी माझा आहे. माझ्यावर प्रेम करणारा आहे. माझ्या सुखदुःखांत भाग घेणारा व जिवाला जीव देणारा आहे. म्हणून मी त्याला सोडवून आणलं—नव्हे त्याला सोडून आणणं मी माझं कर्तव्य समजते. तुम्हीं त्याला बाटगा म्हणतां. त्याबद्दल प्रायश्चित्त देऊं म्हणतां, पण कां ? काय संबंध आहे तुमचा. काय मोठें

तुम्हीं धर्मकार्य करीत आहां ? दोन प्रेमी जिवांची ताटातूट करायची. एका गरीब मादीचं आयुष्य मातीमोल करायचं एवढंच तुम्हांला माहीत. काय अधिकार आहे तुम्हांला आमच्या जीवनांत ढवळाढवळ करण्याचा. केलीत आम्हांला कधीं मदत. केलैत कधीं प्रेम स्वतःच सुख बघण्यापलीकडे आपल्या घरट्याबाहेर कधीं नजर टाकली? त्या तुम्हांला आम्हीं दुःखांत असतांना, किंवा नियमबाह्य वर्तन घडत असतांना ढवळाढवळ करण्याचा काय अधिकार आहे ? राघु बाटगा झाला हा कांहीं त्याचा दोष नाहीं. मूर्ख माणसांनीं आपल्या हौसीनें त्याला पकडलं त्याला तो काय करणार ! त्यांत त्याचा काय दोष. ज्यानें तुमची पवित्र जात बाटवली असं तुम्हांला वाटतं त्याला कां नाहीं देत प्रायश्चित्त ? हो पण मग तुमचा शूरपण! कुठला दिसायला, तुमचं धर्मप्रेम कुठलं आढळायला ! मारलेल्याला मारण्यात तर सारा तुमचा शूरपणा. अहो आज ते सुटून आले. माणसाच्या बंदिखान्यांतून सुटून आले. मोठ्या मनानें मरत आपल्या जातींत आले. ह्याबद्दल त्याचं अभिनंदन करायचं सोडून भुडबुंज्यानो तुम्हीं त्यांना ठार करायचा कट रचतां. तुम्हांला—"

"मैना, चूप. तूं काय बोलतेस हें, कळतं कां तुला." डुचका मोठ्यानें ओरडून म्हणाला, "बाटग्याला शिक्षा हा धर्मांचा नियम आहे. तूं तुझ्या स्वार्थामुळें असं म्हणतेस. प्रत्येक जण जर असं म्हणूं लागला तर धर्म टिकणार कसा.

भावि पिढीच्या दृष्टीनें बघतां हे बाटगे ठेवणें म्हणजे आपणहून आपल्या जातीचें धर्मांतर करण्यासारखें आहे. ते कांहीं नाहीं. धर्मबाह्य वर्तणूक तुम्हांला करतां आली तरी आम्हांला ती करवत नाहीं. आम्हीं त्याला देहांत प्रायश्चित्ताची शिक्षा देणारच."

"पण—"

"चूप"—असं ह्यानें म्हणतांच सगळीकडे एकच हलकल्लोळ उडाला. आणि जो तो त्वेषानें राघुवर धांवून गेला. बिचारा राघु एकटा काय करणार. क्षणार्धात त्याचा देह त्यां मेल्यांनीं छिन्न विच्छिन्न करून टाकला. त्याला मेलेला पाहून सर्वजण कांहीं न बोलतां निघून गेले. क्षणार्धांत तो भाग पूर्ववत् भेसूर झाला. एक एक जण म्हणून तिथें राहिला असेल तर शपथ मी इकडे तिकडे पाहिले तों डुचका मेला खदखद हसतांना दिसला. माझा डोळयांतील अश्रु पहाण्याकरतांच जणूं त्यानें आयुष्याचा हा काळ खर्च केला होता. तोही नंतर निघून गेला.

मी राघुजवळ गेले. अद्यापि मला तर पहावेंचना त्याच्याकडे, रडरडून मी आकाश पाताळ एक केलें पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. राघु कांहीं आतां माझं सांत्वन करायला येणार नव्हता. माझ्यामुळें, माझ्यामुळेंच राघुला हें मरण पत्करावं लागलं. खरंच तो होता तिथेंच रहांता तर नसतां का सुखी झाला. निदान मला तरी तो दररोज दिसला असता

पण आतां माझ्या हावरेपणामुळें काय करून बसले मी हें. आज तो राघु. बिनबोल राघु. रागानं कधीं बोलला नाहीं तो राघु अन्याय होत असतांना देखील न बोलणारा राघु आज स्वतःच्या जातीसाठीं दुष्ट रूढीसाठीं बलिदान करून निघून गेला.

त्यानें बलिदान केलें पण त्यापासून कोणी बोध घेणार होतें. बिनबोलक्या राघुचं मरणं ही बिनबोलकंच आलं होतं त्यामुळें जगाला थोडाच त्याचा त्याग समजणार आहे. वास्तविक त्याला अस वीराचं मरण आलं होतं कीं ज्यामुळें समाज आपली चूक सुधारून घेऊं शकला असता. भावि पिढीसाठीं नवीन इतिहास निर्माण करूं शकला असता. पण जगाला अज्ञात असणाऱ्या त्या जिवाला मात्र तसंच मरण मिळालं होतं कीं ज्यामुळें समाजांत कोणत्याहि प्रकारची प्रगतीची हालचाल न व्हावी.

असा मी विचार करीत असतांनाच मी खाडकन ताळ्या-वर आले. मला आतां राघुचे पुढचें कठोर कार्य करावयाचें होतें. मी तेथून उठले खालीं गेले मुख्य वडाच्यापाशीं एक खड्डा होता त्या खड्ड्यात राघुला मोठ्या दुःखानें ओढून नेलें. त्यावर पानें टाकण्याकरितां मी तीं गोळा केलीं. आणि एक एक पान जिवाचा कोंडमारा करून अंतःकरण जड करून राघुच्या मृत देहावर टाकलं. अश्रुमुळें डोळ्यांना दिसत नव्हतं हेंच बरें म्हणायचं त्यातल्या त्यांत. मी डोळे पुसले. आणि

नीट पाहिलें माझा राघु मला दिसला नाहीं. गेला, गेला होता. माझा राघु दुसऱ्या जगांत. तो अशा जगांत गेला होता कीं जिथं त्याला कोणी बाटवणार नव्हतें, जिथं कोणी ह्याला त्रास देणार नव्हतें.

मी त्याच्या समाधीजवळ बसून त्याचं चिंतन करूं लागले. शेवटीं मात्र त्याच्या जीवनाचा निस्कर्ष काढला कीं त्याच्या मृत्युमुळें मला आतां समाजाला माझ्या भावी पिढीला समजून यायला पाहिजे कीं, दुसऱ्याला दुःख देऊन स्वतःला व समाजाला सुख मिळत नसतं म्हणून.

तोंच मनांत विचार आला कीं छेः समाज कांहीं इतका सुबुद्ध नाहीं हें ऐकून घ्यायला. ज्यानें एका मादीचें आपल्या नवऱ्याच्या सुटकेचें केविलवाणें भाषण ऐकलें व त्यापासून कांहीं निस्कर्ष काढला नाहीं तो थोडेंच तेथून पुढें काहीं ऐकून घेणार आहे. आणि हो माझी पिलं तरी हें कसं ऐकतील? आज तीं लहान आहेत. उद्यां मोठीं झालीं कीं धर्माप्रमाणें वेगळे निघतील आणि सगळ्याप्रमाणें तुटक वागूं लागतील. खरंच ते तरी माझं कुठं ऐकणार आहेत. छे. माझं कोणीच ऐकणार नाहीं. पूर्वी माझ्या लहानपणीं असाच प्रसंग घडला होता पण तो पाहून तरी ह्या पिढींनी त्यापासून कुठें बोध घेतला.

असें विचार मनांत यायला आणि वरून एक हिरवें गार पान राघूवर पडायला एकच वेळ आली. त्या पानाकडे पाहून

मला वाटलें. खरंच अज्ञात व्यक्तीचा त्याग हा ह्या पानाच्या आयुष्यासारखाच नाहीं का ? हें हिरवे गार पान खालीं पडलें. तें सुखासुखी कां ? वृद्ध झालें म्हणून नव्हे तर त्यांनेही त्याच्या आयुष्यांत समाज सुधारणेसाठीं काहीं त्याग केला असेल. समाजाला तो रुचला नसेल त्यामुळें बिचाऱ्याला आपल्या जिवाचें दान द्यावें लागलें असेल.

अरेरे ! जगांत आपण यायचं. जिवनांत सारखं लढायचं. भावि पिढी व आपला समाज जास्तींत जास्त सुखी होण्यासाठीं झगडायचं ते सारं कशासाठीं कल्पनेंतून निर्माण झालेल्या गोड आभासासाठींच कां ? ह्याच्यासाठींच कां आपलें आयुष्य आहे.

रुढीप्रिय समाजा ! अज्ञात व्यक्तीच्या त्यागांतून तुला बोध घेतां आला नाहीं तर स्वतःच्या कल्पनेंतून निर्माण झालेल्या ह्या गोष्टींतून त्याचा सारासार विचार करून तरी तुला कांहीं ठरवतां येईल कां ?

जय हिंद !

IRBK-0102416

IRBK-0102416